अकोला । शनिवार
दि. २८ जून २०२५
वर्ष : १९ अंक : ११८
पाने : ८ + ४

दैनिक
# अजिंक्य भारत
बातम्यांचा गतिमान पाठलाग
www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये



बुमराहला पत्नी संजनाने केले ट्रोल
(पान ७ वर..)

## थोडक्यात

### निवडणूक आयोगावर तेजस्वी यादवांचा हल्लाबोल



**पाटणा :** बिहारमधील विरोधी पक्षांच्या महाआघाडीकडून मुख्यमंत्र्यांचा चेहरा म्हणून सादर केले जात असलेल्या तेजस्वी यादव यांनी भारतीय निवडणूक आयोगाविरुद्ध मोर्चा उघडला आहे. शुक्रवारी, महाआघाडीतील विविध पक्षांच्या नेत्यांसोबत राष्ट्रीय जनता दल कार्यालयात पत्रकारांशी बोलताना तेजस्वी यादव म्हणाले की, निवडणूक आयोग एका कटाचा भाग म्हणून बिहार निवडणुकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मते, मतदारांची वर्गवारी करू इच्छित आहे. म्हणूनच आयोग बिहार निवडणुकीत तरुण मतदारांना त्यांच्या पालकांच्या नागरिकत्वाचा पुरावा मागत आहे. तेजस्वी यादव असेही म्हणाले की, राज्य सरकार आणि केंद्राच्या आकडेवारीच्या आधारे, बिहारमध्ये किती कमी लोकांनी मॅट्रिक केले आहे आणि किती कमी लोकांकडे जन्म प्रमाणपत्रे आहेत, हे सांगितले गेले.

### पक्षाने नाही भाषेने हाक दिली आहे- विजय वडेट्टीवार



**मुंबई :** आगामी ५ जुलैच्या मोर्चासाठी मनसे नेत्यांनी सर्वपक्षीय नेत्यांना यासंबंधी फोन करण्यास सुरुवात केली आहे. मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांना या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. वडेट्टीवार यांनी अधिकृत सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करताना पोस्टच्या माध्यमातून त्यांनी मराठीसाठी एकत्र येण्याची ही वेळ असल्याचे म्हटले आहे. त्यांनी पोस्टमध्ये लिहिले आहे की, मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्यावतीने बाळा नांदगावकर यांनी हिंदी भाषेची सक्ती नको यासाठी मराठी सन्मान मोर्चात सहभागी होण्यासाठी संपर्क केला आहे. मनसेने केलेल्या फोनवर सकारात्मक भूमिका घेत प्रदेशाध्यक्ष व अन्य वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून निर्णय घेण्याचे आश्वासन मी त्यांना दिले आहे. मराठीसाठी एकत्र येण्याची ही वेळ आहे, ही हाक पक्षाने नाही तर भाषेने दिली आहे, असे स्पष्ट मत विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केले.

### हे सरकार चालवत आहेत की कॉमेडी शो? - ठाकरे



**मुंबई :** राज्यात हिंदी भाषेची सक्ती करण्यात येऊ नये, याकरिता मनसेने ५ जुलैला मोर्चा आयोजित केला आहे. सत्ताधारी वगळता राज्यातील सर्वच पक्षातील नेते या मोर्चामध्ये सहभागी होणार आहेत. पण आता या हिंदी भाषा सक्तीच्या मुद्द्यावरून उद्धवसेनेचे आमदार आदित्य ठाकरे यांनी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्यावर टीका करताना, हे सरकार चालवतायत की कॉमेडी शो? असा खोचक सवाल उपस्थित केला आहे. यंदा इयत्ता पहिलीला तिसरी भाषा म्हणून हिंदी भाषा मौखिक असेल, पुस्तके नसतील, पण मास्तर मुलांना तिसरी भाषा शिकवतील, असे स्पष्टीकरण शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडून देण्यात आले होते.

# कोलकाताच्या लॉ कॉलेजमध्ये विद्यार्थिनीवर सामूहिक बलात्कार

## तिन्ही आरोपींना पोलीस कोठडी



**कोलकाता: दि. २७ वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालमध्ये राज्य सरकार संचालित दक्षिण कोलकाता लॉ कॉलेजशी संबंधित सामूहिक बलात्काराचा एक प्रकार समोर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २५ जूनच्या रात्री कॉलेज कॅम्पसमध्ये विद्यार्थिनीवर सामूहिक बलात्कार करण्यात आला. या सामूहिक बलात्काराच्या संदर्भात पोलिसांनी तीन जणांना अटक केली आहे. या तिघांपैकी दोघे विद्यार्थी आहेत, तर एक कॉलेजचा माजी विद्यार्थी असून, सध्या तो तृणमूल काँग्रेसचा सदस्य असल्याचे म्हटले जाते. ही घटना २५ जून रोजी संध्याकाळी ७.३० ते १०.५० दरम्यान घडल्याचे सांगण्यात येत आहे. आरजी कर मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये एका ज्युनियर डॉक्टरवर झालेल्या बलात्कार आणि हत्येच्या १० महिन्यांनी ही घटना घडली आहे. एका प्रशिक्षणार्थी डॉक्टर महिलेवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली होती. तिचा मृतदेह कॉलेज कॅम्पसमधील एका सेमिनार रूममध्ये आढळला होता. बलात्कार प्रकरणी अटकेनंतर या तिन्ही आरोपींना अलीपूर न्यायालयात आज हजर करण्यात आले. त्यावेळी पोलिसांनी घटनेची चौकशी करण्यासाठी तिन्ही आरोपींसाठी १४ दिवसांची पोलीस कोठडी (पान २ वर)

### राजकारण तापले

या प्रकरणावरून आता कोलकात्याचे राजकारण देखील तापले आहे. भाजपचे अमित मालवीय यांनी या घटनेवरून पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि त्यांचा सत्ताधारी पक्ष तृणमूल काँग्रेसवर निशाणा साधला आहे. वरील बंगाली वृत्तपत्रातील बातमी शेअर करताना त्यांनी लिहिले, भयानक! २५ जून रोजी कोलकात्याच्या उपनगर कसबा येथील लॉ कॉलेजमध्ये कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीवर सामूहिक बलात्कार करण्यात आला आणि हा बलात्कार कॉलेजचा एक माजी आणि दोन शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी केला होता. त्यांनी असेही म्हटले की तृणमूल काँग्रेसचा एक सदस्य यात सहभागी होता. तथापि, त्यांनी त्यांच्या दाव्याला समर्थन देण्यासाठी कोणतेही पुरावे दिले नाहीत. ते म्हणाले, ममता बॅनर्जी यांच्या राजवटीत पश्चिम बंगाल महिलांसाठी एक भयानक स्वप्न बनले आहे. बलात्कार ही एक सामान्य शोकांतिका बनली आहे.

# केदारनाथ हायवेवर भूस्खलन

## अहमदाबाद-सुरतेत पूर, घरांमध्ये शिरले पाणी



### पुढील २ दिवस २३ राज्यांमध्ये मुसळधार पाऊस

हवामान खात्याच्या ताज्या बुलेटिननुसार, पुढील २ दिवसांत देशातील २३ राज्यांमध्ये मुसळधार पाऊस पडेल. यामध्ये जम्मू-काश्मीर, पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, पूर्व राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, झारखंड, बिहार, केरळ, कर्नाटक, पश्चिम बंगाल, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, मणिपूर, मिझोराम, नागालँड आणि त्रिपुरा यांचा समावेश आहे.

**नवी दिल्ली: दि. २७ वृत्तसंस्था**

उत्तराखंडमध्ये मुसळधार पावसामुळे मुंकटिया परिसरात भूस्खलन झाल्याने केदारनाथ महामार्ग पुन्हा एकदा बंद झाला आहे. रस्त्यावर दगड आणि ढिगारा सतत पडत आहे. एसडीआरएफ आणि एनडीआरएफच्या तुकड्या घटनास्थळी उपस्थित आहेत आणि जंगलातील पर्यायी मार्गांनी प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढत आहेत. दिल्ली वगळता देशातील सर्व राज्यांमध्ये पाऊस पडत आहे. आतापर्यंत सामान्यपेक्षा १२.३ टक्के जास्त पाऊस (पान २ वर)

### विदर्भाला पावसाचा तडाखा

विदर्भात बुधवारी सायंकाळपासून सुरू झालेली कोसळधार गुरुवारी रात्री उशिरापर्यंत कायम राहिल्याने बुलडाणा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यात नदी, नाल्यांना पूर आला. मेहकर व लोणार तालुक्यांमध्ये सर्वाधिक हाहाकार उडाला आहे.कांचनगंगा नदीला पूर आल्याने मुंबई-नागपूर महामार्ग बंद पडला. वाशिम जिल्ह्यात कुकसा फाट्याजवळील नदीला पूर आल्याने जुना संभाजीनगर-नागपूर, किनिराजा-वाशीम आणि मेडशी-भैरद मार्गावरील वाहतूक थांबली होती. यवतमाळातील घाटंजी-येरंडगाव आणि वर्धा-राळेगाव (पान २ वर)

# इस्रायलचा मोठा हवाई हल्ला

## बंकर बस्टर बॉम्ब टाकले!

**तेल अवीव: दि. २७ वृत्तसंस्था**

इराण आणि इस्रायल यांच्यातील युद्ध संपून अवघे चार दिवस उलटले आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शस्त्रसंधीची घोषणा करत इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्ष थांबविला. दोन्ही देशांमध्ये १२ दिवस युद्ध चालले. इराणविरुद्धचा संघर्ष थांबून अवघे ४ दिवस उलटलेले असताना आता इस्रायलने लेबनॉनवर हल्ला केला आहे. दक्षिण लेबनॉनच्या डोंगराळ भागांवर इस्रायलने मोठ्या




प्रमाणात बॉम्बफेक केलेली आहे. हिजबुल्लाहच्या मालमत्तांना लक्ष्य करण्यासाठी इस्रायलने हल्ले केले आहेत. इराणसोबतचा संघर्ष थांबताच इस्रायलने हिजबुल्लाहवरील हल्ले अधिक तीव्र केले आहेत. लेबनॉनच्या सरकारी राष्ट्रीय वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, नाबातियेहच्या डोंगरांवर दोनदा हवाई हल्ले करण्यात आले. बंकर बस्टर बॉम्बचा वापर करण्यात आला. या हल्ल्यातील जीवितहानीबद्दल अद्याप तरी कोणताही तपशील समोर आलेला नाही. नोव्हेंबरमध्ये अमेरिकेच्या मध्यस्थीने झालेली शस्त्रसंधी १४ महिने चालली. यानंतर इस्रायल (पान २ वर)

# ६ वर्षांनंतर भारत-चीन व्यवहार सुरळीत

## राजनाथ सिंह यांनी दिली आनंदाची बातमी

**किंगदाओ: दि. २७ वृत्तसंस्था**

केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह एससीओ सदस्य देशांच्या संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी चीनच्या किंगदाओ शहरात दाखल झाले आहेत. त्यांनी चीनचे संरक्षण मंत्री ॲडमिरल डॉन जून यांची भेट घेतली. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या काळात एका विशेष निर्णयावर सहमती झाली. राजनाथ सिंह यांनी या भेटीविषयी बोलताना, सुमारे सहा वर्षांनी कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू होईल. भारत आणि चीनमध्ये याबाबत सकारात्मक चर्चा झाली, अशी माहिती दिली. पुढे



संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे.

त्यांनी लिहिले आहे की, किंगदाओ याठिकाणी एससीओ संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीदरम्यान चीनचे संरक्षण मंत्री ॲडमिरल डॉन जून यांच्याशी चर्चा झाली. द्विपक्षीय संबंधांशी संबंधित मुद्द्यांवर आम्ही रचनात्मक आणि दूरदर्शी विचारांची देवाणघेवाण केली. (पान २ वर)

# जपानमध्ये भूकंपाचे ५०० हून अधिक धक्के!

**टोकियो : दि. २७ वृत्तसंस्था**

जपानच्या दक्षिणेकडील टोकारा बेटांमध्ये गेल्या काही दिवसांत ५०० पेक्षा अधिक भूकंपाचे सौम्य व मध्यम तीव्रतेचे झटके जाणवले आहेत. जपान मेट्रोलॉजिकल एजन्सीच्या माहितीनुसार, ही एक असामान्य भूकंपीय हालचाल असून, यामुळे स्थानिक नागरिक आणि देशभरात जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या भूकंपमालिकेच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर एक भविष्यवाणी पुन्हा चर्चेत आली आहे. प्रसिद्ध जपानी मांगा कलाकार रयो तात्सुकी यांनी ५ जुलै २०२५ रोजी जपानमध्ये महात्सुनामीचे भविष्य वर्तविले आहे. त्यामुळेही जपानमधील नागरिकांमध्ये भीतीचा माहौल तयार झाला आहे. रयो तात्सुकी यांना काही जण ''जपानची बाबा वेंगा'' म्हणू लागले आहेत. त्यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्यांचे म्हणणे आहे की, त्यांनी याआधी काही महत्त्वाच्या जागतिक घटनांची अचूक भविष्यवाणी केली होती, जसे की- २०११ सालचा तोहोकू भूकंप आणि त्सुनामी, कोविड-१९ महामारी, प्रिन्सेस डायनाचा मृत्यू. या भाकितांमुळे तात्सुकी यांची विश्वासार्हता त्यांच्या समर्थकांमध्ये अधिक वाढली आहे, आणि त्यामुळे ५ जुलै २०२५ ची भविष्यवाणीही (पान २ वर)

# पंढरपुरात विठुरायाचे २४ तास दर्शन!

## ऑनलाइन दर्शन बुकिंग पूर्णपणे बंद

**पंढरपूर : दि. २७ वृत्तसंस्था**

**आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी होत असते. यंदा या यात्रा कालावधीत भाविकांना सुलभ दर्शन मिळावे, यासाठी मंदिर समितीने विशेष नियोजन केले आहे. शुक्रवार, २७ जून रोजी शुभ मुहूर्तावर विधिवत पूजेनंतर श्री विठ्ठलाचा पलंग काढण्यात आला. यामुळे भाविकांना २४ तास मुखदर्शन आणि २२.१५ तास पदस्पर्श दर्शनाची सुविधा उपलब्ध झाली आहे, अशी माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.**

या कालावधीत श्री विठ्ठलाच्या मूर्तीच्या पाठीमागे लोड, तर रुक्मिणीमातेच्या मूर्तीच्या पाठीमागे तक्क्या ठेवण्यात आल्या आहेत. पलंग काढल्यामुळे काकडा आरती, पोशाख, धूपारती, शेजारती यांसारखे राजोपचार (पान २ वर)



### दर्शनाचा आनंद घेता येणार

या सुविधेमुळे वारकरी आणि भाविकांना विठुरायाच्या दर्शनाचा आनंद घेता येणार असून, मंदिर परिसरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. मंदिर समितीने भाविकांच्या सोयीसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले असून, यात्रा कालावधील दर्शन व्यवस्था सुरळीत राहावी यासाठी विशेष काळजी घेतली जात आहे.




# पान 1 वरून...

## केदारनाथ हायवेवर भूस्खलन

पडला आहे. २६ जूनपर्यंत देशात सामान्यपेक्षा १३४.३ मिमी पाऊस पडायला हवा होता, परंतु १४६.६ मिमी झाला आहे. दरम्यान, देशात पावसामुळे मृतांचा आकडाही वाढू लागला आहे. हिमाचलच्या कुल्लू जिल्ह्यात ढगफुटीमुळे आतापर्यंत ५ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ७ हून अधिक जण बेपत्ता आहेत. बुधवारी कुल्लमधील ५ ठिकाणी ढग फुटले - जिवा नाला (सैंज), शिलागड (गढसा) व्हॅली, स्ट्रो गॅलरी (मनाली), होरानगड (बंजर), कांगडा आणि खनियारा धर्मशाळेत. त्याच वेळी, जम्मू आणि काश्मीरमधील राजौरी, पूंछ, दोडा आणि कठुआ जिल्ह्यात ढगफुटी आणि मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरात २ मुलांसह ३ जणांचा मृत्यू झाला आहे. गेल्या २ दिवसांपासून गुजरातमधील अहमदाबाद, सुरत आणि नवसारी जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. सुरतनंतर आता अहमदाबादमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. घरांमध्ये पाणी शिरले आहे. हवामान खात्याच्या मते, आज देशातील सर्व राज्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. पूर्व राजस्थान, पश्चिम मध्य प्रदेश, उत्तराखंड, गुजरात, मध्य महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक आणि केरळमध्ये पावसासाठी ऑरेंज अलर्ट आहे.

## विदर्भाला पावसाचा तडाखा

मार्गही पुरामुळे बंद करण्यात आला होता. वाघाडी नदीला पूर आल्याने घाटंजीतील अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने संसार उघड्यावर आले. शेतकऱ्यांवरील दुबार पेरणीचे संकट मात्र टळले आहे. बुलढाण्यासह मेहकर, चिखली तालुक्यांतील २३ मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली आहे. मेहकर तालुक्यातील डोणगाव भागात सलग १९ तासांपासून पाऊस पडत होता. डोणगावमधील अंधारवाडी भागात पाचशेवर नागरिकांना हलविण्यात आले. अनेक गावांमध्ये पुराचे पाणी शिरून घरांतील साहित्याचे नुकसान झाले. मेहकरजवळ समृद्धी महामार्गावरील इंटरचेंजवरूनदेखील नदीच्या पात्रासारखे पाणी वाहू लागले. महामार्गाच्या पुलाखालूनही पाणी वाहू लागल्याने मेहकर–खामगाव महामार्ग ठप्प झाला होता. डोणगाव येथील काही शेतकरी पुरात अडकले. झाडावर चढून त्यांनी आपला जीव वाचविला. एनडीआरएफच्या पथकाने या सर्वांना सुखरूप बाहेर काढले. मुंबई–नागपूर महामार्गावरील वाहतूक कांचनगंगा नदीच्या पुराने ठप्प. नदीपासून पाचशे मीटर अंतरापर्यंत पुराचे पाणी. पूर ओसरण्याची वाट पाहणारे कारमधील लोक वाहनातच बसून होते. मात्र, रस्त्यावर पाणी वाढल्याने कार तेथेच सोडून लोक जीव वाचवून पळाले. वर्धा जिल्ह्यातील देवळी तालुक्यातील डिगडोह येथे यशोदा नदीला पूर. वर्धा–राळेगाव मार्ग बंद. आलमडोह गावात पुराचे पाणी शिरले.

## ६ वर्षांनंतर भारत–चीन ...

सुमारे सहा वर्षांच्या अंतरानंतर कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी रशिया आणि बेलारूसच्या त्यांच्या समकक्षांशीही बैठका घेतल्या. या द्विपक्षीय बैठकांमध्ये या क्षेत्रातील आव्हाने आणि सुरक्षा धोके तसेच संरक्षण सहकार्यावर चर्चा झाली. राजनाथ सिंह यांनी सोशल मीडियावरील एका पोस्टमध्ये लिहिले आहे की, बेलारूसचे संरक्षण मंत्री लेफ्टनंट जनरल व्हिक्टर ख्रेनिन यांच्याशी किंगदाओ येथे चांगली चर्चा झाली. त्या अगोदर, राजनाथ सिंह यांनी रशियाचे संरक्षण मंत्री आंद्रेई बेलोसोव्ह यांची भेट घेतली आणि संरक्षण क्षेत्रात दोन्ही देशांमधील दीर्घकालीन आणि व्यापक सहकार्यावर चर्चा केली.

## जपानमध्ये भूकंपाचे ५०० हून ...

अनेकांच्या चर्चेचा विषय बनली आहे. १९९९ मध्ये लिहिलेल्या या पुस्तकात, त्यांनी ५ जुलै २०२५ रोजी जपानमध्ये महात्सुनामीचे भविष्य वर्तविले होते. एक भयंकर नैसर्गिक आपत्ती येईल. त्यांनी ''शहरे पाण्यात बुडणे'', ''उकळता समुद्र'', ''मोठे बुडबुडे'' आणि ''२०११ च्या त्सुनामीपेक्षाही मोठी त्सुनामी'' यांसारख्या दृश्यांचे वर्णन केले आहे. टोकारा बेटसमूहात गेले काही दिवस सौम्य भूकंपांची मालिका सुरु आहे. त्यातील दोन झटके रविवार आणि मंगळवारी मॅग्निट्यूड ५.१ इतक्या तीव्रतेचे होते. जरी अद्याप कोणतेही मोठे नुकसान झाले नसले, तरी जपानच्या ज्वालामुखी आणि भूकंप निरीक्षण संस्थेने मोठा भूकंप होण्याची शक्यता नाकारलेली नाही. भूशास्त्रज्ञ हिसायोशी योकोसे यांनी सांगितले की, या भागात मॅग्निट्यूड ६.० किंवा त्याहून मोठा भूकंप होण्याची शक्यता आहे. टोकारा बेटसमूह हा जपानच्या दक्षिणेकडील क्युषू प्रदेशाच्या अगदी दक्षिणेस वसलेला आहे. येथे सुमारे ७०० रहिवासी सात बेटांवर विखुरलेले राहतात. हे बेट अत्यंत दुर्गम असून, येथे पोहोचणे कठीण आहे. त्यामुळे कोणतीही आपत्ती आली तर बचावकार्यात अडचणी येऊ शकतात.

## पंढरपुरात विठुरायाचे २४ तास ...

बंद करण्यात आले असून, नित्यपूजा, महानैवेद्य आणि गंधाक्षता हे राजोपचार सुरू राहतील. ही व्यवस्था १६ जुलै रोजी प्रक्षाळपूजेपर्यंत कायम राहणार आहे. यात्रा कालावधीत भाविकांना सहज दर्शन मिळावे यासाठी मंदिर समितीने व्हीआयपी दर्शन, टोकन दर्शन आणि ऑनलाइन दर्शन बुकिंग पूर्णपणे बंद केले आहे. यामुळे वारकऱ्यांना रांगेतून सुलभपणे दर्शन घेता येणार आहे. मंदिर समितीने केलेल्या नियोजनानुसार, दर मिनिटाला ३५ भाविकांना दर्शनाची संधी मिळेल, तर सुमारे ५० हजार भाविक चरणस्पर्श दर्शन रांगेत सहभागी होऊ शकतील. यासाठी दर्शन रांगेची व्यवस्था सुव्यवस्थितपणे करण्यात आली आहे.

## पश्चिम बंगालच्या लॉ कॉलेजमध्ये....

मागितली होती, मात्र, न्यायालयाने आरोपींना पुढील मंगळवारपर्यंतच पोलिस कोठडीत ठेवण्याची परवानगी दिली आहे. पीडितेच्या तक्रारीवरून दाखल केलेल्या एफआयआरनुसार, मुख्य आरोपी मोनोजित मिश्रा (३१) आहे, जो महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी आणि तृणमूल काँग्रेस छात्र परिषदेच्या (टीएमसीपी) युनिटचा अध्यक्ष आहे. याशिवाय, सह-आरोपींमध्ये झैब अहमद (१९) आणि प्रमित मुखर्जी (२०) यांचा समावेश आहे. पीडितेने दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, त्यांनी माझ्याशी लैंगिक संबंध ठेवण्याच्या उद्देशाने जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. मी त्यांना विरोध केला तेव्हा त्यांनी माझ्यावर अमानुष अत्याचार केले. तिने पुढे म्हंटले की त्यांनी कॉलेजचे मुख्य गेट बंद केले होते. गार्ड असहाय्य होता आणि त्यांनी मला मदत केली नाही. ते मला जबरदस्तीने गार्ड रूममध्ये घेऊन नेले. माझ्यावर बलात्कार करण्यास सुरुवात केली. त्यांनी मला ब्लॅकमेल केले, माझ्या मित्राला मारण्याची आणि माझ्या पालकांना अटक करण्याची धमकी दिली. पीडितेने पुढे सांगितले की, आरोपी माझ्यावर बलात्कार करत असताना, त्यांनी माझा व्हिडिओदेखील रेकॉर्ड केला आणि मला धमकी दिली की जर मी सहकार्य केले नाही तर ते व्हिडिओ सर्वांना दाखवतील. मी खोलीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत असताना त्यांनी मला हॉकी स्टिकने मारण्याचा प्रयत्न देखील केला. मला न्याय हवा आहे. २५ जून रोजी दुपारी १२ वाजता कॉलेज कॅम्पसमध्ये परीक्षेचा फॉर्म भरण्यासाठी पीडिता गेली असता तिच्यासोबत ही घटना घडली. ती प्रथम कॉलेजच्या युनियन रूममध्ये जाऊन बसली. नंतर तिला मुख्य आरोपीने पकडले, ज्याने कॉलेजचे मुख्य गेट बंद करण्याची सूचना केली. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, सुरक्षा रक्षकाच्या खोलीत तिच्यावर बलात्कार करण्यात आला.

## इस्रायलचा मोठा हवाई हल्ला ...

दररोज दक्षिण लेबनॉनवर हवाई हल्ले करत आहे. आज इस्रायलनं हे हल्ले अधिक तीव्र केले. इस्रायली सैन्याच्या लढाऊ विमानांनी हिजबुल्लाहच्या तळांवर हल्ले चढवले. एका महत्त्वाच्या भूमिगत प्रकल्पाचा भाग असलेल्या परिसरावर इस्रायलनं हल्ले केले. हिजबुल्लाहच्या मालमत्तांना लक्ष्य करण्याच्या उद्देशानं हल्ले करण्यात आले. यानंतर स्फोटांचे कानठळ्या बसवणारे आवाज ऐकू आले. इस्रायलच्या लढाऊ विमानांचे आवाजही परिसरात ऐकू येत होते. दक्षिण लेबनॉनच्या अनेक भागांमध्ये टेहळणी करणारे ड्रोनदेखील दिसून आले. या हल्ल्यानं परिसरात एकच खळबळ उडाली. हिजबुल्लाहच्या कारवाया रोखण्यासाठी हवाई हल्ला केल्याचं इस्रायलकडून सांगण्यात आलेलं आहे. दक्षिण लेबनॉनच्या नबातियाह अल-फौका आणि इकलीम अल-तुफ्फाहच्या डोंगरांवरील अनेक भागांना लक्ष्य करण्यात आलं. हिजबुल्लाहचे तळ, मालमत्ता, पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्याच्या उद्देशानं इस्रायलकडून हवाई हल्ले करण्यात आले. इस्रायल विरुद्धच्या संघर्षात हिजबुल्लाहचं मोठं नुकसान झालेलं आहे.

# शेतमालाला कमी भाव, बियाण्याचे दर गगनाला ; शेतकरी अडचणीत

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**हिरपूर, दि. २७ :** सध्या राज्यातील अनेक भागांत शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. एकीकडे त्यांच्या शेतमालाला बाजारात अपेक्षित भाव मिळत नाही, तर दुसरीकडे बियाण्यांचे दर गगनाला भिडले आहेत. यामुळे खरीप हंगाम सुरू असतानाच शेतकऱ्यांचे बजेट कोलमडले आहे.

कमी भावाने माल विकावा लागतोय: सोयाबीन, तूर, कापूस,गहू, हरभरा, कांदा, मका यासारख्या पिकांना हमीभावापेक्षा कमी दर मिळत असून, व्यापारी आणि खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांना लांब रांगेत तासन् तास उभे राहावे लागत आहे. काही ठिकाणी शेतमाल सडून जात आहे, तरीही शेतकऱ्यांच्या हातात पुरेसा काहीच उरत नाही.माल विकायला गेलं तर भाव नाही, आणि पेरणी करायला बियाणं महाग. आम्ही कसं जगायचं?'' असा प्रश्न बहुतांश शेतकरी विचारत आहेत. काही ठिकाणी शेतकरी संघटनांनी सरकारकडे तात्काळ मदतीची मागणी केली आहे. सरकारकडून कोणतीही ठोस घोषणा नाही:सद्यस्थितीत सरकारकडून कोणतीही ठोस मदत किंवा अनुदान जाहीर झालेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे.माल विकायला गेलं तर भाव नाही, आणि पेरणी करायला बियाणं महाग. आम्ही कसं जगायचं?'' असा प्रश्न बहुतांश शेतकरी विचारत आहेत. काही ठिकाणी शेतकरी संघटनांनी सरकारकडे तात्काळ मदतीची मागणी केली आहे. बियाण्यांचे दर वाढले.

> सोयाबीन, तूर, मूग, कापूस, मुंग उडीद, या पिकांच्या बियाण्यांचे दर मागील वर्षाच्या तुलनेत २५ ते ४० टक्क्यांनी वाढले आहेत. खासगी कंपन्यांनी उच्च प्रतीच्या बियाण्यांचे दर सामान्य शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर नेले आहेत.
> **संजय गुल्हाने** शेतकरी मूर्तिजापूर

# वीरशैव लिंगायत धर्म जनजागृती अभियानाला प्रतिसाद

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**तेल्हारा, दि. २७ :** बुलढाणा जिल्ह्यातील साखरखेर्डा येथील श्रीपलसिद्ध धर्मपीठ १००८ सद्गुरु सिद्ध चैतन्य शिवाचार्य महाराज यांच्या मार्गदर्शनात तेल्हारा शहरात धर्म जनजागृती अभियान राबवण्यात आले या अभियानात त्यांनी वीरशैव लिंगायत बांधवांच्या घरी जाऊन धर्मप्रचार करण्यात आला या अभियानाला लिंगधारण विभूतीचे महत्त्व गुरुदीक्षिचेचे महत्व वर्षातून एकदा गुरुला भेटण्याचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले असून सद्गुरु सिद्ध चैतन्य शिवाचार्य महाराज यांनी स्वतः एकाच दिवशी भर पावसात अनेक घरांना भेटी देऊन धर्मप्रचार केला यावेळी त्यांनी गुरुमाऊली महाराष्ट्रातील प्रत्येक लिंगायत बांधवांच्या घरी जाऊन धर्म जागृती करण्याचे सांगितले. यावेळी तेल्हारा शहरातील योगेश बिडवे सुमित गंभीरे संदीप मिटकरी गौरव धुळे विनायक मुंजाडे शुभम पिंपळकर सिद्धेश्वर घोडेस्वार कैलास बोडके शिवप्रसाद घोडेस्वार प्रशांत धोंडेवार गजानन गुळवे संजय गंभीरे उल्हास बिडवे राहुल मिटकरी यांनी पुढाकार घेऊन प्रत्येक बांधवांच्या घरी भेटी दिल्या या अभियानाला समस्त लिंगायत वीरशैव समाज बांधवांनी प्रतिसाद दिला असून धर्म जागृतीसाठी अशा प्रकारचे अशा उपक्रमाचे आयोजन भविष्यात सुरू राहणार असल्याची संदीप आप्पा मिटकरी यांनी सांगितले आहे.

# पावसाळ्याच्या प्रारंभीच चिखलाचे साम्राज्य!



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बाळापूर , दि. २७ :** नागरिकांना मुलभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी शासन विविध योजनेच्या माध्यमातून संबधीत ग्रामपंचायत अंतर्गत गावातील नागरिकांना भेडसावत असलेल्या तसेच त्रासदायक ठरत असलेल्या मुलभूत समस्या सोडविण्यासाठी मोठ्या प्रमाणात शासकीय निधी उपलब्ध होत आहे. तरीही पावसाळ्याच्या सुरुवातीलाच तालुक्यातील काही भागातील गावांमध्ये रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले. नागरिकांना चिखलातून वाट काढावी लागत आहे. ग्रामीण भागात जल जिवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा संदर्भात गावातील रस्त्याचे केलेल्या खोदकामामुळेही रस्त्यावर चिखल पसरले आहे त्यामुळे नागरिकांमध्ये रोष व्यक्त करण्यात येत असून खोदकाम करण्यात आलेल्या रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी विलंब का असा? प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# श्री राजराजेश्वर मंदिराला तीर्थक्षेत्र ब दर्जा!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

## मंदिर विश्वस्तांनी केला आ. पठाण यांचा सत्कार



**अकोला, दि. २७ :** शहराचे आराध्य दैवत श्री.राजराजेश्वर मंदिराला राज्य शासनाने तीर्थक्षेत्र ब वर्ग दर्जा देण्याबाबत बुधवार, २५ रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत निश्चित करण्यात आले. या निर्णयाचे स्वागत श्री.राजराजेश्वर संस्थानच्या विश्वस्तांनी केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री आकाश फुंडकर यांचे आभार व्यक्त करीत तीर्थक्षेत्र ब दर्जा मिळण्यासाठी सतत पाठपुरावा करणाऱ्या पश्चिम अकोला विधानसभा मतदारसंघाचे आ. साजिद खान यांचा शाल व श्रीफळ देऊन मंदिर विश्वस्त मंडळाने मंदिरातील कार्यालयात सत्कार केला. श्री. राजराजेश्वर मंदिर शहरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या मंदिराचा विकास आराखडा देखील शासनाने तयार केला आहे. दरम्यान तीर्थक्षेत्र ब दर्जा मिळणेबाबतचा प्रस्ताव देखील शासनदरबारी विचाराधीन होता.

बुधवारी मंत्रालयात झालेल्या बैठकीत अखेर तीर्थक्षेत्र ब दर्जा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. यावेळी मंदिर विश्वस्त मंडळाच्या वतीने चंद्रकांत सावजी, सुनील गरड, मुन्ना उकरडे, राजेश नायसे यांच्यासह काँग्रेसचे प्रकाश तायडे, डॉ. प्रशांत वानखडे, पराग कांबळे, आकाश कवडे, अंकुश तायडे, अभिजित तवर, गणेश कळसकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुणवत्तापूर्ण शिक्षणासह विद्यार्थ्यांच्या आरोग्यावरही देणार भर - अशोक उईके

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



## निवासी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांचे केले स्वागत

**नागपूर , दि. २७ :** ज्या विश्वासाने पालक शासकीय आश्रमशाळेत मुलांना दाखल करतात त्या विश्वासाला सार्थकी लावण्याची जबाबदारी ही शिक्षक व शाळेवर असते. पालकांच्या मनात आपल्या मुलांप्रती असलेल्या उज्वल भविष्याला साकार करण्यासाठी आश्रम शाळेतील शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी कठोर मेहनत घेतली पाहिजे, असे प्रतिपादन आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी केले.

नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यात कवडस येथे आश्रमशाळेत आयोजित करण्यात आलेल्या प्रवेशोत्सव कार्यक्रमात पालकांशी साधलेल्या संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सरपंच उषा रविंद्र सावळे, आदिवासी विकासाच्या अपर आयुक्त आयुषी सिंह, उपायुक्त दिंगबर चव्हाण, आदिवासी एकात्मिक प्रकल्प अधिकारी नितीन इसोकर व मान्यवर उपस्थित होते.

राज्यातील आदिवासी विकास विभागाअंतर्गत व शासन अनुदानित ज्या काही शाळा, शिक्षण संस्था आहेत त्यात शिकणाऱ्या आदिवासी मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी आम्ही कोणतीही तडजोड करणार नाहीत. शाळेत प्रवेश घेणाऱ्या मुलांमुळे आपण आहोत हे शिक्षकांनी लक्षात घेतले पाहिजे. मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तसमवेत त्यांच्या आहारातील गुणवत्ता ही चांगलीच असली पाहिजे. याबाबत मुख्याध्यापक, संस्थाप्रमुख हे योग्य ती खबरदारी घेतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

शिक्षण क्षेत्रातील बदलांना व विद्यार्थ्यांच्या जडणघडणीबाबत प्रक्रियेचा मी स्वत: एक भाग राहिलो आहे. विद्यार्थ्यांप्रती प्रत्येक शिक्षकांच्या मनात जी कणव असते ती अधिक समर्थपणे जपणे आवश्यक आहे. शिक्षकांनी पालकांशीही मनमोकळा संवाद साधला पाहिजे. या विश्वासार्हतेतून विद्यार्थ्यांना बळ मिळते. मुलांच्या अंगातील सुप्त गुण हे गुरुजणांनी लक्षात घेतले पाहिजे. कोणत्याही शाळेच्या केंद्रबिंदू ही मुलेच आहेत असे त्यांनी स्पष्ट केले. आदिवासी मुलांच्या उज्वल भवितव्यासाठी १७५१ प्रलंबित जागा येत्या शैक्षणिक सत्रापर्यंत भरती केल्या जाणार असल्याचे ते म्हणाले.आदिवासी विभागासाठी कुठल्याही प्रकारची निधीची कमतरता नसून १७ विभागाद्वारे आदिवासी विभागाच्या योजना या प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा आदिवासी विभागाने संकल्प केल्याचे त्यांनी सांगितले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या देशातील कोणताही आदिवासी व्यक्ती शासकीय योजनांपासून वंचित राहू नये यासाठी ''प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान'' हाती घेतले आहे. हे अभियान अधिक सक्षमपणे संपूर्ण राज्यात प्रभावीपणे राबविले जात असल्याचे ते म्हणाले.

आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्या हस्ते शाळेतील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली.

# एटीएसचे विशेष पोलीस महानिरीक्षक मीणा यांची श्री राजराजेश्वर मंदिरास भेट



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला , दि. २७ :** मुंबई येथील दहशतवादविरोधी पथकाचे विशेष पोलीस महानिरीक्षक आणि अकोल्याचे माजी पोलीस अधीक्षक मीणा यांनी गुरुवारी सकाळी अकोल्यातील ऐतिहासिक व प्राचीन श्री राजराजेश्वर मंदिरास भेट देत श्रींचे दर्शन घेतले.

या प्रसंगी श्री राजेश्वर संस्थानतर्फे त्यांचा शाल, श्रीफळ व श्री राजेश्वराची प्रतिमा देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थानचे पदाधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती. त्यांच्या आगमनावेळी माऊली बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष प्रा. हरीश बुंदेले आणि ज्येष्ठ पत्रकार विजय केंदरकर यांनी त्यांचे स्वागत केले. यानंतर मीणा साहेबांनी विधिवत पूजा, अभिषेक करत श्रींचे दर्शन घेतले. गौरवाची बाब म्हणजे अकोल्यात कार्यरत असताना मीणा दर सोमवारी श्री राजेश्वराचे नियमित दर्शन घेत असत. त्यांच्या या श्रध्दास्थळाबद्दलच्या निष्ठेची प्रचिती आज पुन्हा एकदा दर्शनाने झाली. या विशेष भेटीनिमित्त मंदिर परिसरात उत्साही वातावरण पाहायला मिळाले.

# गुणवंतांचा गौरव सोहळा २९ जूनला; मंत्री गोरे राहणार प्रमुख पाहुणे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

## अ.भा. माळी महासंघाच्या पत्रकार परिषदेत माहिती




**अकोला, दि. २७ :** गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी अखिल भारतीय माळी महासंघ अकोला जिल्ह्याच्या वतीने २० वा गुणवंत विद्यार्थी कौतुक सोहळा व पालक मेळावा रविवार, २९ जून रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत प्रमिलाताई ओक सभागृह, अकोला येथे आयोजित करण्यात आला आहे. याबाबतची सविस्तर माहिती शुक्रवारी २७ जून रोजी सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या पत्रकार परिषदेत जिल्हाध्यक्ष ॲड. प्रकाश दाते यांनी दिली. यावेळी माजी आमदार बळीराम सिरस्कार, सुभाष सातव,जयंत मसने सह कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री मा. जयकुमार गोरे यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी शंकरराव गिन्हे तर प्रमुख अतिथी म्हणून अ.भा. माळी महासंघाचे राष्ट्रीय सरचिटणीस सुभाषराव सातव आणि केंद्रीय कार्यकारिणी सदस्या श्रीमती वनिताताई राऊत यांची उपस्थिती लाभणार आहे.

गुणवंत विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी ललित ट्युटोरियलचे संचालक प्रा. ललित काळपांडे हे प्रमुख मार्गदर्शक वक्ते असतील. दहावीमध्ये ८५% पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या १४८, बारावीमध्ये ७५% पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या ५७ तसेच जेईई, नीट, सीईटी परीक्षांमध्ये यश संपादन करणाऱ्या ३४ विद्यार्थ्यांचा सन्मान स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला माजी राज्यमंत्री सुधाकरराव गणगणे, माजी आमदार लक्ष्मणराव तायडे, महापौर अर्चनाताई मसने, जि.प. अध्यक्षा संगिताताई अढाऊ, निवृत्त न्यायमूर्ती बाळासाहेब उर्फ संजय मेहरे, काँग्रेसचे प्रकाश तायडे, महेश गणगणे, शिवसेनेचे प्रा. डॉ. संतोष हुरो, युवा सेनेचे दिपक बोचरे, वंचित बहुजन आघाडीचे ॲड. संतोष राहाटे, भाजपचे जयंतराव मसने आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार असल्याची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन अखिल भारतीय माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष ॲड. प्रकाश दाते यांच्या नेतृत्वात होत असून, मुख्य संयोजक नंदकिशोर बहादुरे, मुख्य संयोजिका प्रणिता समरीतकर, समन्वयक बाळासाहेब ठाकरे, कल्पना भराड यांच्यासह प्रा. डॉ. नितीन देऊळकार, प्रा. अशोक राहाटे, मनोहर उगले, संजय तडस, सुनिल जाधव, सुनिल उंबरकर आदी पदाधिकारी तयारीत गुंतले आहेत. महिला आघाडीतून भारती शेंडे, साक्षी राऊत, कल्पना तायडे, सुनिता सातव,लिना देऊळकार आदींचा सहभाग आहे. माळी महासंघाची सामाजिक बांधिलकी जोपासत गेली २० वर्षे गुणवंत विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी कौतुक सोहळ्याचे आयोजन केले जाते, असेही ॲड. प्रकाश दाते यांनी सांगितले.

**Change of Name &Date of Birth**

I, Kalabai Digambar Umale, Mother of NO-JC-573626H Nb/Sub. Umale Satyapal Digambar, Resi. Villege Borwakadi, Post Paras, Tehsil Balapur Dist Akola ( Maharashtra) pin 444109 have Change my name from Kalavati to Kalabai Digambar Umale and my Date of Birth from 28.08.1960 to 01.01.1969. vide Affidavit before Notary (Govt. of India )at Akola. (No. 4797/27/06/2025)

# अगोदर इराणवर बॉम्बहल्ले अन् आता ट्रम्पने उघडली तिजोरी?

**वॉशिंग्टन, दि.२७ वृत्तसंस्था**

गेल्या दोन आठवड्यांपासून इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यात खूप तणाव आहे. इस्रायल आणि इराणमधील युद्धात अमेरिकाही उतरली होती. त्यांनी इराणवर हल्ला केला होता. मात्र, आता एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. व्हाईट हाऊसने म्हटले आहे की, ते इराणसोबत राजनैतिक संबंधांच्या मार्गावर आहेत. अमेरिकेने इराणला सुमारे ३० अब्ज डॉलर्सचा करार करण्याची ऑफर दिल्याची माहिती समोर आली आहे.मात्र, याबद्दल कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

एका इंग्रजी वृत्तवाहिनीच्या वृत्तानुसार, अमेरिका आणि इराणमध्ये पडद्यामागे चर्चा सुरू आहे. अमेरिका आता

## इस्रायलसोबत मोठा विश्वासघात

इराणमध्ये सुमारे २० ते ३० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करू शकते.'' असे म्हटले जात आहे. धक्कादायक गोष्ट अशी आहे की अमेरिका त्यांच्या अणुकार्यक्रमात गुंतवणूक करण्याचा विचार करत आहे, परंतु हे फक्त नागरी अणुऊर्जेच्या वापरासाठी असेल. अमेरिका हे पैसे स्वतः देण्याऐवजी अरब देशांमधून पाठवू शकते अशी शक्यता देखील वर्तवण्यात येत आहे.



दुसरीकडे, इराणच्या परराष्ट्रमंत्र्यांनी अमेरिकेबद्दल वेगळेच काही म्हटले आहे. परराष्ट्रमंत्री सईद अब्बास अराघची यांनी दावा केला आहे की अमेरिकेशी पुन्हा चर्चा सुरू झालेली नाही. एका वृत्तसंस्थेने सरकारी प्रसारक आयआरआयबीच्या हवाल्याने ही माहिती दिली आहे. अराघची म्हणाले की,''चर्चा पुन्हा सुरू करण्याची शक्यता विचारात घेतली जात आहे, परंतु ते तेहरानचे राष्ट्रीय हितसंबंध जपले जातात की नाही यावर ते अवलंबून असेल.''पुढे त्यांनी ''आमचे निर्णय केवळ इराणच्या हितसंबंधांवर आधारित असतील. जर आमच्या हितसंबंधांना चर्चेत परतण्याची आवश्यकता असेल तर आम्ही त्यावर विचार करू. परंतु या टप्प्यावर, कोणताही करार किंवा आश्वासन झालेले नाही आणि कोणतीही चर्चा झालेली नाही.'' असेही त्यांनी यावेळी म्हटले.

## थोडक्यात

### भारताचे संयुक्त राष्ट्रात पाकिस्तानवर जोरदार आरोप



**न्यूयॉर्क :** देशातील मुलांची बिकट स्थिती आणि दहशतवादाकडे काणाडोळा करणाऱ्या पाकिस्तानला भारताने संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेमध्ये खडे बोल सुनावले. 'पाकिस्तान आपल्या देशातील मुलांवरील अत्याचाराच्या मुद्द्यावरून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करीत आहे.याबाबत संयुक्त राष्ट्रांच्या संकेतांनाही पाकिस्तानने धुडकावून लावले आहे,' अशा शब्दांत भारताचे संयुक्त राष्ट्रातील स्थायी प्रतिनिधी राजदूत पी. हरीश यांनी भूमिका मांडली. संयुक्त राष्ट्रांमध्ये 'मुले आणि सशस्त्र संघर्ष' या विषयावरील वार्षिक खुल्या चर्चासत्रात बोलताना हरीश म्हणाले, ''मी पाकिस्तानच्या प्रतिनिधीने केलेली टिप्पणी नाकारतो.यामागे निव्वळ राजकीय हेतू आहे. याबाबत संयुक्त राष्ट्रांच्या अजेंड्याचे पाकिस्तान उल्लंघन करीत असून, पाकिस्तान संयुक्त राष्ट्रांच्या प्रक्रियेवर चुकीचे आरोप करत आहे. आपला घृणास्पद मुद्दा पुढे रेटण्यासाठी पाकिस्तान विविध चर्चांमध्ये भारताची बदनामी करत आला आहे. या कृत्याद्वारे पाकिस्तान स्वतःच्याच देशात मुलांवर होत असलेल्या अत्याचारांपासून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करत आहे. ''हरीश म्हणाले, ''पाकिस्तान प्रशिक्षण घेतलेल्या दहशतवाद्यांनी पहलगाम येथे केलेला हल्ला जग विसरलेले नाही. मुले आणि सशस्त्र संघर्ष याबाबतच्या संयुक्त राष्ट्रांच्या अहवालात पाकिस्तानातील सशस्त्र संघर्षामध्ये मुलांवर झालेल्या परिणामांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

### कोट्यवधी रूपयांच्या ३००० हून अधिक कार समुद्रात गडप



**वॉशिंग्टन :** मॉर्निंग मिडास नावाचे एक कार्गो जहाज, ज्यामध्ये ३००० पेक्षा अधिक वाहने होती, ते अखेर २३ जून रोजी खोल समुद्रात बुडाले. हे जहाज चीनमधील यान्टाईहून मेक्सिकोमधील लाझारो कार्दे नास बंदराकडे जात असताना, सुमारे तीन आठवड्यांपूर्वी त्यावर आग लागली होती. सुदैवाने, जहाजावरील सर्व २२ क्रू सदस्यांना सुरक्षितपणे वाचवण्यात आले.३ जून रोजी जहाजावर आग लागली होती. ही आग जहाजाच्या एका डेकवर ठेवलेल्या इलेक्ट्रिक वाहनांमुळे लागल्याचे निष्पन्न झाले आहे.इलेक्ट्रिक वाहनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या लिथियम-आयन बॅटऱ्यांमुळे आग लागण्याचा धोका अधिक असतो, विशेषतः त्या बॅटऱ्या खराब झाल्यास. त्यातूनच ही आग लागल्याचा संशय आहे. ५ जून रोजी जहाजावरून २२ क्रू सदस्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. त्यांनी लाईफबोटद्वारे जहाज सोडले आणि जवळच असलेल्या नावाच्या कंटेनर जहाजाने त्यांना वाचवले. अमेरिकन कोस्ट गार्डने बचाव कार्यात सहभाग घेतला आणि आवश्यक तांत्रिक सहाय्य दिले.अलिआन्झ या आंतरराष्ट्रीय विमा कंपनीच्या अहवालानुसार, लिथियम-आयन बॅटऱ्यांच्या वाहतुकीमुळे समुद्री वाहतूक अधिक धोकादायक बनत आहे. बॅटरीमधील संभाव्य स्फोट आणि आग लागण्याची शक्यता असते.


### हिंदी सक्तीविरोधात भाजप पदाधिकाऱ्याने दिला राजीनामा

**डोंबिवली:** इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला राजकीय क्षेत्रातून विरोध केला जात आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी हिंदी सक्ती विरोधात रणशिंग फुंकले आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हेही राज यांच्या सोबत उभे राहिले असून मराठी बांधवांनी एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. हिंदी सक्तीच्या मुद्द्यावर भाजप पदाधिकाऱ्यांनी पक्षाचा पदाचा राजीनामा देत मराठी भाषेसाठी मनसेचा हात धरला आहे. भाजपाचे दिवा मंडळाचे कायदा सेल संयोजक ॲड. रविराज बोटले यांनी पक्षातील पदाचा राजीनामा दिला आहे. ५ जुलैला ते मोर्चात कार्यकर्त्यांसह मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे डोंबिवली नंतर दिव्यातून भाजपला हा दुसरा धक्का बसला असून भाजपला घरचा आहेर मिळाला असल्याचे बोलले जात आहे.

## अमरनाथ यात्रेकरूंमध्ये यंदा दहा टक्के घट

### नायब राज्यपालांची माहिती, यात्रेकरूंसाठी अधिक सुरक्षा

**श्रीनगर , दि.२७ वृत्तसंस्था**



पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर अमरनाथ यात्रेला येणाऱ्या भाविकांची संख्या यंदा दहा टक्क्याने घटल्याची माहिती जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी गुरुवारी दिली.

पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी हल्ला होण्याआधी अमरनाथ यात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी भरपूर मोठ्याप्रमाणात नोंदणी सुरू होती. मात्र, हल्ल्यानंतर अमरनाथसाठी नोंदणी करणाऱ्यांच्या संख्येत घट झाली.

मागील वर्षाच्या तुलनेत यंदा अमरनाथला जाणाऱ्या भाविकांच्या संख्येत तब्बल १०.१९ टक्क्यांनी घट झाली असल्याचे सिन्हा यांनी राज भवन येथे पत्रकारांशी बोलताना सांगितले. पहलगाम हल्ल्या आधी सुमारे २.३६ लाख भाविकांनी अमरनाथ यात्रेसाठी नोंदणी केली होती.

यापैकी ८५ हजार भाविकांना ते यात्रेला येणार असल्याचे प्रशासनाकडे नोंदविले आहे. पहलगाम हल्ल्यानंतर प्रशासनाने येथील सुरक्षा व्यवस्थेत सुधारणा केल्याने एवढ्या संख्येने भाविकांनी यात्रेला येण्याचा निर्णय घेतला आहे, असे सिन्हा यांनी सांगितले.

तीन जुलै ते ९ ऑगस्ट यादरम्यान होणाऱ्या अमरनाथ यात्रेसाठी प्रशासनाच्या वतीने भाविकांसाठीच्या बेसकॅम्पवर त्रिस्तरीय सुरक्षा तैनात करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे आसपासच्या परिसरातही सुरक्षा यंत्रणांकडून गस्त घालण्यात येत आहे.

## पुरीच्या जगन्नाथ मंदिरात नबजौबन दर्शनासाठी भाविकांचा प्रतिसाद

**पुरी, दि.२७ वृत्तसंस्था**



जगन्नाथ पुरी येथे भगवान जगन्नाथ, भगवान बलभद्र आणि देवी सुभद्रा यांच्या रथयात्रेच्या आदल्यादिवशी रत्न बेदी येथे होणाऱ्या नबजौबन दर्शनासाठी हजारो भाविकांनी मंदिराच्या सिंहद्वाराजवळ पहाटेपासूनच गर्दी केली होती.

सकाळी आठ ते साडे दहा या वेळात नबजौबन दर्शनासाठी मंदिर उघडण्यात आल्याची माहिती मंदिर प्रशासनाच्या वतीने देण्यात आली. सकाळी पारमाणिक दर्शनार्थींना मंदिरात सोडण्यात आले तर नऊ ते साडे दहा यावेळात इतर सर्व दर्शनार्थींना मंदिरात सोडण्यात आले. नबजौबन दर्शनावेळी भगवान जगन्नाथ, भगवान बलभद्र आणि देवी सुभद्रा यांना उत्सवी पोशाख घालण्यात येतो, त्याला नबजौबन भेश असे म्हटले जाते.त्याचप्रमाणे याच दिवसाला नेत्र उत्सव असेही संबोधतात. कारण, याच दिवशी देवाच्या मूर्तींवरील डोळे रंगविले जातात.नबजौबन दर्शनानंतर मंदिर दिवसभरासाठी बंद ठेवण्यात येते. त्यानंतर दिवसभरासाठी देवाचा रथ हा मंदिराच्या मुख्य द्वारासमोर ठेवण्यात येतो. शुक्रवारी (ता.२७) होणाऱ्या रथ यात्रेची सर्व तयारी पूर्ण झाली असून, लाखो भाविक या यात्रेत सहभागी होण्यासाठी पुरी येथे दाखल झाले आहेत, अशी माहिती प्रशासनाच्या आणि मंदिर व्यवस्थापन समितीच्या वतीने देण्यात आली आहे.ज गन्नाथ पुरी येथील रथयात्रेदरम्यान अदानी उद्योग समूहाकडून भाविकांसाठी आणि येथे तैनात असलेल्या सुरक्षा व्यवस्था तसेच प्रशासकीय व्यवस्थापनातील कर्मचाऱ्यांसाठी अन्नदान सेवा देण्यात येणार आहे. २६ जून ते ८ जुलै कालावधीत चाळीस लाख भाविकांसाठी भोजन व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली.

## ढाकामध्ये दुर्गा मंदिराची तोडफोड; हिंदू सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर


**ढाका दि.२७ वृत्तसंस्था**

बांगलादेशातील हिंदू समाजावर पुन्हा एकदा धार्मिक असहिष्णुतेचा हल्ला झाला असून, राजधानी ढाका येथील खिलखेत परिसरात दुर्गा माता मंदिराची तोडफोड करण्यात आली आहे. या घटनेवर भारताने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत, बांगलादेशच्या अंतरिम सरकारवर सुरक्षा पुरवण्यात अपयश आल्याचा आरोप केला आहे. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने बांगलादेशला स्पष्ट शब्दांत सुनावले असून, हिंदू समाजाच्या संरक्षणासाठी जबाबदारीचे भान राखण्याचे आवाहन केले आहे.



ढाकामधील खिलखेत परिसरात असलेल्या दुर्गा मंदिरावर अतिरेकी गटांकडून दीर्घकाळ धमक्या येत होत्या, असेही समोर आले आहे. यासंदर्भात भारताने माहिती दिली की, अतिरेकी घटक या मंदिराच्या विध्वंसाची मागणी करत होते. मात्र, सुरक्षा पुरवण्याऐवजी, बांगलादेश सरकारने या मंदिराच्या बांधणीस 'बेकायदेशीर' घोषित करून त्याच्या पाडण्यास परवानगी दिली. परिणामी, मूर्ती सुरक्षितपणे काढण्याआधीच मंदिराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.भारताचे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी या घटनेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी म्हटले, ''बांगलादेशातील हिंदू आणि त्यांच्या धार्मिक स्थळांचे संरक्षण करणे ही तिथल्या सरकारची जबाबदारी आहे. अशा घटना वारंवार घडत असलेल्या पाहून आम्हाला गंभीर चिंता वाटते.'' जयस्वाल यांनी ही घटना फक्त धार्मिक असहिष्णुतेपुरती मर्यादित नसून, भारत-बांगलादेश संबंधांवरही त्याचा प्रतिकूल परिणाम होऊ शकतो, असेही स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले, ''भारत सर्व मुद्द्यांवर संवादासाठी तयार आहे, पण त्यासाठी सकारात्मक आणि सुरक्षित वातावरण आवश्यक आहे.''या पार्श्वभूमीवर भारताने पुन्हा एकदा द्विपक्षीय चर्चेच्या गरजेवर भर दिला आहे. गेल्या काही महिन्यांपासून भारत आणि बांगलादेश दरम्यान व्यापार, जलवाटप आणि सीमारेषेवरील अस्थिरतेसंदर्भात विविध मुद्द्यांवर चर्चा सुरु आहे.

## जगन्नाथ रथयात्रेत ३ हत्ती बिथरले; सैरावैरा धावू लागल्याने अनेक जण जखमी



**अहमदाबाद , दि.२७ वृत्तसंस्था**

गुजरातमधील अहमदाबादमध्ये जगन्नाथ रथयात्रेत आज (दि. २७) सकाळी थरकाप उडवणारी घटना घडली. रथयात्रेत सहभागी झालेले तीन हत्ती अचानक बिथरले आणि गर्दीतून सैरावैरा धावू लागले. या अनपेक्षित गोंधळामुळे हजारो भाविक जीव वाचवण्यासाठी धावू लागले, यात अनेकजण जखमी झाले. काही वेळ ही भव्य यात्रा भयावह परिस्थितीत बदलली. या घटनेचा व्हिडिओ आता सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. शुक्रवारी सकाळी १०.१५ वाजता रथयात्रा शहरातील खाडिया परिसरातून जात असताना ही घटना घडली. रथयात्रेच्या मार्गावर अचानक घडलेल्या या प्रकारामुळे भाविकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले. ''एका क्षणी आम्ही जल्लोष करत होतो आणि दुसऱ्याच क्षणी हत्ती आमच्या दिशेने धावत होते,'' असे यात्रेत सहभागी झालेले भाविक रमेश भाई यांनी सांगितले. ''प्रत्येकजण जीव वाचवण्यासाठी धावत होता. माझ्या काळजाचा ठोकाच चुकला. काही वेळ काय होत आहे, हेच कळत नव्हते'' असे त्यांनी सांगितले. या घटनेमुळे रथयात्रेच्या मार्गावर काही काळ गोंधळ आणि धावपळ सुरू होती.

**मोठा अनर्थ टळला**

पोलिसांनी लोकांना लांब राहण्याचे आवाहन केले. माहूतांनी हत्तीचा पाठलाग केला आणि त्यांना नियंत्रणात आणले. प्रशासनाने दाखवलेल्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली. पोलीस आणि स्वयंसेवकांनी तातडीने परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. हत्तींना आणखी चिथावणी मिळू नये म्हणून तात्काळ शिट्ट्या वाजवणे थांबवण्याचे निर्देश देण्यात आले.

## न्यायालयाच्या ऑनलाइन सुनावणीत चक्क टॉयलेटमधून लाईव्ह

**अहमदाबाद, दि.२७ वृत्तसंस्था**

गुजरात उच्च न्यायालयात एका व्हर्च्युअल सुनावणीदरम्यान घडलेला अजब प्रकार सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल झाला आहे. या व्हिडीओमध्ये एक व्यक्ती, न्यायालयीन कार्यवाहीदरम्यान थेट टॉयलेट सीटवर बसलेला दिसत आहे. आणखी धक्कादायक म्हणजे, तो त्यावेळी स्वतःला साफ करतानाही कॅमेऱ्यात कैद झाला.ही घटना २० जून रोजी न्यायमूर्ती निझार एस. देसाई यांच्या खंडपीठासमोर घडली. व्हिडीओच्या सुरुवातीला सरमद बॅटरी या नावाने लॉगिन केलेला व्यक्ती ब्लूटूथ इयरफोन घालून दिसतो.थोड्या वेळाने त्याने आपला मोबाईल थोडा लांब ठेवला आणि त्यातून दिसून आले की तो प्रत्यक्षात टॉयलेटवर बसलेला आहे. त्यानंतर तो साफसफाई करून टॉयलेटमधून बाहेर पडतो आणि थोडा वेळ ऑफ-स्क्रीन राहत पुन्हा दुसऱ्या खोलीत दिसतो.

## मतदान केद्रांवरील सीसीटीव्ही फुटेजही द्यावे

### काँग्रेसची निवडणूक आयोगाकडे मागणी

**नवी दिल्ली, दि.२७ वृत्तसंस्था**

निवडणूक प्रक्रियेशी संबंधित मुद्द्यांच्या हाताळणीसाठी काँग्रेसने तयार केलेल्या ईगल समूहातर्फे माध्यम व प्रचार विभागाचे अध्यक्ष पवन खेडा यांनी हे पत्र पाठविले आहे. या पत्रात म्हटले आहे की, निवडणूक आयोगाने एक आठवड्याच्या आत डिजिटल मतदार यादी आणि सीसीटीव्ही चित्रणाचा तपशील पाठवावा. तो तपासून पाहिल्यानंतर आयोगासोबत चर्चा करण्यात येईल. निवडणूक आयोगावर प्रश्न उपस्थित करणाऱ्या विरोधी पक्षनेते राहुल गांधींना आयोगाने पत्र पाठविले होते. तसेच राहुल गांधींना आयोगाने शंकानिरसनासाठी निमंत्रणही दिले होते. त्या पत्राच्या उत्तरादाखल 'ईगल' समूहाने आजचे पत्र पाठविल्याचे मानले जात आहे.




पवन खेडा यांनी सांगितले, की महाराष्ट्रात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांसाठीच्या डिजिटल, यंत्राद्वारे वाचण्यायोग्य- मतदारयादी तसेच सीसीटीव्ही चित्रण मिळावे अशी मागणी आयोगाकडे केली. या दोन्ही निवडणुकांमध्ये पाच महिन्यांचे अंतर होते. त्या पाच महिन्यांत चाळीस लाख नवे मतदार जोडले गेले, म्हणूनच प्रथम डिजिटल, यंत्राद्वारे वाचण्यायोग्य मतदारयादी उपलब्ध करून द्यावी. यासोबतच, महाराष्ट्र व हरियाना विधानसभा निवडणुकीच्या मतदान केद्रांवरील सीसीटीव्ही फुटेजही द्यावे. त्यानंतर काँग्रेस पराभव मान्य करण्यास तयार राहील, असे पवन खेडा यांनी म्हटले.

## लाडकी बहीण योजनेचे ३००० रुपये एकाचवेळी होणार महिलांच्या खात्यात जमा?

**मुंबई, दि.२७ वृत्तसंस्था**

लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केले जातात. मात्र, जून २०२५ चा हप्ता अद्याप जमा न झाल्याने महिलांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. जून महिना संपण्यास आता फक्त तीन दिवस शिल्लक असताना, जून आणि जुलैचे हप्ते एकत्र जमा होण्याची चर्चा जोर धरू लागली आहे. यामुळे महिलांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. सरकारकडून याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा न झाल्याने संभ्रम वाढत आहे.



लाडकी बहीण योजनेच्या आतापर्यंतच्या प्रवासात अशा घटना घडल्या आहेत, जिथे दोन महिन्यांचे हप्ते एकाच वेळी जमा करण्यात आले. उदाहरणार्थ, मे २०२५ चा हप्ता जूनच्या पहिल्या आठवड्यात जमा झाला होता. त्यामुळे आता जून आणि जुलैचे हप्ते एकत्र, म्हणजेच ३००० रुपये, जुलै महिन्यात जमा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यापूर्वीच्या अनुभवांमुळे ही शक्यता नाकारता येत नाही, परंतु सरकारने याबाबत स्पष्टता आणणे गरजेचे आहे.महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी यापूर्वी लाडकी बहीण योजनेच्या हप्त्यांबाबत स्वत: घोषणा केल्या आहेत. त्यानंतरच संबंधित हप्त्याची रक्कम महिलांच्या खात्यात जमा होते. मात्र, जून २०२५ च्या हप्त्याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. जून महिना संपण्यास अवघे काही दिवस शिल्लक असताना, सरकारकडून लवकरात लवकर घोषणा होणे अपेक्षित आहे.लाडकी बहीण योजनेची सुरुवात जुलै २०२४ मध्ये झाली. तेव्हापासून आतापर्यंत पात्र महिलांना एकूण ११ हप्ते मिळाले आहेत. जुलै २०२४ ते मे २०२५ या कालावधीत प्रत्येक महिन्याचा हप्ता नियमितपणे जमा करण्यात आला आहे.

### जून-जुलैचे हप्ते एकत्र मिळण्याची शक्यता

जून महिना संपण्यास आता फक्त तीन दिवस शिल्लक आहेत. अशा परिस्थितीत जूनचा हप्ता स्वतंत्रपणे जमा होण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे जून आणि जुलैचे हप्ते एकत्रितपणे, म्हणजेच ३००० रुपये, जुलै महिन्यात जमा होण्याची शक्यता आहे. यापूर्वीही असा अनुभव आल्याने ही शक्यता नाकारता येत नाही. तरीही, सरकारने याबाबत अधिकृत माहिती जाहीर करावी, अशी मागणी महिलांकडून होत आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## यूँ ही चला चल!

विविध शोध आणि संशोधनाच्या हेतूने जगातील अनेक देश अंतराळमोहिमा राबवितात. सोव्हिएत रशियाने १९५० च्या दशकात पहिले अवकाशयान सोडल्यानंतर भेदरलेल्या अमेरिकेने प्रचंड मोठा अंतराळ प्रकल्प हाती घेतला. १९६० चे दशक संपायच्या आत अमेरिकन माणूस चंद्रावर उतरेल, अशी घोषणा तेव्हाचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी यांनी केली. त्यानुसार १९६९ मध्ये नील आर्मस्ट्राँग चंद्रावर उतरले. त्यानंतर गेल्या अनेक वर्षात इतकी अवकाशयाने आणि उपग्रह हवेत सोडले गेले आहेत की, त्यांची मोजदादच करता येणार नाही. संदेशवहन, दळणवळण, माहिती प्रक्षेपण या सर्व क्षेत्रांत प्रगती करायची असेल, तर अंतराळमोहिमा चालूच ठेवाव्या लागतील. या क्षमता संपादन केल्याशिवाय भारत खऱ्या अर्थाने समर्थ आणि समृद्ध होऊ शकणार नाही, याचे भान ठेवत ही योजना आखली गेली. या पार्श्वभूमीवर, भारताच्या हवाई दलातील ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांच्यासह चार अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाकडे रवाना झाले. भारताच्या राकेश शर्मा यांच्यानंतर ४१ वर्षांनी शुक्ला यांनी अवकाशात झेप घेतली, त्यामुळे साहजिकच अवघ्या भारतात याचे कौतुकमिश्रित स्वागत झाले. पृथ्वीपासून २०० किलोमीटर अंतरावरील कक्षेत 'ड्रॅगन' अवकाशकुपी नेल्यानंतर, ॲक्सिओम-४ मोहिमेंतर्गत स्पेस एक्सचे फाल्कन-९ रॉकेट फ्लोरिडामधील केनेडी अवकाश केंद्रातून अंतराळवीरांना घेऊन उडाले. या मोहिमेचे सारथ्य कॅ. शुक्ला करीत आहेत. हे अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाकडे जातील आणि तेथे १४ दिवस राहतील. अंतराळवीरांनी त्यांच्या अवकाशकुपीचे नाव 'ग्रेस' असे जाहीर केले. मोहिमेत पोलंड आणि हंगेरीचे अंतराळवीरही आहेत. भारत १९८४ नंतर, पोलंड १९७८ नंतर आणि हंगेरी १९८० नंतर पुन्हा अवकाशात गेले आहेत. त्यामुळे या तिघांच्या दृष्टीने मोहिमेचे महत्त्व आगळेवेगळे आहे. आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात जाणारे कॅ. शुक्ला हे पहिले भारतीय अंतराळवीर ठरले आहेत. हा प्रवास १४० कोटी भारतीयांचा आहे, अशी सार्थ प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली आहे. यापूर्वी राकेश शर्मा १९८४ मध्ये सोव्हिएत संघाच्या सॅल्यूत-७ अवकाश केंद्रात होते. 'आम्ही सेकंदाला ७.५ किलोमीटर वेगाने पृथ्वीभोवती कक्षेत फिरत आहोत. माझ्या खांद्यावर असलेला भारताचा तिरंगा मला सांगतो की, तुम्ही एकटे नाही आहात. या प्रवासात सर्व भारतीय तुमच्यासोबत आहेत. हा केवळ माझ्या एकट्याच्या आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकातील प्रवासाचा आरंभ नसून, भारताच्या महत्त्वाकांक्षी अवकाश कार्यक्रमाची सुरुवात आहे. देशातील सर्व नागरिकांनी या प्रवासाचा भाग व्हावे, ही माझी इच्छा आहे,' अशी भावना शुक्ला यांनी व्यक्त केली आहे. एखाद्या वैज्ञानिकात अथवा अंतराळवीरात राष्ट्रप्रेमाची भावना असली, तर त्याच्यात कशी जिगर आणि ऊर्जा येते, याचेच कॅ. शुक्ला हे मूर्तिमंत उदाहरण. अंतराळातून आपला भारत 'सारे जहाँ से अच्छा' दिसतो, असे आपले पंतप्रधान व तमाम भारतीयांसह जगाला अभिमानाने सांगणाऱ्या राकेश शर्मांनी २ ते ८ एप्रिल १९८१ दरम्यान टी-११ या रशियाच्या अंतरिक्ष यानातून सात दिवस यशस्वी प्रवास केला आणि असा प्रवास करणारे ते पहिले भारतीय ठरले होते. सोयुझ-टी-११ यानाने राकेश आणि दोन रशियन अंतराळवीरांना घेऊन अंतराळात यशस्वी झेप घेतली होती. नंतर या यानाच्या सॅल्यूत-७ या अंतरिक्ष स्थानकामध्ये राकेश यांनी ७ दिवस वास्तव्य केले आणि नंतर हे यान परतले होते. सॅल्यूत-७ मधून केलेल्या प्रवासादरम्यान त्यांनी उत्तर भारताची बहुवर्णीय छायाचित्रे घेतली होती. त्यावेळी हिमालयाच्या भागात जलविद्युत केंद्रे उभारण्याच्या योजना विचाराधीन होत्या. त्यासाठी त्यांनी ही छायाचित्रे घेतली होती. आज मात्र कॅ. शुक्ला अंतराळात गेले असतानाच इस्रोने अवकाश तंत्रज्ञानात विलक्षण झेप घेतली आहे. २०२७ मध्ये भारताचे 'गगनयान' उडणार आहे. कॅ. शुक्लांच्या या मोहिमेत सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात बियाण्यांच्या वाढीसंदर्भात मौलिक माहिती गोळा केली जाणार आहे. भविष्यात अवकाशात शेतीसाठी पर्याय शोधला जाणार आहे. अंतराळातील धोकादायक वातावरणात कोणते जीवाणू सुरक्षित राहू शकतात, हे जाणून घेण्याचाही प्रयत्न केला जाईल. शून्य गुरुत्वाकर्षणात मानवी शरीरावर नेमके कोणते परिणाम होतात, हे जाणून घेण्याचाही या मोहिमेत प्रयत्न केला जाणार आहे. सूक्ष्म गुरुत्वाकर्षणाचा डोळ्यांवर होणाऱ्या परिणामांवरही अभ्यास केला जाणार आहे. पृथ्वीवर आणि शून्य गुरुत्वाकर्षणात वाढणाऱ्या पिकांच्या पोषणातील फरक समजून घेण्याबाबतही संशोधन केले जाणार आहे. युरिया आणि नायट्रेटमध्ये सायनो बॅक्टेरिया वापरून, अंतराळाच्या शून्य गुरुत्वाकर्षणात अन्न आणि ऑक्सिजन एकाच वेळी तयार करता येते का, हेही पाहण्याचा प्रयोग केला जाणार आहे. शेवटी मानवी आकांक्षा असीम आहेत. 'आकांक्षापुढती असे गगन ठेंगणे' असे म्हटले जाते. अंतराळयानाच्या प्रक्षेपणाच्या दिवशी कॅ. शुक्ला यांनी 'स्वदेस' चित्रपटातील 'यूँ ही चला चल' हे गाणे ऐकले. त्यांचा स्वतःचा व त्यांच्या टीमचा प्रवासही असाच आहे. त्यांना यश येवो अशा संपूर्ण देशवासियांच्या शुभेच्छा त्यांच्या पाठीशी आहेतच.

## भाषा सत्ती



लक्ष्यभेद
जयदीप सोनखासकर
9890508017

मराठी साहित्याच्या राज्यात
आता होत आहे भाषा सत्ती
कोण करेल प्रयोग साहित्यात
ही का राज्यकर्त्यांची शक्ती ?


साहित्य वीर होऊन गेले
समृद्ध करण्या मराठी भाषा

आज मात्र का लादत आहे
आवडीची आपली हिंदी भाषा

गौण नाही राष्ट्रीय भाषेचे
मग किती राज्य पाळतात
खरोखर महत्त्व राष्ट्रभाषेचे
राज्यकर्ते तळ्यात पाहतात

## ।। अभंगवाणी ।।

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१



इतके निकोप
आम्हाला करावे ।
मलिन नसावे
कणभर ।।

मन फळ्यावर
शाबूत राहिले ।
जे होते लिहिले
करुणेने ।।

लिनतेची व्याख्या
पुसलीच जर ।
दावू तळघर
मनातील ।।

रंगत रंगत
मनातून येते ।
गोंधळ घालते
एक इच्छा ।।

# भारताचा तुर्कीला इशारा



आंतरराष्ट्रीय

भालचंद्र ठोंबरे
९८३४३५०८९५




कॅनडामध्ये जी ७ च्या परिषदेला जाता जाता मोदींनी सायप्रसला भेट देऊन भारताच्या बदलत्या धोरणाचे संकेत देतांनाच पाकला भारताविरुद्ध प्रत्यक्ष मदत करणाऱ्या तुर्कीला एक प्रकारे इशारा दिला आहे.

ज्या तुर्कीला २०२३ मध्ये तुर्कीत आलेल्या भूकंपात भारताने ''ऑपरेशन दोस्त'' राबवून बचाव पथके, वैद्यकीय मदत, व इतर आवश्यक सामग्री पाठवून मदत केली होती. त्याच तुर्कीने पाकिस्तानने भारतात दहशतवादी कारवाया केल्या असता भारताने पाक विरुद्ध केलेल्या ''ऑपरेशन सिंदूर'' दरम्यान पाकीस्तानला ड्रोन देवून भारताविरुद्ध प्रत्यक्ष मदत करून आपला विश्वासघातकी स्वभाव उघड केला आहे. त्यामुळे तुर्कीचा शत्रू असलेला पण आधीपासूनच भारताचा मित्र असलेल्या सायप्रसला भेट देऊन शत्रूचा शत्रू तो मित्र या उक्ती प्रमाणे जर तुर्की पाकिस्तान सोबत असेल तर भारत सायप्रस सोबत आहे असा इशारा भारताने दिला आहे.

सायप्रस हा भूमध्य समुद्रातला तिसरा मोठा द्विप-देश आहे. ह्याच्या उत्तरेला तुर्कीए उत्तर पश्चिमेला ग्रीस, पूर्वेला सीरिया लेबनॉन व इस्त्राईल आहे, केवळ ९२५१ चौरस किमी. क्षेत्रफळ असलेल्या या देशाची लोकसंख्या २०२१ च्या गणनेनुसार ९२३२७२ आहे. यात मुख्यत्वे ग्रीक, तुर्की, अर्मेनियम व मेरोनाईट आदी जातींचा समावेश आहे. सायप्रसची राजधानी निकोलिया असून राजभाषा ग्रीक व तुर्की आहे. सायप्रस हा नाटो व युरोपीयन संघाचा सुद्धा सदस्य आहे. सायप्रसला जानेवारी २०२६ मधे युरोपीय संघाच्या अध्यक्षपदाची संधी मिळणार आहे.

### सायप्रस

सायप्रस वरील सत्तांतरे

वेळोवेळी अलेक्झांडर नंतर इजिप्त, रोमन, बायझेंटाईन, व्हेनिस आदी विविध राजसत्तेचा भाग राहीलेल्या सायप्रस वर १५७०-७१ साली ऑटोमन सेनेने हल्ला करून कब्जा केला. अनेक ग्रीक व अर्मेनियन ईसाईंना ठार केले. तसेच गैर मुस्लिमावर कडक बंधने लादली. १८२१ मध्ये ग्रीक मध्ये स्वातंत्र्य युद्धाची सुरुवात झाल्याने त्यात भाग घेण्यासाठी साईप्रस मधून अनेक ग्रीक, ग्रीस मध्ये गेले. ऑटोमनच्या राजेशाही विरुद्ध साईप्रस मधील ग्रीक व तुर्की जनतेने अनेक संघर्ष केले, पण ते विफल झाले. १८७७-७८ च्या रुसो- तुर्की- रोमानिया स्वातंत्र्य युद्धातील बर्लिन करारानुसार सायप्रस ब्रिटनच्या ताब्यात आले. १९१४ मध्ये सायप्रसला औपचारिक रित्या ब्रिटनच्या अधिपत्या खालील भाग घोषित करण्यात आले. ब्रिटिश शासन काळात सायप्रस मधील ग्रीक व तुर्की यांच्यामध्ये वैचारिक संघर्ष सुरू होते. ग्रीकांची सहानुभूती ग्रीसकडे होती, तर तुर्कांची तुर्कस्तान कडे. दुसऱ्या महायुद्धात सायप्रस चे ग्रीक व सायप्रस तुर्की हे सेनेत भरती झाले. १९५५ मध्ये ग्रीस समर्थकांनी इओकेए नामक सशस्त्र संघटना स्थापन केली तर तुर्की समर्थकांनी तुर्की प्रतिरोध संघटना टी एम टी ची स्थापना केली.

### तुर्कीने बळकावला सायप्रसचा भूभाग

१९६० मध्ये सायप्रस ब्रिटनच्या ताब्यातून स्वतंत्र झाला. त्यावेळेला त्याच्या लोकसंख्येत ग्रीक ७७.१%, तुर्क १८.२% ,व अन्य ४.७% होते. १५ जुलै १९७४ मध्ये ग्रीस समर्थित सेनेने शासनाचा तख्तापालट केला. तेव्हा यामुळे तुर्की जनतेवर अन्याय होत आहे, असा आरोप करून तुर्कीएने आपली सेना सायप्रस मध्ये घुसवून उत्तरेकडच्या बऱ्याचश्या भागावर बेकायदेशीररित्या कब्जा केला. तीन दिवसांनी युद्धबंदी झाली. त्यावेळेला सायप्रसचा उत्तरेकडचा जवळपास ३६ टक्के भाग तुर्की सेनेने ताब्यात घेतला होता. १९८३ मध्ये याच भागाला तुर्की गणराज्य म्हणून स्वतंत्र देश जाहीर करून तुर्कस्तानने स्वतः त्याला मान्यता दिली. मात्र सायप्रसच्या उत्तर भागावर तुर्कीचा असलेला हा कब्जा अवैध व बेकायदेशीर असल्याचे जगाचे म्हणणे आहे. त्यामुळे या नव्या राज्याला कोणीही मान्यता दिली नाही.

आज सायप्रस दोन भागात विभाजीत असून दक्षिण भाग हा ग्रीक रिपब्लिकन सायप्रस गणराज्य तर उत्तरेकडील तुर्कीए ने बळकावलेला ३६ टक्के भाग, याला तुर्कीए तुर्की गणराज्य म्हणतो. पण जगाला हे मान्य नाही.सर्व देशांनी याला बेकायदेशीर व अवैध म्हटले आहे. तुर्कीने आपल्या ताब्यातील भागातून दीड लाखाचे वर ग्रीकांना निष्कासित केले. तर ग्रीकांनी आपल्या दक्षिण सायप्रस मधून ५० हजाराचे वर तुर्कांना बाहेरचा रस्ता दाखविला. उत्तर व दक्षिण सायप्रस च्या मध्ये चार टक्के भाग हा बफर झोन म्हणून युनोच्या ताब्यात आहे. तर धेकेलीया व ॲक्रोटीरी भागात इंग्लंडचे सैनिकी तळ आहेत. यानंतर तुर्कीएने लाखो तुर्कांना उत्तर साईप्रसमध्ये आणून बसविले आज उत्तर सायप्रस मधून इसाई जनतेचा जवळपास पूर्ण सफाया करण्यात आला असून हा भाग तुर्की सेनेच्या ताब्यात आहे.अशीच परिस्थिती पाक व्याप्त काश्मीरातही आहे. पाकिस्तान पाकव्याप्त काश्मीर मधे पाक मुसलमानांना आणून बसविण्याचा सतत प्रयत्न पाकिस्तान करीत असतो. याच कारणामुळे तुर्की नेहमी काश्मीर प्रश्नावर पाकिस्तानची बाजू घेऊन एक प्रकारे आपल्या उत्तर सायप्रस वरील ताब्याचे समर्थन करीत असतो. मोदीच्या साईप्रस भेटीने तुर्कीची आगपाखड होणार आहे. यामुळे ग्रीक तुर्की मधील वाद सतत पेटत राहून भारत गीत विचारांना बर मिळेल व हेच भारताचे धोरण आहे.

### विकास व व्यापाराच्या संधी

सायप्रस हा भारत मध्य पूर्व युरोप कॅरिडोरचा सदस्य आहे.मोदींच्या या सायप्रस भेटीने भारत व सायप्रस मधील द्विपक्षीय संबंध सुधारणे, तसेच व्यापार, गुंतवणूक , जहाज बांधणी , डिजिटल पेमेंट नागरी उड्डाण आदी क्षेत्रात साईप्रसमधील कंपन्यांना गुंतवणुकीची संधी आहे. त्याचप्रमाणे सायप्रस पूर्व-भूमध्य सागरात असून युरोप , पश्चिम आशिया व आफ्रिका यांच्या त्रिकोणावर आहे. हे स्थान सामाजिक दृष्ट्या ऊर्जा परिवहन व राजनैतिक दृष्ट्या ही महत्त्वाचे आहे. शिक्षण व सांस्कृतिक रित्या मेडिकल व हॉस्पिटॅलिटी तसेच सुरक्षेच्या दृष्टीने व्यापाराच्या दृष्टीने ही भारताला सायप्रस ची मदत होऊ शकते.

### भारताचा पाठीराखा सायप्रस

सायप्रस हा काश्मीर मुद्द्यावरून नेहमीच भारताची बाजू घेत असतो, तसेच भारताच्या युनो मधील सदस्यत्वासाठी अनु पुरवठादार गटातील तसेच आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सी मधील भारताच्या कायमस्वरूपी सदस्यत्वालाही ही सायप्रस नेहमीच पाठिंबा देत आला आहे. यापूर्वी १९८२ मध्ये इंदिरा गांधी ने व २००२ मध्ये अटल बिहारी वाजपेयींनी सायप्रसला भेट दिली होती. त्यानंतर वीस वर्षाच्या कालखंडानंतर सायप्रसला भेट देणारे नरेंद्र मोदी हे भारताचे तिसरे पंतप्रधान आहेत. या दौऱ्यात सायप्रसचे राष्ट्रपती निकोस क्रिस्टोडोलीडेस यांनी मा.पंतप्रधान नरेंद्र मोदींचे स्वागत करून सायप्रसचा सर्वोच्च ग्रँड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ मकारियो हा सन्मान प्रदान करून गौरव केला आहे. आपण हा सन्मान भारत व सायप्रस मधील मैत्रीपूर्ण संबंधांना, सामायिक मूल्यांना व परस्पर सामोपचाराला समर्पित करतो. असे मोदींनी उत्तरा दाखल म्हटले. तसेच पाकिस्तानने भारतावर केलेल्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध करून भारताने'' ऑपरेशन सिंदूर'' द्वारे दिलेल्या कृतीला सायप्रस ने पाठिंबा दर्शविला आहे. त्या पाठिंब्याचेही आभार मानले.त्यामुळे भारतासाठी जसा पाकिस्तान विश्वासघातकी आहे तसाच सायप्रस साठी तुर्की आहे. म्हणून जर तुर्कीए पाकिस्तानला पाठिंबा देत असेल तर भारतही सायप्रसला पाठिंबा देऊन जशास तशी परतफेड करण्याचे धोरण आखत आहे.

# एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी हा कमीत कमी जोखमीचा पर्याय



विचारमंथन

-डॉ. मोहम्मद फैजान
अमरावती

अमरावती-पाठीच्या आणि मानेच्या दुखण्यामुळे अनेकांच्या दिनचर्येयवर आज मर्यादा येत आहेत. यातून आराम मिळवून देण्यात मणक्याच्या शस्त्रक्रिया निरोगी आणि सक्रिय जीवन जगण्याची दुसरी संधी देतात. विविध प्रकारच्या मणक्याच्या शस्त्रक्रिया वेगवेगळ्या गरजा पूर्ण करतात. ज्यात फ्यूजन, डिसेक्टॉमी, लॅमिनेक्टॉमी आणि फोरामिनोटॉमी सारख्या प्रक्रियांचा समावेश होतो.एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी हा कमीत कमी जोखमीचा पर्याय आहे. ज्यामध्ये हर्निएटेड डिस्क्स आणि स्पाइनल स्टेनोसिस सारख्या परिस्थितींवर उपचार करण्यासाठी शरिराला लहानात लहान चिरा देऊन दुर्बिणीद्वारे शल्यक्रिया केली जाते.असे डॉ.मोहम्मद फैजान, स्पाइन सर्जन, मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नागपूर म्हणाले. ते पुढे म्हणाले यासाठी स्पाइन सर्जन प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करतात. यात वैयक्तिक काळजी आणि योग्य परिणाम निश्चित केला जातो. त्या तुलनेत पारंपरिक उपचार रुग्णाला पुरेसा आराम देण्यास फारशा यशस्वी ठरत नाहीत. त्यामुळे उपचारानंतरी लक्षणे कायम राहिल्यास अथवा वारंवार प्रकृती बिघडणे, वेदनांमुळे दिनचर्येवर परिणाम होणे या सारख्या त्रासांमुळे सर्जिकल हस्तक्षेप करीत मणक्याच्या शस्त्रक्रियेचा विचार करण्याची वेळ येते.मणक्याची शस्त्रक्रिया खालील विविध प्रकारच्या परिस्थितींवर उपचार करण्यासाठी केली जाते, जसे की:हर्निएटेड डिस्क्स(नसांवर दबाव आणणाऱ्या सुजलेल्या किंवा फ ुटलेल्या डिस्क),डीजेनेरेटिव्ह डिस्क आजार(डिस्कची झीज झाल्याने होणाऱ्या वेदना आणि जडपणा), स्कोलियोसिस(मणक्यांची असामान्य क्रता), स्पॉन्डिलोलिस्थेसिस(मणका जागेवरून निसटणे), स्पाइनल स्टेनोसिस(मज्जातंतू (स्पाइनल कॅनल) अरुंद होणे, नसा संकुचित होणे),सायटिका(पाय दुखणे, सुन्न होणे किंवा मुंग्या येणे),स्पाइनल फ्रॅक्चर(आघातजन्य जखमा किंवा ऑस्टिओपोरोटिक कॉम्प्रेशन फ्रॅक्चर),स्पाइनल इन्फेक्शन(फोड किंवा ऑस्टिओमायलिटिस),स्पाइनल ट्यूमर(मणक्याला प्रभावित करणारे प्राथमिक किंवा मेटास्टॅटिक ट्यूमर),तीव्र पाठ किंवा मानेचे दुखणे (पारंपरिक उपचारांमुळे वेदना कमी न होणे),दबलेल्या



नसा(मज्जातंतू संकुचनामुळे होणारी वेदना, सुन्नपणा किंवा अशक्तपणा),स्पाइनल डिफॉर्मिटीज(किफोसिस किंवा लॉर्डो सिस सारख्या परिस्थिती).वेदना आणि मज्जातंतूंवरील दाब कमी करण्यासाठी,पाठीचा कणा स्थिर करणे,गतिशीलता आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी,विकृतीवर योग्य उपचार,ट्यूमर काढून टाकणे आणि संक्रमण कमी करणे,जीवनाची गुणवत्ता वाढविणे,विशिष्ट स्थितीसाठी शस्त्रक्रिया हा सर्वोत्तम उपचार आहे, की नाही हे निर्धारित करण्यासाठी स्पाइन सर्जन किंवा आरोग्यसेवा व्यावसायिकांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे. ही मणक्याच्या शस्त्रक्रियांची उद्दिष्ट आहे.पारंपरिक उपचार (शारीरिक उपचार, औषधोपचार, इंजेक्शन) लक्षणांपासून पुरेसा आराम देण्यात अयशस्वी ठरणे.लक्षणे कायम राहणे अथवा कालांतराने सतत वेदना, दैनंदिन जीवन आणि क्रियाकलापांवर लक्षणीय परिणाम दिसणे.इमेजिंग अभ्यास (एक्स-रे, एमआरआय, सीटी स्कॅन) मुळे शरिराच्या समस्येचे योग्य निदान. (जसे की हर्निएटेड डिस्क, स्पाइनल स्टेनोसिस किंवा स्कोलियोसिस.)पाठ किंवा पाय दुखणे, सुन्न होणे किंवा अशक्तपणामुळे काम किंवा दैनंदिन कामात व्यत्यय येणे. पाठीचा कणा वाकल्याने आतडी किंवा मूत्राशय बिघडणे, त्यांची कार्यप्रणाली बिघडणे. या सर्व गोष्टी होत असतील तर ही ओपन अथवा एन्डोस्कोपिक मणक्याच्या शस्त्रक्रियेचा विचार करण्याची योग्य वेळ आहे.मणक्याची शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय स्पाइन सर्जन अथवा तज्ज्ञ आरोग्यसेवा व्यावसायिकांशी सल्लामसलत करूनच घेतला पाहिजे. वैयक्तिक परिस्थिती आणि उपचार पर्यायांचा विचार देखील व्हायला हवा. वेदनेतून मुक्ती मिळविण्यासाठी सर्व मार्ग शोधणे आणि आपल्या दिनचर्येचा सर्वोत्तम पर्याय निवडण्यावर चर्चा करणे आवश्यक आहे.मणक्याच्या शस्त्रक्रियेनंतर पाठ आणि पाय दुखीवर मात,गतिशीलता आणि लवचिकता सुधारते,कार्यक्षमतेत वाढ आणि स्थिरता,जीवनाचा दर्जा सुधारणे शक्य,चांगली झोप आणि एकंदर आरोग्य सुधारणा या गोष्टी होतात. ओपन स्पाइन सर्जरी मध्ये रुग्णालयात राहण्याचा कालावधी ३ ते ७ दिवस असतो. पुनर्प्राप्तीचा कालावधी ६ ते १२ आठवडे,कामावर परतण्याचा कालावधी ६ ते १२ आठवडे व पूर्ण पुनर्प्राप्तीचा कालावधी ६ ते १२ महिने असतो.एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी मध्ये रुग्णालयात राहण्याचा कालावधी १ ते २ दिवस असतो. पुनर्प्राप्तीचा कालावधी१ ते ४ आठवडे,कामावर परतण्याचा कालावधी १ ते ४ आठवडे,पूर्ण पुनर्प्राप्तीचा कालावधी ३ ते ६ महिने असतो. रुग्णांनी हे लक्षेत लक्षात ठेवले पाहिजे, की विशिष्ट प्रक्रिया, वैयक्तिक आरोग्य आणि शस्त्रक्रियेपश्चात काळजी यावर शरिराच्या नैसर्गिक क्रियांची पुनर्प्राप्तीच्या वेळा बदलू शकतात. वेदनामुक्त सुरळीत पुनर्प्राप्ती सुनिश्चित करण्यासाठी रुग्णांनी सर्जनच्या सूचनांचे पालन करणे आणि फॉलो-अप भेटींमध्ये उपस्थित राहणे आवश्यक असते. वैयक्तिक मार्गदर्शन आणि उपचारांसाठी स्पाइन सर्जन किंवा आरोग्यसेवा व्यावसायिकांचा सल्ला घेणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. यातून विशिष्ट स्थिती आणि गरजांसाठी सर्वोत्तम उपचार पर्याय निवडण्यात मदत होते.

# स्याडा कोटसा भरते.. झाडीबोलीच्या अंतरंगातील भावभावनांचे तरंग!



समीक्षण

निलेश कवडे
अकोला मो. ९८२२३६७७०६

कवी गजलकार निवेदक गायक असे बहुआयामी व्यक्तीमत्वाचे धनी, बल्हारपुर जि. चंद्रपूर येथील श्री.सुनील बावणे. साहित्य क्षेत्रात निल या नावाचे लेखन करतात. पूर्वीचे बल्हारश्या आणि आताचे बल्हारपुर या नगरीत, औद्योगिक क्षेत्रातील प्रतिष्ठित अश्या पेपर मिल मध्ये ते कामगार आहेत. मराठी साहित्य क्षेत्रातील कामगार कवीच्या उज्वल परंपरेमधील आजघडीचे एक आश्वासक नाव.

कवी, गजलकार म्हणून विविध प्रतिष्ठित अश्या साहित्यिक सामाजिक सांस्कृतीक व्यासपिठावरील त्यांचा आत्मविश्वासपूर्वक सातत्याने असलेला वावर, यामधून त्यांनी परिचय करून दिलेला आहेच. मराठी कवीते सोबतच गजलसारखा शिस्तबद्ध प्रकारा मधूनही त्यांनी स्वत:ला सिद्ध केले आहेच. कवीला इतर भाषा येतात, त्यात तो पारंगतही आहे, तरीही आपल्या बोलीभाषेत व्यक्त होवून, काव्यसंग्रहाच्या माध्यमातून पहिला मान मायबोलीला दिला.या बद्दल सर्व प्रथम मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.


मुळात स्याडा कोटसा भरते? असं प्रश्नार्थक शीर्षक असलेला हा कवितासंग्रह, एका संवेदनशील मनाची ग्वाही देतो. प्रश्न पडणे ही पहिली पायरी असते, उत्तराच्या दिशेने मार्गक्रमणाची. जसे पडलेले प्रश्न सर्जनशीलतेला जन्म देतात, तसे हतबलतेलाही अंतर्मुख करून, विचार प्रक्रियेची आवर्तने निर्माण करतात. या संग्रहातील अनेक कवीता मन:पटलावर वैचारीक आवर्तनांना मूर्त रूप देतात. विशेषत: कवीची आपल्या बोलीभाषेवर असलेली कमालीची पकड,

ही या संग्रहाची जमेची बाजू.

स्त्रीभ्रूण हत्या सारख्या संवेदनशील विषयावर कवी प्रत्यक्ष स्त्रीलाच बोलते करण्याचा प्रयत्न करतो,

कवा कवा बाईची वैरीन! बाई, तुस काऊन ठरते
सिकून सवरून सायनी असून!
पोटातस पोरीले मारते(नोको मारू बाई)

समाजातील स्त्री चे स्थान अधोरेखित करताना, शासनाने महिलांच्या उन्नतीकरता अनेक कायदे तयार केले, विविध योजना सुरू केल्या. विविध क्षेत्रांत महिला प्रगती करीत आहेत. त्यामुळे समाजात स्त्री-पुरुष समानता आली किंवा कुटुंब व्यवस्थेत पुरुष ज्या पद्धतीने स्वांतत्र्य उपभोगतो, तेवढे त्याच कुटुंबातील स्त्रीला उपभोगता येते का? हा प्रश्न अजूनही समर्पक उत्तराच्या प्रतीक्षेतच आहे. इथे कवी प्रथम दर्शनी स्त्रीला जरी प्रश्नाच्या पिंजऱ्यात उभे करताना दिसत असला तरी त्या मागील तीची असाह्यता घुसमटीला सुचकपणे प्रश्नाकींत करताना ,आपल्या तथाकथीत सुसंस्कृतपणावर मार्मिक भाष्य करून नेमका परिणाम साधण्यास यशस्वी होतो.




भाग - १

भात्याची घरघर कोंड्याचा धुव्वा /
त्यातून इस्तुच्या निंगे लाटा
खाती-वाढ्याच्या गोष्टीमातालं /
ईस्वासू लोकांयचा एकच कामटा

कवी आधुनिक युगातील यंत्रकारागीर असून कवीला यंत्राची भाषा कळते. तो यंत्राबरहुकूम काम करतो कारण ते त्याच्या उपजीविकेचे साधन आहे. परंतू यांत्रिकपणातील एकसुरी जीवन जगत असताना,त्याला आपल्या काळजात जपून ठेवलेल्या समृद्ध गावगाडयाच्या आठवणीं व्यथीत करतात. पिढीजात व्यवसाय करणारे बलुतेदारी मधील कुठल्याली शाळेत न गेलेले निष्णात असे कारागीर आणि त्यांची कलाकुसर आठवताना, कवी या यंत्रयुगासी त्याचा सह-संबंध जोडुन पाहतो. तेव्हा तो लोहाराचा धगधगता भाता आणि सुताराच्या कामठ्या वरील माणसां-माणसा मधील आपलेपणाला, सामाजीकरणाला आजच्या यंत्र युगात आपण पारखे झाल्याची खंत व्यक्त करून, वाटयास आलेलं जगणं स्विकारतो.

कसा बसा नंबर आला मवा
तवा वाजले होते दाहा
एवरी चोकट कविता ऐकाले
फकस्त उरले होते साहा (संमेलनातला कविसंम्मेलन)

आज साहित्य संमेलनाला आलेलं उत्सवी स्वरूप, प्रत्येकाला पुढे जाण्याची झालेली घाई, कुणाचे कुणाला ऐकायचे नाही. प्रत्येकाला फक्त आपलेच सांगण्याची,ऐकविण्यासाठीची चाललेली केविलवाणी धडपड आणि अश्या मानसिकततेमुळे संमेलनाच्या मूळ उद्देशालाच गेलेला तडा. जर ऐकणारेच पुढे नसेल तर मग सांगण्याचा उद्देशच काय? याचा लेखाजोखा कवी स्वानुभवामधून, झाडी बोलीचा खास लहेजा सांभाळत अत्यंत खुमासदारणे मांडतो. ही कविता सलग वाचताना कवी संवादी स्वरूपात एकेक दृश्य आपल्या पुढ्यात उभं करतो. कवीची निरीक्षण शक्ती स्वानुभवाशी वाचकाला जोडुन अंतर्मुख करते. आणि सहजच..अरे हो, हे तर मीही अनुभवलय,असे उद्गार आपसूकच बाहेर पडल्यावाचून राहत नाही.

इर येता उनाऱ्याचे/ लई धाकधूक मनी
वन वन हानक्याले / कोठ भेटलं गा पानी अंदाराच्या अर्धा राती/ मंते गंगार हानके
झोप येता येत नाई/
पानी डोऱ्यात खुपते
सिमेंटच्या जंगलानं /
झाडा झुडाले कापले
जागा नाई संगराले / पानी येईल कायले (कोठ भेटल गा पानी )

एकीकडे वाढते वैश्विक तापमान आणि मानवाच्या भस्मासुर वृत्तीतून जंगलाची झालेली बेसूमार कत्तल आणि दुसरीकडे अत्यंत वेगाने निर्माणाधीन असलेली सिमेंटची जंगले. परिणामास्वरूप ओढवून घेतलेलं जलसंकट. तांडे वाड्या वस्त्या गावापासून ते शहरापर्यंत सर्वच स्तरावर या समस्येची व्याप्ती, उग्ररूप धारण करीत असल्याचे निष्कर्ष अनेक संशोधनातून बाहेर आलेले आहेत. विशेष म्हणजे झाडीबोली, ज्या भागात बोलली जाते, त्याला झाडीपट्टी असे सुध्दा संबोधल्या जाते. ते चंद्रपूर गडचिरोली भंडारा गोंदिया जंगलानी व्याप्त असा हा संपन्न भुभाग. कवी या भागाचे प्रतिनिधित्व करतो. अश्या भागातील चटका लावून जाणारे पाण्याचे दुर्भिक्ष्य, आपल्या बोलीमधून मांडताना, कवी वैश्विक समस्येकडे लक्ष वेधून, जलजागृतीमधून जनजागृती घडवून आणण्याच्या दिशेने कविता वाटचाल करते.

पायता का येवून जरासा /काय ठेवला आमच्यापासी /जंगल हिसकून,पायथ्यासी /खेदाडून लावल्यानं आदिवासी (खेदाडला आदिवासी)जंगले म्हणजेच विविधता. या जंगलाना आपलं मानणारे आदिवासी विविधतेचा आदर करतात.

# १७ वर्षांनंतर जेठालाल- बबिताजीची 'तारक मेहता'मधून एक्झिट?



'तारक मेहता का उल्टा चश्मा' या टेलिव्हिजन शोचे फक्त देशातच नाही तर, जगभरामध्ये मोठ्या प्रमाणावर चाहते आहेत. शोमुळे त्यातील कलाकारांनाही मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी मिळालेली आहे. मालिकेतील कलाकार कायमच कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असतात. आता अशातच जेठालालचं पात्र साकारणारे, दिलीप जोशी आणि बबिता जीचं पात्र साकारणारी मुनमुन दत्ता ही देखील चर्चेत आली आहे. हे पात्र कायमच प्रेक्षकांना त्यांच्या गोड नात्यांमुळे विशेष भावतं. सध्या मालिकेमध्ये सुरु असलेल्या ट्रॅकमध्ये प्रेक्षकांची आवडती जोडी दिसत नसल्यामुळे चाहते अस्वस्थ झाले.

शोच्या कथानकात 'जेठालाल' आणि 'बबिता जी' हे दोन आवडते कलाकार दिसत नसल्यामुळे त्यांनी हा लोकप्रिय शो सोडला का? असे प्रश्न सध्या चाहते उपस्थित करताना दिसत आहेत. मालिकेला तब्बल १७ वर्षे झाले आहेत. तेव्हापासून ते दोघेही मालिकेमध्ये प्रमुख भूमिकेत असून ते तेव्हापासून चाहत्यांचं निखळ मनोरंजन करताना दिसत आहेत. सध्या मालिकेमध्ये सुरु असलेल्या ट्रॅकमधील त्यांच्या अनुपस्थितीमुळे बऱ्याच चर्चा होताना पाहायला मिळत आहेत. बऱ्याच वर्षांपासून प्रेक्षकांचे मनोरंजन केल्यावर ही जोडी शोमधून बाहेर पडण्याचा विचार करीत आहे, असा अंदाज वर्तवला जात आहे. सध्या मालिकेमध्ये निर्मात्यांनी 'भूतनी'चा ट्रॅक पुन्हा तयार केला आहे.

सध्याच्या ट्रॅकमध्ये, तारक मेहताचा बॉस त्याला आणि त्याची पत्नी अंजलीला 'हॉलिडे होम'मध्ये एक सुंदर सुट्टीसाठी पाठवतात. तारक त्याच्या बॉसला गोकुलधाम सोसायटीच्या लोकांनाही त्यामध्ये घ्यायला परवानगी देण्यास सांगतो. त्याच्या कामामुळे आणि कंपनीच्या नफ्यावर बॉस खूश असतो. त्यामुळे, तारकचा बॉस त्याच्यासोबत सहमत होतो. परंतु तारक आणि गोकुलधाम सोसायटीच्या सदस्यांना हे माहित नसतं की, 'हॉलिडे होम'मध्ये भूत आहे आणि तारकच्या बॉसने त्यांना या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी तिथे त्याला पाठवलेले असते. सध्याच्या कथेत सुरू असलेल्या भयानक कथानका दरम्यान, नेटकऱ्यांनी 'जेठालाल' आणि 'बबिता जी'ची अनुपस्थितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केला आहे.


खरंतर, तनुज महाशब्देचे अय्यर हे पात्र सध्याच्या ट्रॅकमधूनही गहाळ आहे. त्याच्या अनुपस्थितीत एक चर्चा झाली की दिलीप जोशी आणि मुनमुन दत्ता कदाचित या शोच्या बाहेर गेले असतील. एबीपीच्या अहवालानुसार, शोच्या प्रॉडक्शन हाऊसने पुष्टी केली आहे की, बबिता ही भूमिका साकारणारी मुनमुन दत्ता अजूनही या शोचा एक भाग आहे. कथा अशा प्रकारे दर्शविली गेली आहे की 'जेठालाल' व्यवसायाच्या कामातून बाहेर आहे आणि 'बबिता' आणि 'अय्यर' महाबळेश्वरमध्ये सुट्टीवर गेले आहेत.

तारक मेहता का उल्टा चष्मा हा शो २८ जुलै २००८ रोजी सोनी सब या टेलिव्हिजन चॅनलवर टेलिकास्ट झाला आणि तेव्हापासून तो प्रेक्षकांमध्ये लोकप्रिय होताना दिसत आहे. ह्या शोची शुटिंग मुंबईमध्ये केली जाते. गोकुळधाम सोसायटीमध्ये देशातल्या विविध कानाकोपऱ्यतले लोकं राहताना दिसतात. जिथे प्रेक्षकांना अनेक संस्कृतींचे लोक एकत्र आलेले दिसतील. या टीव्ही सीरियलचे आतापर्यंत ३,८०० हून अधिक भाग टेलिकास्ट झाले आहेत.

## सायबर सुरक्षा क्षेत्रात भारताचे निर्णायक पाऊल

भारतातील सायबर सुरक्षेच्या वाढत्या गरजांच्या पार्श्वभूमीवर सायबर इंडिया एक्स्पो २०२५ चे यशस्वी आयोजन बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, मुंबई येथे करण्यात आले. मिडिया फुसन द्वारे आयोजित या दोन दिवसीय कार्यक्रमात धोरणनिर्माते, तंत्रज्ञान क्षेत्रातील नेते, स्टार्टअप्स आणि उद्योजक एकत्र आले.भारत सध्या जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक सायबर हल्ल्यांचा बळी ठरत असून, यावेळी १०० हून अधिक आंतरराष्ट्रीय आणि भारतीय कंपन्यांनी भाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बृजेश सिंग, आयपीएस, प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या उद्घाटनाने झाली. त्यांनी सायबर सुरक्षा ही राष्ट्रीय प्राधान्याची बाब असल्याचे सांगितले.कार्यक्रमात -आधारित सुरक्षा उपाय, झिरो-ट्रस्ट फ्रेमवर्क्स, क्वांटम-सेफ टेक्नॉलॉजी, आणि डेटा संरक्षण यावर चर्चा झाली. संपर्क मंत्रालय सारख्या संस्थांचे वरिष्ठ अधिकारी यात सहभागी झाले.स्टार्ट अप इनोवेशन झोनमध्ये स्टार्टअप्सनी थेट डेमोद्वारे अत्याधुनिक सायबर सुरक्षा तंत्रज्ञान सादर केले. हेल्थकेअर आणि हॉस्पिटॅलिटी या क्षेत्रातील सध्याच्या सायबर धोका स्थितीवरही विशेष लक्ष दिले गेले.

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 85




### हे कोडे कसे सोडवाल

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्दः—**

**दोन अक्षरी**
- अंग
- अंध
- आणे
- कण
- कप
- काम
- कार्य
- कावा
- खडा
- खांदा
- गर
- टर
- जटा
- जान
- ताजा
- तात
- तृप्त
- दाता
- धन
- नग
- बाजी
- मऊ
- मत
- वाघ
- वान
- वाली
- सती
- सल
- स्वाद
- हाक
- हाट

**तीन अक्षरी**
- आश्चर्य
- एकटा
- गरम
- चकली
- जोखीम
- जोगवा
- तृतीय
- नकली
- नकार
- नजर
- पथिक
- पारध
- पाषाण
- प्रलय
- भक्षक
- रहाट
- राखीव
- रुतबा
- रुपक
- लीनता

**चार अक्षरी**
- आवाहन
- खडाष्टक
- एकमत
- एकाएकी
- निरक्षर
- पंचपात्र
- पराभूत
- भागवत
- मळवट
- मातामह
- वकालत
- वाटमारी

**पाच अक्षरी**
- एकवचन
- चरमरीत
- नखशिखांत
- पाठराखण
- पाणउतारा
- पोपटपंची
- मनकवडा
- मुरलीधर


**सहा अक्षरी**
- जीवश्च कंठश्च

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | ह | र्षी | धों | डे | के | श | व | क | र्वे | | बा | | भा |
| क | ड | | ड | र | क्र | व | णी | | | स | र | वा | न |
| र | प | क्र | | ले | | वा | | | मि | र | गी | | ग |
| ध्व | | न | शा | | व | हि | वा | ट | | स | र | | ड |
| ज | पा | न | | गी | त | क्र | र | | मा | | | स | |
| | ल | | शै | ता | न | | क | मा | ल | खा | नी | ह्य | र |
| क | व | च | | ई | | वा | री | स | | क | र | | |
| न्या | | क्र | म | | क्र | च | | | पू | | क्षी | ण | ता |
| | अ | पा | द | म | स्त | क | | चा | | खू | र | | न |
| प्र | मा | णि | त | | क्र | | पा | म | र | | न्या | रा | |
| | श | | गा | ज | र | पा | र | खी | | म | य | स | भा |
| वा | य | बा | र | | | ट | वा | ळ | खो | र | | भ | द्र |
| फ | | ज | | पा | व | ली | | | प | ण | जा | | प |
| | क | र | व | त | | | क | व | डी | | | क | द |

Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 465




**—: आडवी विधानेः—**

1) दुसऱ्या महायुद्धात येथे अणूबॉम्ब टाकून भयंकर नरसंहार घडविण्यात आला
3) जागतिक कीर्तिचे भारतीय कवी व थोर तत्वचिंतक, यांच्या गीतांजली या काव्यसंग्रहास नोबेल पारितोषिक प्रदान करण्यात आले होते.
9) मला
10) शिक्षा, दंड (हिं.)
11) खर्च
12) नाकाने हुंगण्याची नस
13) तळहात
16) निघालेला, मार्गस्थ
17) समतल, सारख्या पातळीचे
18) ताप येण्यापूर्वी वाटणारी अस्वस्थता
19) मराठीतील एक जुने प्रख्यात नाटक, नटात श्रेष्ठ
21) अधू, विकलांग
23) आपल्या स्वार्थासाठी दुसऱ्याची स्तुती करणारा 24) लोभी, तीव्र लालसा असलेला
26) कायद्याचा अभ्यासक्रम शिकविणारे महाविद्यालय
28) अखंड, जोडलेले
29) विडीचा झुरका
30) पाषाण, दगड
32) बैलाच्या शिंगास बांधण्याची दोरी
33) विश्वासपूर्वक दुसऱ्याजवळ ठेवलेले द्रव्य
34) हिताची गुप्ततेने केलेली कुजबुज
36) इतर, श्रेष्ठ, पंख
37) पवित्र (उर्दू)
39) मोठया मनुष्याच्या नावामागे लावण्याचे सन्मानदर्शक संबोधन
41) जीव जंतू
42) श्रीयुतचे संक्षिप्त उच्चारण
43) गरम मसाल्यातील एक जिन्नस
45) कल्याण
46) धरणी कंप
48) दुर्दशा, परवड
49) हिंस्त्र पशु
50) धाक, जरब
51) सुख शांती, निश्चलता, आरामाची परिस्थिती
53) सोबत, संगतीने
55) सूर्याचे एक नाव
58) बाजू, कड
60) आशय, पैसा
61) वर्षातील सहा ऋतूंपैकी एक
62) क्रमून आलेल्या मार्गाकडे सिंहाप्रमाणे अभिमानाने वळून बघणे, आढावा घेणे
63) माप, परिमाण, आधार
64) कर्णेंद्रिय
65) चिलखत, आवरण
67) विश्वास, खात्री
69) उंदीर
71) मनाला बरे वाटणारे
74) पृष्ठभागावरचा उडालेला तुकडा
77) सैन्याचा दाणागोटा
79) आवड, द्रव
81) कामचुकारपणा करणारा
83) परमेश्वर, नटात श्रेष्ठ
84) परंपरेने चालत आलेल्या वृत्तीचा सांभाळ करणारा
85) खेळ मांडण्याचे विशिष्ट प्रकारचे वस्त्र

**—: उभी विधानेः—**

1) नवजात बालकाचे नाव ठेवण्याचा समारोह
2) कंद भाजीचा एक प्रकार
3) सुटी, परवानगी
4) पैसेवाला, धनवान
5) समूळ नाश
6) तागाचे जाड कापड
7) अर्थज्ञानावाचून बोलणे
8) परिस्थितीनुसार रंग बदलणारा एक जीव
14) चांगले वाईट यातील भेदाचे ज्ञान, सारासार विचार
15) जखमेतून वाहणारा घाणेरडा द्रव
17) सार्वभौम राजा
20) देवालयापुढे कथा – कीर्तनासाठी उभारलेला मंडप
21) वेगळे, भिन्न
22) कपाळ, मस्तक
24) सांभाळ, पालन पोषण
25) इंद्रपुरी
27) पति किंवा प्रियकराचा विरह झालेली स्त्री
29) विजयादशमी
31) आडवे संकेत क्र. 13 प्रमाणे
35) गुलाबाच्या पाकळ्यांमध्ये साखर घालून केलेला मुरब्बा
38) बशीचा जोडीदार
40) रामायणात पाषाण झालेल्या या साध्वीचा श्रीरामाच्या पदस्पर्शाने उद्धार झाला
41) मरेपर्यंत केवळ पाणी प्राशून उपोषण करणे
44) तिसरी व्यक्ति, अनोळखी
47) परागकणांचा संबंध बीजांडाशी येण्याची क्रिया
49) ऑस्कर अवॉर्ड पर्यंत मजल मारलेला एक मराठी चित्रपट
51) आवाज, नाद
52) वातावरणातील उष्णता व थंडपणाची मोजदाद
54) किल्ल्याच्याभोवती खोदलेला चर
55) आमिष, लालूच
56) ज्वारीची जाड पोळी
57) कडोसरी
59) काळाचा सूक्ष्म अंश
60) किंमत कमी होणे
64) कावळ्याचा आवाज
66) ओकारी, वांती
68) व्याजाने कर्जाऊ पैसे देणारा
70) पुरुषांनी नेसावयाचे उंची रेशमी वस्त्र
72) आपला देश
73) वस्त्र, कपडा
75) कार्य, कृत्य
76) मिठाची चव 78) बरोबरी, माळ
80) तीर्थक्षेत्री केलेली हजामत
82) मार, ताडन (उत्तर पुढील अंकी)


### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर


| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शं | क्र | | ज | हा | गी | र | | | | प्र | क | ट | | सां | गा | वा |
| | क्र | न | न | | त | म | स | | ध | मा | ल | | शे | ज | | द |
| नि | | | क | | रा | णी | | व | र | द | | क्र | रा | वा | स | |
| मि | त्र | | | दे | मा | य | ध | र | णी | | पृ | ष्ठ | | त | | |
| ष | | ध | र | | य | | ग | दा | ध | र | | | झु | | पा | वा |
| मा | हे | र | वा | शी | ण | | | न | र | म | ये | णे | | व | त | न |
| त्र | | णी | | घ्र | | सा | म | | | जा | ळ | | बु | न | क | र |
| | | कं | ट | क | | ज | र | | ध | न | को | | ज | रा | | |
| प्र | ला | प | | वी | त | रा | ग | | म | | ट | र | बु | ज | | अ |
| ग | वा | | स | | प्त | | ळी | | नी | | | स | जा | | पा | न |
| म | ला | व | रो | ध | | क | स | र | | | आ | वं | ट | न | | व |
| न | व | | व | म | न | | ये | | उ | प | र | ती | | व | | र |
| शी | | पा | र | ध | | आ | णे | | पा | य | स | | आ | स | मं | त |
| ल | गा | म | | मा | तु | ल | | व्या | स | | पा | रा | वा | र | | |
| | भा | र | त | | ला | य | क | | ना | दा | नी | | ह | | स | भा |
| भा | रा | | मा | र्ग | | | ला | ख | | स | | म | न | मो | ह | क |

Uday Munde - 8446302691


## राशी-भविष्य



**मेष :** लग्नामुळे तुम्हाला त्रास होऊ शकतो. आज तुम्ही फिरायला जाऊ शकता आणि मॉल आणि सिनेमा हॉलमध्ये जाऊ शकता.


**वृषभः** वाद टाळा. तुमचा पुन्हा एखाद्या जुन्या मित्राशी संपर्क येऊ शकतो. घरी धार्मिक कार्यक्रम होऊ शकतात.



**मिथून :** मित्राच्या मदतीने तुम्हाला पैसे मिळू शकतात. तुमचा स्वभाव चिडखोर असेल. मनात आशा आणि निराशेच्या मिश्र भावना राहतील.


**कर्क :** मालमत्तेतून उत्पन्नाचा स्रोत निर्माण होऊ शकतो. मित्राच्या मदतीने व्यवसायात बदल होऊ शकतो. उत्पन्न वाढेल. अनियोजित खर्च वाढतील. निराशेच्या भावना असतील.


**सिंह :** राहणीमान दुःखदायक असू शकते. तुम्ही आत्मविश्वासाने परिपूर्ण असाल, परंतु अति उत्साही राहण्यापासून दूर राहा. आत्मसंयमी राहा.



**कन्या :** अनावश्यक राग आणि वाद टाळा. कुटुंबात शांती आणि सुसंवाद राखण्यासाठी प्रयत्न करा. घरात धार्मिक कार्यक्रम होतील.



**तुळ :** आत्मविश्वास पूर्ण असेल. कुटुंबात आनंद आणि शांती राहील. शैक्षणिक कार्यात तुम्हाला आनंददायी परिणाम मिळतील.


**वृश्चिक :** मानसिक शांतीसाठी प्रयत्न करा. धार्मिक संगीतात रस वाढू शकतो. मित्राच्या मदतीने तुम्हाला नोकरीच्या संधी मिळू शकतात.


**धनु :** मन अस्वस्थ होऊ शकते. संभाषणात संयम ठेवा. तुम्हाला कुटुंबाकडून पाठिंबा मिळेल. नोकरीत परदेश प्रवासाची शक्यता आहे.


**मकर :** कुटुंबात आनंद आणि शांती राहील. तुम्ही एखाद्या राजकारण्याला भेटू शकता. तुमच्या आरोग्याची काळजी घ्या. तुम्ही समाधानी असल्याची मानसिक स्थिती असेल.


**कुंभ :** मन अस्वस्थ होऊ शकते. आत्मसंयमी राहा. तुम्ही लेखनासारख्या बौद्धिक कामात व्यस्त असाल. बौद्धिक कामातूनही पैसे कमवू शकता. तुमच्या आरोग्याची काळजी घ्या.


**मीन :** पोटदुखीची शक्यता असू शकते. शरीरदुखी थकू शकते. शेती आणि व्यवसायामुळे तुम्हाला त्रास होऊ शकतो. खर्च जास्त असेल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३





# दक्षिण नागपुरात 'ड्रेनेज पाईप' चे सदोष काम

## नागरिक म्हणतात, कंत्राटदार करतो मुजोरी, अनेक कामे चुकीच्या पद्धतीने केल्याचा आरोप

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर , दि. २७ :** दक्षिण नागपुरातील लाडीकर ले-आऊटमध्ये ड्रेनेज पाईपचे सदोष काम होत असल्याचे आढळून आले आहे अनेक कामे चुकीच्या पद्धतीने होत असून, कंत्राटदाराला काही सूचना केल्यास तो काही ऐकत नसून अर्थात मुजोरी करून आपला 'अनुभव' सांगत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. महानगरपालिका आयुक्त डॉ अभिजीत चौधरी यांनी व्यक्तिश: दक्षिण नागपुरात झालेली वा सध्या होत असलेली कामे पाहावीत, अशी मागणी पुढे आली आहे.







लाडीकर ले-आऊटमध्ये एका ठिकाणी मागील अनेक दिवसांपासून तुटक तुटक पद्धतीने कामे सुरू आहेत याठिकाणी ड्रेनेज पाईप समपातळीत टाकण्यात आले नसून, खोलगट भागातील पाईपमध्ये पाणी तुंबल्या जात आहे काही ठिकाणी जुनी पाईप लाईन बंद करून टाकल्याचाही प्रताप करण्यात आला ही बाब काही नागरिकांच्या निदर्शनास आल्यानंतर पुन्हा दुरुस्तीचे काम करण्यात येत आहे याशिवाय जुने चेम्बर लहान केल्याचाही प्रताप पाहावयास मिळाला. एका जागी पिण्याची पाईप लाईन फोडल्याने पिण्याचे कित्येक लिटर पाणी वाहून जात असल्याचे गुरुवारी (२६ जून) सकाळी आढळून आले. गट्टू तो 'गट्टू' याठिकाणी एका चौकात गट्टू सदोष पद्धतीने लावण्यात आले आहे. त्याखाली चुरी (गिट्टीची बारीक भुकटी) टाकली असून, बुधवारी रात्री आलेल्या दमदार पावसाने ही चुरी वाहून गेली त्यामुळे गट्टू ढिले झाले आहेत 'ड्रेनेज पाईप'चे सदोष काम आणि मानेवाडा सीमेंट रोडच्या दिशेने तीव्र उतार आल्याने बुधवारी रात्री येथील आर.ए नांदुरकर यांच्या घरात दोन फूट पाणी साचले होते. तब्बल तासभर पावसाचे पाणी साचल्याने त्यांनी 'अजिंक्य भारत' ला सांगितले. दक्षिण नागपूर तुंबवतो कोण ? निसर्गनियमाने पावसाळा हा दरवर्षी येतो आणि दक्षिण नागपुरचे मोठे नुकसान करून जातो; परंतु या भागात पावसाचे पाणी तुंबवण्यास जबाबदार कोण, असा प्रश्न दरवर्षी फक्त आणि फक्त पावसाळ्यातच उपस्थित करण्यात येतो. मागील वर्षी २० जुलैच्या पहाटेपासून सुमारे साडेसहा तास जोरदार आणि दमदार पाऊस कोसळला त्यामुळे सखल भागातील अनेक घरात पाणी शिरले. दक्षिण नागपुरात बेसा, हुडकेश्वर, न्यू शिवाजीनगर, शाहू नगर, हनुमाननगर, अयोध्यानगर, अमरनगर आदी भागात संततधार पावसाचे पाणी साचले होते. अयोध्यानगरातील श्री शेरकर यांच्या घरातील फ्रिज पूर्णपणे खराब झाला तर, श्री. निकम यांच्या घरातील पाणी ओढणाऱ्या दोन मशिन्स खराब झाल्या याशिवाय अन्य काही लोकांच्या घरात पाणी शिरून अन्नधान्य सुद्धा खराब झाल्याचे दिसून आले. काहींच्या दुचाकी/कारमध्ये पाणी शिरल्याने नुकसान झाले होते. जम्बुदीनगर परिसरातील कुंभारे, पवनीकर, सरोदे, जाधव यांच्या घरात ड्रेनेज पाणी शिरल्याने दुर्गंधी पसरली होती.

### लोकसंख्या लक्षात घेतलीच नाही

**अयोध्या नगरसह शेजारच्या भागातील वस्ती सुमारे ३० वर्षांआधी वसलेली आहे त्यामुळे याठिकाणी जुनी 'ड्रेनेज' आहे दिवसांगणिक अनेकांनी घरांचे नवे बांधकाम केले काही ठिकाणी तीन-तीन मजली इमारती उभ्या राहिल्या लोकसंख्या वाढली पाण्याचा वापर चौपटपर्यंत वाढत गेला मात्र, 'ड्रेनेज' मधील पाईपचा आकार तोच राहिला. सीमेंट रस्ते तयार करताना जुने रस्ते न खोदता त्यावर नवा रस्ता उभारण्यात आल्याचा आरोप अनेकदा करण्यात आला यात घरे खाली गेली आणि रस्ते वर आले. परिणामी रस्त्यांवरील पाणी घरात शिरत असल्याचे काहींनी सांगितले.सीमेंट रस्ते बांधकामाविषयी सुद्धा तीव्र भावना व्यक्त होत असून, गल्लीबोळात सीमेंट रस्त्यांची गरज काय, असा प्रश्न अनेकदा उपस्थित करण्यात येतो. पावसाळा संपतो. नवीन वर्षातील पावसाळ्याची प्रतीक्षा होते आणि विषय नव्याने चघळला जातो.**

## थोडक्यात

### सूक्ष्म सिंचन योजनेसाठी अर्ज करा

**नागपूर :** कृषि विभागामार्फत नागपूर जिल्ह्यात राष्ट्रीय कृषि विकास योजना २०२५-२६ साठी राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचन या बाबीखाली तुषार संच, ठिबक संच, रेनगन, सेमी परमनंट इरिगेशन सिस्टीम यांचा समावेश आहे. तालुका स्तरावर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी १५ ते ३० जून या पंधरवड्यात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी आपले फार्मर आयडी, ७/१२ नमुना, ८अ, जातीचे दाखला, आधार क्रमांक (मोबाईल क्रमांक ला लिंक केलेले मोबाईल क्रमांक), बँक पासबुकसह तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी, कार्यालयाशी किंवा कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यक यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रविंद्र मनोहरे यांनी केले आहे.

### मिनी ट्रॅक्टर योजनेसाठी अर्ज

**नागपूर :** अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना ९० टक्के अनुदानावर ९ ते १८ अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्याची योजना सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येते. अटी व शर्तीप्रमाणे मिनी ट्रॅक्टर योजनेसाठी पात्र ठरलेल्या बचत गटांना वाटप करण्यात येणार आहे.अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्य महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत. स्वयंसहाय्यता बचत गटातील किमान ८० टक्के सदस्य अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील असावेत. मिनी व त्याची उपसाधने यांच्या खरेदीची कमाल मर्यादा ३.५० लाख रुपये इतकी राहील. स्वयंसहायता बचत गटांनी वरील कमाल मर्यादेच्या रकमेच्या १० टक्के स्वहिस्सा भरल्यानंतर ९० टक्के (कमाल ३.१५ लाख रुपये) शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील. परिपूर्ण अर्ज विनाविलंब ३० जून रोजी पर्यंतच्या कालावधीत पाठवावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण नागपूर यांनी केले आहे.

# सरन्यायाधीश भूषण गवई यांचे नागपुरात आगमन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नागपूर , दि. २७ :** भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांचे आज नागपुरात आगमन झाले. सरन्यायाधीशपदी विराजमान झाल्यानंतरचा हा त्यांचा पहिलाच नागपूर दौरा असल्याने, न्यायपालिका आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांचे विमानतळावर जंगी स्वागत केले. आज, शुक्रवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर त्यांच्या स्वागतासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी आणि पोलीस आयुक्त डॉक्टर रविंद्र सिंगल हे प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांच्यासोबतच उच्च न्यायालयाचे इतर न्यायमूर्ती, विशेष पोलीस महानिरीक्षक, जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि विधी क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. सरन्यायाधीश भूषण गवई हे २९ जूनपर्यंत नागपुरात मुक्कामी असणार आहेत. या कालावधीत ते शहरातील विविध कार्यक्रमांना उपस्थिती लावणार आहेत. त्यांच्या या दौऱ्यामुळे शहरातील विधी आणि प्रशासकीय वर्तुळात उत्साहाचे वातावरण आहे.

# मेडिकल चौकात राजश्री छत्रपती शाहू महाराजांचा पुतळा उभारावा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर , दि. २७ :** राजश्री छत्रपती शाहू महाराज यांचा पुतळा मेडिकल चौकात उभारण्यात यावा, यासाठी आक्रमण युवक संघटनाच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले.

कार्यक्रमाला पत्रकार मिलींद कीर्ती, सामाजिक कार्यकर्त्या पूजा नाखले, अलका माटे, रविंद्र पाटील, आक्रमणचे जिल्हा संयोजक ओपुल तामगाडगे, कार्याध्यक्ष विशाल बनसोड, जिल्हाध्यक्ष धनराज हाडके उपस्थित होते. सर्वप्रथम शाहू महाराजांच्या छायाचित्राला माल्यार्पण करण्यात आले. प्रबोधनकार अविनाश साखरकर यांनी आंबेडकरी आंदोलनावर गीत सादर केले. राजश्री छत्रपती शाहू महाराज बहुजनांचे राजे होते. संस्थानात ५० टक्के आरक्षण देऊन



सामाजिक न्याय देण्याचे काम केले. माणगावच्या परिषदेत दलितांनी आपला नेता निवडला असून, डा. बाबासाहेब आंबेडकर आपला उद्धार एक दिवस करतील, असे भाकीत शाहू महाराजांनी केले होते त्यांनी आपल्या राजवटीत अनेक शैक्षणिक , सामाजिक संस्था तयार केल्या. त्यामुळे देशाला आज खरी गरज शाहू महाराजांच्या विचारांची असल्याचे मिलींद कीर्ती यांनी सांगितले.मेडिकल चौक येथे शाहू महाराजांचा पुतळा उभारण्याच्या मागणीचे त्यांनी समर्थन केले. दरम्यान, कार्यकर्त्यांनी घोषणा देत शाहू महाराजांच्या पुतळा मेडिकल चौकात लवकरात लवकर उभारण्यात यावा, येत्या हिवाळी अधिवेशन काळात लोकप्रतिनिधींचा रस्ता रोको करण्याचा इशारा यावेळी दिला. जिल्हा उपाध्यक्ष रोशन ठवरे, शहर उपाध्यक्ष प्रफुल खोब्रागडे, जिल्हा कोषाध्यक्ष सुरज पुराणिक, जिल्हा सचिव अश्विन पाटील, समीर शाहू, अतिश शंभरकर,आदेश रामटेके, ऋषी धोलारे, दीपक पाटील, विकी वानखेडे, सनी शेंडे, दर्शन तामगाडगे, सुंदर भालावी, पंकज टवरे, श्रीकांत फुले यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन जिल्हाध्यक्ष धनराज हाडके यांनी, तर प्रास्ताविक ओपुल तामगाडगे यांनी केले. मीडिया प्रभारी झब्बू तामगाडगे यांनी आभार मानले.

# नागपूरकरांच्या सेवेत २७ आरोग्य केंद्रांची भर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर , दि. २७ :** महानगरपालिका नागरिकांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी प्रयत्नशील असून, आरोग्य सेवा पुरविण्यासाठी २७ आयुष्मान आरोग्य मंदिरांची भर पडली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यात केंद्र शासनाकडून १५ वित्त आयोग निधी अंतर्गत नागपूर शहराकरीता राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत एकूण ११३ आयुष्मान आरोग्य मंदिर अर्थात आरोग्यवर्धिनी केंद्राची मान्यता प्राप्त आहे. महानगरपालिका अंतर्गत एकूण ५२ आयुष्मान आरोग्य मंदिर सुरू आहेत. यात आता २७ आयुष्मान आरोग्य मंदिरे, आशीनगर झोन अंतर्गत पंचशील नगर (इठ), एसआरए वंजारा, शेंडे नगर, सुदाम नगर, सहयोग नगर, नारी रोड. धंतोली झोन अंतर्गत भीम नगर, सुयोग नगर/संत साईकृपा सोसायटी, धरमपेठ झोन अंतर्गत बुटी, अंबर कॉलनी, दाभा रोड, हनुमान नगर झोन अंतर्गत सिद्धेश्वर टोली/माँ दुर्गा नगर, साई नगर, लकडगंज झोन अंतर्गत वाजपेयी नगर, चिखली, नवकन्या नगर, ओम साई नगर, जुना कामठी रोड, शास्त्रीनगर, लक्ष्मीनगर झोन अंतर्गत एकात्मता नगर, मंगळवारी झोन अंतर्गत जाफर नगर, एसआरए मार्टिन नगर, नेहरूनगर अंतर्गत जुनी सुकरावरी, हसनबाग, जय दुर्गा नगर, सतरंजीपुरा झोन अंतर्गत व्हीएचबी कॉलनी, शांतीनगर, बंगाली पंजा, अण्णाभाऊ साठे, के.जी. नगर, वैशाली नगर केंद्र जनसामान्यांना प्राथमिक आरोग्य सेवा पुरवतील.

## CAPTION 'मला काय त्याचे'...



**नागपूर : नागपुरातील साई मंदिर परिसरातील अयोध्या नगर ते जम्बुदीपनगरच्या दिशेने जाणारा नाला त्याचा रस्त्याच्या बाजूने असणारा लोखंडी पाईपचा कठडा तुटून आतील बाजूला लोंबकळत आहे आणि त्याठिकाणी बांबू बांधण्यात आले. इथंपर्यंत ठीक मात्र, तोपूर्ववत करण्याचे प्रयत्न कुणी केल्याचे दिसत नाही दररोज शेकडो लोक येथून पायी वा वाहनाने जातात कुणाही व्यक्तीच्या लक्षात ही बाब आली नसावी का? उल्लेखनिय असे, की हा भाग अतिशय दाट लोकवस्तीचा आहे. 'मला काय त्याचे', 'माझं तिथं कुणी पडलं का' ही मानसिकता तंतोतंत लागू पडते.**

# राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद रविवारी

**नागपूर , दि. २७ :** विवेक विचार मंचातर्फे नागपूर येथे रविवारी (दि. २९) राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल कन्व्हेशन सेंटरमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत ही परिषद होईल. वंचित घटकांच्या समस्यांवर विचारमंथन करणे हा यामागील उद्देश आहे. परिषदेच्या अध्यक्षस्थानी पद्मश्री नामदेव कांबळे असतील. राज्य संयोजक सागर शिंदे यांनी ही माहिती दिली. यावेळी सुनील किटकरु, संदीप जाधव, अतुल शेंडे, मनीष मेश्राम व राजू साळवे उपस्थित होते.

# देयकांचा निपटारा होण्यासाठी सुसंवाद

## उपयोगिता प्रमाणपत्रासंदर्भात कार्यशाळा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर , दि. २७ :** महालेखाकार कार्यालयाशी निगडीत विविध शासकीय आस्थापनाकडून सादर देयकांचा निपटारा वेळेत होण्यासाठी त्यात असलेल्या त्रुटी वेळेत पूर्ण व्हाव्यात यासाठी सुसंवादावर अधिक भर देण्यात यावा, असे प्रतिपादन महालेखाकार सुहासिनी गोतमारे यांनी केले. महालेखाकार कार्यालय आणि सहसंचालक, लेखा व कोषागारे नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रलंबित संक्षिप्त देयकांचे तपशीलवार देयके आणि उपयोगिता प्रमाणपत्राची संख्या कमी करण्यासाठी आयोजित कार्यशाळेत त्या बोलत होत्या.




'डिजिटिलायजेशन ऑफ सर्व्हिस'चा वापर करून लोकभिमुख सेवा देण्यास मोलाची मदत झाली आहे. शासनाच्या विविध कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी व कोषागार कार्यालयांनी महालेखाकार कार्यालयाशी योग्य संवाद ठेवावा. प्रलंबित संक्षिप्त देयकांबाबत शासकीय नियमानुकुलता तपासताना या संवादातून असलेल्या त्रुटी तत्काळ मार्गी लागतील. तपशीलवार देयके आणि उपयोगिता प्रमाणपत्राची संख्या यातून प्रलंबित राहणार नाही,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महालेखाकार कार्यालयात प्रस्तावित असलेले बदल व त्यानुषंगाने महालेखाकार कार्यालयाची बदलत्या भूमिकेबद्दल श्रीमती गोतमारे यांनी माहिती दिली. कार्यशाळेला वरिष्ठ उपमहालेखापाल जितेंद्र गुप्ता, लेखा व कोषागारे विभागाच्या सहसंचालक ज्योती भोंडे, वरिष्ठ कोषागार अधिकारी मोनाली भोयर, सहायक संचालक गजानन हिरुळकर, अपर कोषागार अधिकारी प्रदीप कनेरे आणि नागपूर विभागातील सर्व कोषागार अधिकारी आणि आहरण संवितरण अधिकारी उपस्थित होते. कार्यशाळेत महालेखाकार सुहासिनी गोतमारे यांचे स्वागत सहसंचालक ज्योती भोंडे यांनी केले. सूत्रसंचालन लेखा अधिकारी शैलेश कोठे यांनी केले लेखा अधिकारी अमोल पाचपोर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# विज्ञानाची सफर: यंग कलाम डिस्कव्हरी सायन्स सेंटर

## विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन घडविण्यासाठी मनपाचा उपक्रम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर , दि. २७ :** महानगरपालिकेने एचसीएल फाऊंडेशन आणि एसईडीटी यांच्या वतीने रामदासपेठेतील हिंदी मोर शाळेत 'यंग कलाम डिस्कव्हरी सायन्स सेंटर'ची स्थापना करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, केंद्राच्या उभारणीसाठी एचसीएल फाऊंडेशन द्वारे अर्थसहाय्य केले जात असून, सोशल इकोनॉमिक डेव्हलपमेंट ट्रस्टची ही संकल्पना आहे. एचसीएल फाऊंडेशनच्या परभणी येथून विज्ञान प्रयोग आणि साहित्य याठिकाणी आणले आहे.



संग्रहित

विज्ञान क्षेत्रात झालेले बदल आणि विज्ञानाची अनोख्या दुनियेचे दर्शन घडविणारी सफर 'यंग कलाम डिस्कव्हरी सायन्स सेंटर'मध्ये घडविली जाते. मनपा शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करण्यासह वैज्ञानिक घडविण्यास मोठा हातभार लावला आहे. आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिक्षणाधिकारी साधना सयाम यांच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांत विज्ञानाची आवड निर्माण करण्यासाठी विविध प्रयत्न होत आहेत. मनपा आणि एचसीएल यांच्यात २०१७ पासूनच या केंद्राच्या माध्यमातून मनपा शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची रुची वाढवण्यावर भर देण्यात येत आहे. याआधी हे केंद्र इतवारी येथील लालगंजमध्ये होते. २०१९ मध्ये बॅरिस्टर शेषराव वानखेडे विद्यानिकेतन रामदासपेठ येथे हलवण्यात आले. मनपाने तीन वर्गखोल्या उपलब्ध करून दिल्या आहेत, ज्यांचे प्रयोगशाळेत रुपांतर करण्यात आले. तीनही प्रयोगशाळेत रसायनशास्त्र, जीवशास्त्र, भौतिक, खगोलशास्त्र व इतर शास्त्रांतील विविध प्रयोगाचे अद्भूत दर्शन होते. मनपा शाळेतील पाचवी ते १० वीच्या विद्यार्थ्यांची सर्वप्रथम अर्धा तासात ३० गुणांची वस्तुनिष्ठ परीक्षा घेतली जाते. यानंतर त्यांना केंद्रातील फॅसिलेटर निखिल लक्षणे, कालीदास नाकाडे व इतर सहकारी यांच्यामार्फत माहिती दिली जाते. प्रत्येक विज्ञान प्रयोगाची सविस्तर माहिती दिली जात असल्याने विद्यार्थ्यांना कृतीतून अधिक माहिती मिळते. सोशल इकोनॉमिक डेव्हलपमेंट ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य कुळकर्णी आणि एचसीएल फाऊंडेशन व्यवस्थापक पीयूष वानखेडे यांच्या देखरेखीत उत्तम कार्य होत आहे.

### विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर

**तिन्ही प्रयोग शाळेत चंद्रग्रहण, सूर्यग्रहण, पवनचक्की, सोलार, आर्किमिडीजचा सिद्धांत,दृष्टीभ्रम, पिरिऑडिक टेबल, न्यूटनची रंग तबकडी, टॉवर ऑफ पिसा, डीएनए, ह्युमन बॉडी पार्ट, न्यूटॉनचा सिद्धांत, विविध गेम्स, विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वॉटर हार्वेस्टिंग, मातीचे विविध प्रकारांसह विज्ञानाविषयीची माहिती विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर टाकत आहे.**

# गैरहजर सफाई कामगारांवर कारवाई

**नागपूर , दि. २७ :** नागपूर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांनी केलेल्या आकस्मिक पाहणीत पाच सफाई कर्मचारी गैरहजर आढळले. या कामगारांना कारणे दाखवा नोटीस बजावून कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी लक्ष्मीनगर झोनमधील सोमलवाडा हजेरी स्टँडला भेट दिली. येथील २१ पैकी ५ कामगार पूर्वसूचना न देता गैरहजर असल्याचे आढळले. या कामगारांना २४ तासांत कारणे दाखवा नोटीसचे उत्तर देण्यास सांगण्यात आले आहे. उत्तर न आल्यास कारवाई करावी, असे निर्देश पंत यांनी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त राजेश भगत यांना दिले.

## निधन

### शरद बावनकुळे यांचे निधन



**नागपूर :** वृंदावन गार्डन, खामला येथील रहिवासी शरद बावनकुळे यांचे २६ जून २०२५ रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ७३ वर्षांचे होते शुक्रवारी सकाळी त्यांच्या पार्थिवावर सहकार नगर घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. शरद बावनकुळे यांच्या पश्चात डॉ. निशांत आणि विक्रांत हे पुत्र आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# कसोटी सामन्यांतही ‘स्टॉप क्लॉक’!

## ‘आयसीसी’कडून नवे नियम जाहीर

**दुबई: दि. २७ प्रतिनिधी**




कसोटी सामन्यांत षटकांच्या धिम्या गतीवर आळा राखण्यासाठी आता ‘स्टॉप क्लॉक’चा वापर करण्याचा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) निर्णय घेतला आहे. ‘आयसीसी’ने अन्यही काही नियमबदल जाहीर केले असले, तरी चेंडूला लकाकी आणण्यासाठी लाळेच्या वापरास बंदी मात्र कायम आहे.

जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेच्या नव्या २०२५ ते २०२७च्या पर्वासाठी या नियमांचा अवलंब केला जाणार आहे. मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये ‘स्टॉप क्लॉक’चा वापर केला जात होता. आता हा नियम कसोटीतही लागू केला जाणार आहे. दरम्यान, चेंडूवर लाळेच्या वापरास बंदी कायम आहे. मात्र, या नियमात थोडा बदल करण्यात आला आहे. पूर्वी चेंडूला लकाकी आणण्यासाठी लाळेचा वापर करण्यात आल्याचे निदर्शनास आल्यावर पंचांना त्वरित चेंडू बदलावा लागत होता. मात्र, आता चेंडू बदलणे अनिवार्य नसेल असे ‘आयसीसी’ने स्पष्ट केले आहे. तसेच एखाद्या फलंदाजाने ‘शॉर्ट’ धाव घेतल्यास कोणता फलंदाज ‘स्ट्राइक’वर असणार याबाबतचा निर्णय आता प्रतिस्पर्धी संघाकडून घेतला जाईल.

**‘रिव्ह्यू’बाबतही बदल**

‘रिव्ह्यू’च्या नियमातही बदल करण्यात आला आहे. आधीच्या नियमानुसार, चेंडू बॅटला लागून यष्टिरक्षकाकडे गेल्याचे वाटल्याने पंचांनी फलंदाजाला बाद ठरवले आणि फलंदाजाने ‘रिव्ह्यू’ मागितल्यावर चेंडू बॅटऐवजी पॅडला लागल्याचे दिसल्यास त्याला थेट नाबाद ठरवले जायचे. मात्र, नव्या नियमानुसार, चेंडू बॅटऐवजी पॅडला लागल्याचे दिसल्यास तिसरे पंच ‘पायचीत’साठी वापरल्या जाणाऱ्या प्रक्रियेचा अवलंब करतील. या प्रक्रियेअंती फलंदाज पायचीत असल्याचे स्पष्ट झाल्यास त्याला बाद ठरविण्यात येईल.

**नियम काय?**

‘स्टॉप क्लॉक’च्या नियमानुसार, एका षटकाच्या समाप्तीनंतर ६० सेकंदांच्या आत दुसऱ्या षटकाला सुरुवात होणे अनिवार्य असेल. मैदानावरील मोठ्या स्क्रीनवर ही वेळ दाखवली जाईल, असे ‘आयसीसी’ने आपल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केले. अशा चुकीसाठी पंचांकडून दोन वेळा ताकीद दिली जाईल. तिसऱ्यांदा अशी चूक झाल्यास प्रतिस्पर्धी संघाला पाच गुण बहाल केले जातील. ८० षटकांनंतर ताकीद रद्द होईल आणि पुन्हा नव्याने नियम लागू करण्यात येईल.

## वेस्ट इंडिजच्या क्रिकेटपटूवर ११ महिलांनी केला लैंगिक अत्याचाराचा आरोप



**नवी दिल्ली: दि. २७ प्रतिनिधी**

### ऑस्ट्रेलियाविरूद्ध कसोटी मालिकेदरम्यान मोठा गोंधळ

सध्या ऑस्ट्रेलियाचा संघ वेस्ट इंडिज दौऱ्यावर आहे. जिथे संघ कसोटी आणि टी-२० मालिका खेळणार आहे. तर पहिला कसोटी सामना २५ जूनपासून सुरू झाला असून वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांनी सामन्यात उत्कृष्ट कामगिरी केली. दरम्यान वेस्ट इंडिजच्या सिनियर संघाचा भाग असणाऱ्या एका खेळाडूवर लैंगिक अत्याचाराचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. सध्या वरिष्ठ राष्ट्रीय संघाचा भाग असलेल्या वेस्ट इंडिजच्या एका क्रिकेटपटूवर लैंगिक छळ आणि बलात्काराचा आरोप करण्यात आला आहे. कॅरिबियनमधील एका मीडिया रिपोर्टनुसार, अल्पवयीन मुलीसह अकरा महिलांनी एका क्रिकेटपटूवर बलात्काराचा तसंच लैंगिक अत्याचाराचा आरोप केला आहे.

कायतेर न्यूजच्या वृत्तानुसार, ज्या क्रिकेटपटूवर हे आरोप करण्यात आले आहेत, तो गयानाचा आहे. अनेक महिलांनी गयानामधील पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केल्याचे समोर आले आहे. दरम्यान, अहवालात असा दावा केला आहे की हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. अलिकडेच गयाना पोलिस दलाला एका घटनेची तक्रार करणाऱ्या महिलेला तक्रार नोंदवताना प्रश्नोत्तरादरम्यान तिला भावनिक त्रास दिला आणि त्यानंतर तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले. स्थानिक माध्यमांनुसार, या प्रकरणाची चौकशी सुरू आहे.१८ वर्षांच्या एका महिलेच्या कुटुंबाने आरोप केला आहे की, क्रिकेटपटूने ३ मार्च २०२३ रोजी बर्बिसमधील न्यू ॲमस्टरडॅम येथील एका ठिकाणी तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. त्या मुलीला आरोप केलेल्या क्रिकेटपटूचा मित्र तिच्या कामावरून त्या ठिकाणी भेटण्यासाठी घेऊन गेला होता, जो तिच्या कुटुंबाच्या परिचयाचा आहे.ती मुलगी त्या घराजवळ जात असताना तिला अनेक जण तिथे दिसले त्यामुळे तिला सुरुवातीला सुरक्षित वाटलं. पण आत गेल्यानंतर क्रिकेटपटूने तिला वरच्या मजल्यावर नेलं, जिथे हा संपूर्ण प्रसंग घडला. कुटुंबाचा असा दावा आहे की पोलिसांकडून हे प्रकरण लपवण्याचा सतत प्रयत्न केला जात आहे. पीडितेच्या आईने सांगितले की तिच्या मुलीचा आरोपीवर विश्वास होता आणि आता या प्रसंगानंतर ती प्रचंड घाबरली आहे.

## तिसऱ्या पंचांचे दोन वादग्रस्त निर्णय ऑस्ट्रेलियाच्या बाजूने, थर्ड अंपायरच्या निर्णयावरून मोठा गदारोळ

**नवी दिल्ली: दि. २७ प्रतिनिधी**




ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिज यांच्यात कसोटी मालिका खेळवली जात आहे. ही मालिका वेस्ट इंडिजच्या घरच्या मैदानावर असून ऑस्ट्रेलियाचा संघ पहिल्या डावात १८० धावांवर सर्वबाद झाला. तर दुसऱ्या डावात वेस्ट इंडिजचा संघ फक्त १८० धावाच करू शकला. तर दुसऱ्या डावात आता ऑस्ट्रेलिया संघाने पंचांच्या निर्णयाच्या जोरावर आघाडी घेतली आहे.

बार्बाडोसमधील केन्सिंग्टन ओव्हल येथे सुरू असलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाने वेस्ट इंडिजवर ८२ धावांची एक छोटीशी पण महत्त्वाची आघाडी मिळवली, कारण पंचांच्या वादग्रस्त निर्णयांच्या मालिकेने या सामन्याला रोमांचक वळण दिले.

कसोटीच्या दुसऱ्या दिवशी वेगवान गोलंदाजांनी वर्चस्व गाजवलं आणि फलंदाजांचा धावा करण्यासाठी कस लागला. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावातील १८० धावांच्या प्रत्युत्तरात वेस्ट इंडिजने ४ बाद ५७ धावांसह दुसऱ्या दिवशी सुरूवात केली. सकाळच्या सत्रात कर्णधार रोस्टन चेस आणि पुनरागमन करणारा कसोटी फलंदाज शे होप यांच्यात ६७ धावांची भागीदारी झाली, ज्यामुळे यजमान संघ पहिल्या डावात आघाडी मिळविण्याच्या दिशेने अग्रेसर होते. परंतु लंचच्या दरम्यान तिसऱ्या पंचांच्या दोन वादग्रस्त निर्णयांमुळे सामन्यात ऑस्ट्रेलियाने पुनरागमन केलं. वेस्ट इंडिजचा कर्णधार रोस्टन चेस कमिन्सच्या गोलंदाजीवर ४४ धावांवर पायचीत झाला. त्याने लगेचच लगेचच रिव्ह्यूची मागणी केली आणि त्याला खात्री होती की चेंडू बॅटला लागून पॅडला लागला आहे. पण तिसऱ्या पंचांनीही त्याला रिव्ह्यू पाहिल्यानंतर बाद दिलं. पंचांच्या निर्णयामुळे रोस्टन चेस १०८ चेंडूत ५ चौकारांसह ४८ धावा करत बाद झाला.

### शे होप खरेच झेलबाद होता का?

रोस्टन चेसच्या विकेटनंतर काही वेळातच चार वर्षांनंतर पहिलाच कसोटी सामना खेळणाऱ्या शे होपला ब्यू वेबस्टरने ॲलेक्स कॅरीच्या हाती झेलबाद केलं. ऑस्ट्रेलियन यष्टीरक्षकाने पुढे जाऊन एका हाताने झेल घेतला. टेलिव्हिजन रिप्लेवरून असे दिसून आले की चेंडू मैदानावर आदळला असावा, परंतु थर्ड अंपायर एड्रियन होल्डस्टॉकने ऑस्ट्रेलिया संघाच्या बाजूने निकाल दिला. होप ४८ धावांवर बाद झाल्याने विंडिजचा संघ बॅकफूटवर गेला.

## इंग्लंड दौऱ्यापूर्वी केएल राहुलचा टीम इंडियासाठी मोठा त्याग!

**नवी दिल्ली: दि. २७ प्रतिनिधी**

भारताचा नव्या कसोटी संघाची सुरूवात अपेक्षेप्रमाणे झाली नाही. शुबमन गिलच्या नेतृत्त्वाखालील भारतीय संघाचा इंग्लंडने पहिल्याच कसोटीत ५ विकेट्सने पराभव केला. ५ सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात इंग्लंडने ०-१ ने आघाडीवर आहे. तर या सामन्यात भारताने पाच शतकं झळकावली. हेडिंग्ले कसोटीतील प्रमुख कामगिरी करणाऱ्या केएल राहुलने दुसऱ्या डावात शतक झळकावले. दरम्यान केएल राहुलच्या कोचने त्याच्याबद्दल मोठा खुलासा केला आहे.

राहुल संघाच्या आधी इंग्लंडमध्ये पोहोचून सराव करत होता. या मालिकेपूर्वी इंग्लंड लायन्सविरुद्धच्या शेवटच्या अनधिकृत कसोटीत त्याने इंडिया अ संघाकडून शतकही झळकावले होते. आता त्याचा आयपीएल संघ दिल्ली कॅपिटल्सचे मुख्य प्रशिक्षक हेमांग बदानी यांनी या मालिकेसाठी त्याने दिलेल्या त्यागाबद्दल माहिती दिली आहे.

हेमांग बदानी यांनी टाईम्स ऑफ इंडियाला दिलेल्या मुलाखतीत केएल राहुलबद्दल वक्तव्य केलं. केएल राहुलला इंग्लंडला लवकर जायचं होतं आणि इंग्लंड लायन्सविरुद्ध शेवटचा अनधिकृत कसोटी सामना खेळायचा होता जेणेकरून त्याला थोडा सराव करता येईल हे मला खूप आवडलं. त्याने असंही सांगितलं की त्याची लेक इवारा लहान असल्याने यंदा इंग्लंड दौऱ्यासाठी त्याच्याबरोबर जाणार नाहीये. त्यामुळे राहुलचा हा एक मोठा निर्णय होता.हेमांग बदानी म्हणाले, ‘‘मला त्याच्याबाबतीत एक गोष्ट आवडली. तो म्हणाला, मला सराव सामना खेळायचा आहे. त्याचं शतक विसरा, ते शतक त्याने नंतर केले.

## ‘तू रनअपमध्ये धावत नाहीस, माझ्याबरोबर काय...’: बुमराहला पत्नी संजनाने केले ट्रोल

**नवी दिल्ली: दि. २७ प्रतिनिधी**



जसप्रीत बुमराह सध्या भारतीय कसोटी संघासह इंग्लंड दौऱ्यावर आहे, जिथे भारतीय संघ ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. पण या कसोटीची सुरूवात भारतासाठी अपेक्षेप्रमाणे झाली नाही आणि इंग्लंडने टीम इंडियाचा पराभव करत मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. दरम्यान जसप्रीत बुमराह आणि त्याची पत्नी संजना गणेशन यांचा एका मुलाखतीतील व्हीडिओ व्हायरल होत आहे.

जसप्रीत बुमराहसह त्याची पत्नी संजना गणेशनदेखील स्पोर्ट्स अँकर म्हणून इंग्लंड दौऱ्यावर आहे. या इंग्लंड दौऱ्यापूर्वी जसप्रीत बुमराह आणि पत्नी संजना गणेशन ’ या शो मध्ये मुलाखतीला गेले होते. भारताचा माजी फिरकीपटू हरभजन सिंग आणि त्याची पत्नी अभिनेत्री गीता बसरा यांनी एक टॉक शो नुकताच सुरू केला आहे. या शोचा पहिलाच एपिसोड त्यांनी रोहित शर्मा आणि त्याची पत्नी रितिका सजदेह यांच्या मुलाखतीचा शेअर केला होता. रोहित-रितिकानंतर आता हरभजन आणि गीता यांनी बुमराह आणि संजना यांची मुलाखत घेतली आहे. या एपिसोडचा ट्रेलर त्यांनी शेअर केला आहे. यामध्ये बुमराहला संजना ट्रोल करताना दिसत आहे आणि हा व्हीडिओ सध्या भलताच व्हायरल झाला आहे.जसप्रीत बुमराह हा सध्याच्या घडीला जगातील नंबर वन गोलंदाजांपैकी एक आहे. इतर वेगवान गोलंदाजांच्या तुलनेत बुमराहची गोलंदाजी ॲक्शन फारच वेगळी आहे. बुमराह रनअप घेताना हळूहळू धावत येतो, परंतु हायपरएक्सटेंशन आणि रिलीज पॉइंटला येऊन तो इतक्या वेगाने चेंडू टाकतो की, ज्याचा अंदाज घेणं कधीकधी फलंदाजांना कठीण जातं.व्हायरल व्हीडिओमध्ये बुमराह आणि संजना त्यांच्या लव्ह स्टोरीमधील एक किस्सा सांगत आहेत. यादरम्यान बुमराह सुरूवातीला त्यासंबंधित कायतरी म्हणतो. तितक्यात संजना म्हणते, ‘‘जसप्रीत मला म्हणाला; चल आपण पळून जाऊया. यावर मी म्हणाली, पळून जायचंय? तू तर रनअपसाठी पण धावत नाहीस तर माझ्याबरोबर काय पळून येणार तू’’ संजना इतकं बोलते आणि हसायला लागते.भल्याभल्या फलंदाजांसाठी कर्दनकाळ असलेला बुमराहला संजनाने एकाच वाक्यावर क्लीन बोल्ड केलं होत. चाहत्यांनी या व्हीडिओवर लाईक्स आणि कमेंट्सचा पाऊस पाडला आहे. संजना आणि जसप्रीत बुमराह यांचं लव्हमॅरेज आहे. क्रिकेटच्या मैदानावरच हे दोघेही एकमेकांना पहिल्यांदा भेटले होते. कोणालाही खबर न लागू देता बुमराह आणि संजना यांनी लग्न करत सर्वांनाच सुखद धक्का दिला होता. आता संजना आणि बुमराह एका मुलाचे आई-बाबा आहेत. ज्याचं नाव अंगद असं ठेवलं आहे.

## कर्जाचे दर कमी करण्याचे आवाहन





**मुंबई :** रिझर्व्ह बँकेने जूनच्या सुरुवातीला रेपो दरात थेट अर्धा टक्क्यांची कपात केली, तर विद्यमान वर्षात आतापर्यंत व्याजाचे दर १ टक्क्यांनी कमी झाले आहेत. परिणामी सर्व बँकांनी या कपातींचा लाभ कर्जदारांपर्यंत पोहोचवण्यासाठी कर्जाच्या व्याजाच्या दरात किमान ५० आधारबिंदूंची (अर्धा टक्का) कपात करावी, असे रिझर्व्ह बँकेच्या अहवालात सुचविण्यात आले आहे.

रिझर्व्ह बँकेने अर्थव्यवस्थेला चालना देणारी भूमिका घेत रेपो दरात मोठी कपात केली आहे. त्याला अनुसरून बहुतेक बँकांनी फेब्रुवारी आणि एप्रिलमध्ये व्याजदर कपातीचा लाभ त्यांच्या ग्राहकांना दिला आहे. शिवाय ६ जून रोजी रिझर्व्ह बँकेने रेपो दरात आणखी ५० आधारबिंदूंची कपात केल्यानंतर काही दिवसांतच स्टेट बँक, बँक ऑफ बडोदा आणि एचडीएफसी बँक यासह अनेक मोठ्या बँकांनी रेपो दराशी संलग्न कर्जदरात कपात केली. शिवाय रेपो दरात कपात करण्याव्यतिरिक्त, मध्यवर्ती बँकेने रोख राखीव प्रमाण ( कॅश रिझर्व्ह रेशो सीआरआर) मध्ये १०० आधार बिंदूंची कपातीची घोषणा केली आहे.रिझर्व्ह बँकेच्या जून २०२५ च्या अहवालामध्ये ‘अर्थव्यवस्थेची स्थिती’ यावरील लेखात म्हटले आहे की, पत बाजारात दर कपातीचे कार्यक्षम संक्रमण सुलभ करण्यासाठी आर्थिक परिस्थिती अनुकूल आहे. ‘सीआरआर’मधील कपातीमुळे डिसेंबर २०२५ पर्यंत बँकिंग प्रणालीमध्ये सुमारे २.५ लाख कोटी रुपयांची तरलता निर्माण होईल. परिणामी बँकांकडून अधिक प्रभावीपणे पत पुरवठ्यात वाढ व्हावी यासाठी व्याजदरात कपात होणे गरजेचे आहे. शिवाय व्याजदर कपातीमुळे बँकांचा निधी गोळा करण्यावरील खर्च अर्थात मुदत ठेवींवर द्यावा लागणाऱ्या व्याजापोटी खर्चात देखील कपात होणार आहे. याचे प्रतिबिंब कर्ज स्वस्त होण्यात उमटताना दिसायला हवे.

# पुन्हा सुरु झाले टॅरिफ नाटक

**नवी दिल्ली: दि. २७ प्रतिनिधी**



इराण आणि इस्रायलमध्ये युद्धाची आग थंड झाल्यावर आता डोनाल्ड ट्रम्प यांचे पुन्हा एकदा टॅरिफ नाटक सुरु झाले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि अमेरिका यांच्यात व्यापार करार होणार आणि चीनसोबतच्या कराराइतकाच खूप मोठा करार असेल असा दावा केला आहे. अमेरिकेने आधीच चीनसोबत व्यापार करार केला असून २६ जून रोजी वॉशिंग्टन डीसी येथे एका कार्यक्रमात ट्रम्प म्हणाले की अमेरिकेने नुकताच चीनसोबत करार केला आणि आता भारतासोबतही एक खूप मोठा करार होणार आहे.

ट्रम्प यांनी भारत आणि अमेरिकेतील या करारात काय असेल आणि कोणत्या मुद्द्यावर दोन्ही देशांमधील चर्चा किती पुढे पोहोचली आहे याबद्दल कोणतीही माहिती दिली नाही. त्याचवेळी, भारताने अमेरिकेला हा करार दोन्ही देशांसाठी फायदेशीर असेल तरच करारावर स्वाक्षरी करायचं स्पष्ट केलं आहे.

दरम्यान, ट्रम्प यांच्या विधानापूर्वी या महिन्याच्या सुरुवातीला अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांनी अमेरिका-भारत धोरणात्मक भागीदारी मंच, , मध्ये भारत-अमेरिका व्यापार कराराबद्दल दोन्ही देशांनी अनेक मुद्द्यांवर ‘सामान्य दृष्टिकोन’ गाठला आणि लवकरच एक संतुलित व्यापार करार होऊ शकतो, असा दावा केला होता. दुसरीकडे, भारताचे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी १० जून रोजी पत्रकार परिषदेत सांगितले की, आम्ही भारत आणि अमेरिका दोघांसाठीही फायदेशीर व्यापार करार करण्याच्या दिशेने काम करत आहोत. त्यांनी स्पष्ट केले की हा करार निष्पक्ष आणि संतुलित असेल.


एकीकडे अमेरिका लवकरात लवकर करार करायच्या घाईत आहे तर भारत कोणतीही घाई करत नाही आणि आधीच हितांशी तडजोड करायची नाही असं कळवलं आहे. ९ जुलैनंतर २६% कर आकारणीचा संभाव्य धोका असूनही भारत कोणत्याही परिस्थितीत झुकण्याच्या मनःस्थितीत नाही.

### भारत–अमेरिकेतील ट्रेड डीलवर काय म्हणाले डोनाल्ड ट्रम्प

‘‘आम्ही भारतासाठी दरवाजे उघडणार आहोत. आम्ही चीनसोबतही असेच करत आहोत. या अशा गोष्टी आहेत ज्या यापूर्वी कधीही शक्य नव्हत्या,’’ ट्रम्प म्हणाले. भारत आज जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे आणि जागतिक पुरवठा साखळीतील बदलांच्या पार्श्वभूमीवर अमेरिका आपल्या धोरणात्मक व्यापार भागीदारीची पुनर्परिभाषा करत आहे. ट्रम्प म्हणाले की अमेरिका प्रत्येक देशासोबत व्यापार करार करणार नाही. त्यांनी म्हटले की, ‘‘काही देशांना आम्ही फक्त पत्र पाठवून धन्यवाद देऊ, पण आता तुम्हाला २५, ३५ किंवा ४५ टक्के शुल्क भरावे लागेल.’’

## शेअर बाजार गुंतवणूकदार ९.७० लाख कोटींनी श्रीमंत

**मुंबई: दि. २७ प्रतिनिधी**



जागतिक पातळीवरील भू-राजकीय तणाव कमी झाल्यामुळे आणि गुंतवणूकदारांनी बाजारातील दिग्गज कंपन्यांच्या समभागांत खरेदीचा जोर लावल्याच्या परिणामी गुरुवारच्या सत्रात प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टी १ टक्क्यांहून अधिक वधारले.

गुरुवारी सत्राअखेर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स १,०००.३६ अंशांनी वधारून ८३,७५५.८७ पातळीवर स्थिरावला. दिवसभरात त्याने १,०५६.५८ अंशांची कमाई करत ८३,८१२.०९ या सत्रातील उच्चांकी पातळीला स्पर्श केला. बुधवारच्या सत्रात सेन्सेक्सने ७०० अंशांची मुसंडी मारली होती. दुसरीकडे राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टीने ३०४.२५ अंशांची घातली आणि तो २५,५४९ पातळीवर बंद झाला.

आखातातील युद्धविरामानंतर गुंतवणूकदारांच्या बाजारावरील मजबूत विश्वासाचे प्रतिबिंबित म्हणजे सलग तीन सत्रात सेन्सेक्स १८०० अंशांहून अधिक वधारला आहे.युद्ध तणाव निवळल्यामुळे संभाव्य पुरवठा साखळी व्यत्ययांवरील चिंता कमी झाल्या आहेत. अमेरिका आणि भारताच्या सरकारी रोख्यांच्या परतावा दर कमी झाल्यामुळे परदेशी गुंतवणूकदारांनी समभाग विक्री सुरू ठेवली आहे. मात्र अर्थव्यवस्थेस अनुकूल परिस्थिती बघता देशांतर्गत गुंतवणूकदार निव्वळ खरेदीदार बनले आहेत. चलनवाढीची चिंता कमी झाल्याने क्षेत्रीय पातळीवर बँकिंग आणि वाहन निर्मितीसारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये तेजीचे वातावरण आहे, असे जिओजित इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेडचे संशोधन प्रमुख विनोद नायर यांनी नोंदवले.

सेन्सेक्समधील आघाडीच्या कंपन्यांपैकी टाटा स्टील, बजाज फायनान्स, भारती एअरटेल, अदानी पोर्ट्स, बजाज फिनसर्व्ह, एनटीपीसी, एचडीएफसी बँक, रिलायन्स इंडस्ट्रीज आणि ॲक्सिस बँक यांचे समभाग तेजीत होते. तर बाजार तेजीच्या सत्रात ट्रेंट, स्टेट बँक , टेक महिंद्र, मारुती आणि महिंद्र अँड महिंद्र यांची कामगिरी निराशाजनक राहिली.इराण-इस्रायलमधील तणाव कमी झाल्यानंतर वाढत्या आशावादामुळे बाजारातील तेजीच्या तीन सत्रात गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ९.७० लाख कोटी रुपयांची वाढ झाली. सेन्सेक्सने सलग तीन सत्रात २.२७ टक्के म्हणजेच १,८५९.०८ अंशांची कमाई केली आहे. परिणामी मुंबई शेअर बाजारातील सूचिबद्ध कंपन्यांचे बाजारभांडवल ९.७० लाख कोटी रुपयांनी वाढून ४५७.५२ लाख कोटी रुपयांवर (५.३४ ट्रिलियन डॉलर) पोहोचले आहे.

## एचडीबी फायनान्शियलच्या ‘आयपीओ’त दुसऱ्या दिवशी भरणा पूर्ण

**मुंबई: दि. २७ प्रतिनिधी**




खासगी क्षेत्रातील सर्वात मोठी बँक असलेल्या एचडीएफसी बँकेची उपकंपनी एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेसच्या सध्या सुरू असलेल्या अलिकडच्या काळातील मोठ्या म्हणजेच १२,५०० कोटी रुपयांच्या भागविक्रीला (आयपीओ) गुरुवारी दुसऱ्या दिवशी १०० टक्क्यांहून अधिक भरणा पूर्ण करणारा, म्हणजे १.१६ पटीने समभागांची मागणी नोंदविणारा प्रतिसाद मिळाला.

राष्ट्रीय शेअर बाजाराकडील माहितीनुसार, १२,५०० कोटी रुपयांच्या प्रारंभिक समभाग विक्रीसाठी उपलब्ध १३.०४ कोटी समभागांच्या तुलनेत १५.११ कोटी समभागांसाठी बोली लावण्यात आली. बिगर-संस्थात्मक गुंतवणूकदारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या भागासाठी २.२९ पट अधिक भरणा झाला, तर पात्र संस्थात्मक खरेदीदारांसाठी राखीव हिस्सा ९० टक्के आणि किरकोळ वैयक्तिक गुंतवणूकदारांसाठी राखीव ठेवण्यात आलेला भागासाठी ६४ टक्के भरणा झाला आहे. या आधी सुकाणू गुंतवणूकदारांकडून कंपनीने ३,३६९ कोटी रुपयांचा निधी उभारला आहे. शुक्रवारी आयपीओसाठी अर्ज करण्यासाठी गुंतवणूकदारांना अखेरची संधी आहे.

























संकलन- गणेश निकम,जिल्हा प्रतिनिधी बुलडाणा मो. ९४०३४७८५४०






अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, शनिवार, दि. २८ जून २०२५







# आपत्ती व्यवस्थापनासाठी जिल्हा प्रशासन 'अलर्ट'

## जिल्ह्यातील ८२ गावांमध्ये संभाव्य पूरस्थितीचा धोका

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २७ :** पावसाळ्याच्या दिवसात जिल्ह्यातील ८२ गावांमधील संभाव्य पूरस्थिती नियंत्रणासाठी जिल्हा प्रशासन अलर्ट झाले आहे. या गावात संभाव्य पूरस्थितीवर तत्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित सर्व यत्रणांना दिले असून, आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक प्रशिक्षण, साहित्य उपलब्ध करण्यात आले असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

जिल्ह्यात पावसाळ्याच्या दिवसात नदी, नाल्यांना पूर आल्याने अनेक गावांत मोठ्या प्रमाणात नुकसान होते. गत वर्षी अतिवृष्टी आणि पुरामुळे जिल्ह्यातील ५१२ घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान आणि १५ मानवी मृत्यू झाले होते. जिल्ह्यातील सर्वात मोठी पूर्णा नदी असून या नदीला इतर नद्या मिळतात. अमरावती जिल्ह्यातील चंद्रभागा, चारगड, शहानूर, पूर्णा या प्रकल्पाचे विसर्गाचे पाणी पूर्णा नदीत येते. तसेच जिल्ह्यातील काटेपूर्णा, मोर्णा, पोपटखेड प्रकल्पाचे विसर्गाचे पाणी पूर्णा नदीत मिळते, त्यामुळे पूरस्थिती निर्माण होऊन मोठ्या प्रमाणात जीवित व वित्त हानी होत असते. यावर्षी आपत्ती निवारणासाठी जिल्हा प्रशासनाकडून नियोजनबद्ध तयारी करण्यात आली आहे.

### बचाव कार्यासाठी साहित्य

यामध्ये तहसील स्तरावर प्रती तहसील २० लाइफ जॅकेट, २० लाईफ रिंग, १०० मीटर रोप, अकोट, मूर्तिजापूर तहसीलमध्ये इन्फ ेटेबल बोट वोबीएमसह विभागीय अधिकारी १, प्रती तहसील ३ सर्च लाईट, इमर्जन्सी लाईट, केळीवेळी, दोनवाडा येथे एचडीपीई ६ सीटर बोट विथ वोबीएम उपलब्ध करून देण्यात आले असून, जिल्हाधिकारी कार्यालयस्तरावर दोन रबर बोट, १० लाईफ जॅकेट, १० लाईफ बोया, १ रोप-रेस्क्यु किट, २ सर्चलाईट, १ एअर पम्प उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पोलीस विभाग, होमगार्ड, नगर परिषद, अग्निशमन विभाग, महानगरपालिका प्रशासनाकडेसुद्धा हे सर्व साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. यासोबतच पूरबाधित गावामध्ये तात्पुरते शाळांमध्ये निवारे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

### पातूर तालुक्यात पीक नुकसानासह जमीन खरडून गेली

**अकोला :** जिल्ह्यात शुक्रवार (ता.२७) झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील ५२ मंडळांपैकी १३ मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झालेली आहे. या अतिवृष्टीमुळे पातूर व बाळापूर तालुक्यातील ८५ घरांचे अंशतः नुकसान झाल्याचा अहवाल जिल्हधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे. या अतिवृष्टीमुळे पातूर तालुक्यातील ११ तर बाळापूर तालुक्यातील ७४ घरांचे अंशतः नुकसान झाले आहे. यासोबतच पातूर तालुक्यातील ३२ गावात तूर, सोयाबीन, कपाशी व इतर पिकांचे ८८७.०० हे. आर शेती पिकाचे नुकसान झाले असून, ३५०.८० हे. आर. शेतजमीन खरडून गेली आहे. अतिवृष्टीमुळे पातूर तालुक्यातील एक मोठे तर तीन लहान जनावरे मृत झाली आहेत, तसेच तालुक्यातील झरंडी, वसाली, पिंपळखुटा व राहेर गावातील रस्ते व पुलांचे अंशतः नुकसान झाल्याचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे.

### आरोग्य यंत्रणा सज्ज

वैद्यकीय मदतीसंदर्भात १०८ टोल फ्री क्रमांकावर ॲम्ब्युलन्स सेवा उपजिल्हा रुग्णालयात १, तालुका ग्रामीण रुग्णालयात ५, प्राथमिक आरोग्य केंद्रात ३१ ॲम्ब्युलन्स उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यासोबतच जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय, मेडिकल कॉलेज, उपजिल्हा, तालुका ग्रामीण आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर ठेवण्यात आली आहे.

## मोकाट जनावरांचा मुक्त संचार...



**अकोला जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात मोकाट जनावरांचा नेहमीच मुक्त संचार असतो. जिल्ह्यातील नागरिकांची कामासाठी नेहमीच वर्दळ असते. या मोकाट जनावरांचा नागरिकांना तसेच वाहनधारकांना नाहकच त्रास सहन करावा लागत असून, या मोकाट जनावरांचा म. न. पा. अधिकारी यांनी ताबडतोब बंदोबस्त करावा, अशी नागरिकांकडून मागणी होत आहे. (छाया. संजय ताथुरकर)**

## अकोल्यात 'ऑटो-राज'; वाहतूक यंत्रणेचे 'ब्रेकडाउन'

### गांधी रोड ते बसस्थानक पायी चालणेही धोकादायक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २७ :** गांधी रोड, धिंग्रा चौक, टॉवर चौक, जयहिंद चौक व बसस्थानक-रेल्वे परिसर सध्या अक्षरशः 'ऑटो-झोन' बनले असून, रस्त्यांवर शेकडो सवारी ऑटोरिक्षांचा अतिक्रमणमेळा सुरूच आहे. महापालिकेने उभारलेल्या अधिकृत स्टॅण्डना केराची टोपली दाखवत हे रिक्षेवाल्यांचे 'चलते स्टॅण्ड' सुरूच असल्याने ४० फूट रूंदीचा मार्ग अर्ध्यावर आणत आहेत. परिणामी, दुचाकी-चारचाकींना एका रांगेत मार्ग काढावा लागत असून, पायदळचालकांना जीव मुठीत धरून चालावे लागत आहे.

भर गर्दीतच प्रवासी उतर-चढ करणाऱ्या रिक्षांमुळे मागील वाहनांना अचानक ब्रेक द्यावी लागत असल्याने परिणामी किरकोळ अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहेत. साइड देण्याची मागणी केली तरी चालकांची शिवीगाळ-हुल्लडबाजी सुरू होते, अश्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. त्यामुळे ट्रॅफिक व परिवहन यंत्रणांनी अश्या वाहतुकीची कोंडी करून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना दंडात्मक कारवाई सुरु करण्याची मागणी करण्यात येत आहे.

#### नागरिक संतप्त

आता आमचा संयम संपला आहे. अकोला शहर ऑटोंचे शहर म्हणून ओळखले न जावे, अशी संतप्त प्रतिक्रिया शहरवासीयांनी नोंदवली आहे. प्रशासनाने त्वरित जागे होऊन वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षांवर कडक दंड ठोठवावा, अशी मागणी करत आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

## दिवसा घरफोडी करणाऱ्या दोघांना अटक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** खदान पोलीस ठाणे हद्दीत घडलेल्या दिवसा घरफोडीप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखा अकोला व वाशिमच्या पथकाने दोघांना अटक केली असून, त्यांच्या ताब्यातून एकूण १ लक्ष ३७ हजार किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

२ जानेवारी २०२५ रोजी रेखा विजय घोडे (रा. बसेरा कॉलनी, अकोला) या कामावर गेल्यानंतर अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून १ लाख रोख व १० ग्रॅम सोन्याचा गोफ ४५ असा एकूण १.४५ लाखांचा ऐवज चोरून नेला होता. याप्रकरणी खदान पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर प्रकरणाचा तपास करत असताना स्थानिक गुन्हे शाखेने आरोपी आकाश प्रकाश पवार (३५) रा. फत्तेपुर, जि. बुलडाणा) व उमेश गटरंग पवार (२८), रा. फत्तेपूर, जि. बुलडाणा) यांना अटक केली. चौकशीत त्यांनी खदानसह जुने शहर व तेल्हारा येथील घरफोडी गुन्ह्यांची कबुली दिली. त्यांच्याकडून १५ ग्रॅम सोने (१.३५ लाख) व २० ग्रॅम चांदी (२,०००) असा एकूण १.३७ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. शंकर शेळके, विजय चव्हाण व त्यांच्या पथकाने केली.

## मुलीला फूस लावून पळविणाऱ्या आरोपीला पोलीस कोठडी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला फूस लावून लग्न करण्याच्या उद्देशाने मुंबई व पुण्याला पळवून नेणाऱ्या आरोपी रितिक मनोज किल्लेकर (वय २४, रा. शिक्षक कॉलनी, अकोट) याला अकोट सत्र न्यायालयाने २९ जून २०२५ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई अकोट शहर पोलीस स्टेशनने दाखल केलेल्या गुन्हा क्र. ६४/२०२५ अन्वये भारतीय दंड संहिता कलम १३७ (२), ६४, ६४ (२)(एम) बीएनएस आणि पोक्सो कायदा कलम ३ व ४ अंतर्गत करण्यात आली आहे.सदर प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक अविनाश मोहिते करीत असून, आरोपीस २६ जून रोजी रात्री अटक करण्यात आली. यानंतर सरकारी वकील अजित देशमुख यांनी आरोपीस पोलीस कोठडी देण्याची मागणी न्यायालयात केली. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, पीडिता अलिकडच्या काळात आरोपीसोबत सतत फोनवर संपर्कात होती. १० फेब्रुवारी २०२५ रोजी ती अचानक बेपत्ता झाली होती. शोधाशोधीनंतर आरोपीनेच तिला फ ूस लावून पळवून नेल्याचे स्पष्ट झाले. २६ जून रोजी पीडिता आणि आरोपी पोलीस स्टेशनमध्ये हजर झाले. त्यावेळी पीडितेने दिलेल्या जबाबात, आरोपीने तिला फसवून पवार वस्ती, डांगे चौक, पुणे येथे रूमवर ठेवून फ ेब्रुवारीपासून वारंवार शारीरिक संबंध ठेवले असल्याचे सांगितले. तसेच आरोपीने पीडितेसोबत आळंदी येथे विवाह केला असल्याचेही उघड झाले. या प्रकरणात वैद्यकीय तपासणी, घटनास्थळ पंचनामा, आरोपीची चौकशी, त्याने कोणाच्या मदतीने ही कृती केली, याचा तपास आवश्यक असल्याने पोलीस कोठडीची गरज असल्याचे सरकार पक्षाचे म्हणणे होते. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून आरोपी रितिक किल्लेकर याला २९ जून २०२५ पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.

## सामान्य प्रशासन अधीक्षक पदावर पद रिक्त होण्यापूर्वी दिली नियुक्ती

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**वंचित बहुजन आघाडीची मुख्यमंत्र्यांसह सीईओंकडे तक्रार**

**अकोला, दि. २७ :** जिल्हा परिषदमध्ये पदोन्नतीसाठी काही विशिष्ट कर्मचाऱ्यांना शासन निर्णय आणि नियम धाब्यावर बसवून बदली आणि पदोन्नती दिली जात आहे. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी तसेच प्रशासनात असलेल्या इतर अधिकाऱ्यांनी १ जुलै २०२५ रोजी रिक्त होणाऱ्या अधीक्षक सामान्य प्रशासन विभाग या सुनील जानोरकर यांचे पदावर दोन महिन्याआधीच कनिष्ठ प्रशासन अधिकारी असलेल्या गिरीश मोगरे यांची नियमबाह्य नियुक्ती केली आहे, असा आरोप वंचित बहुजन युवा आघाडीचे प्रदेश महासचिव राजेंद्र पातोडे यांनी मुख्यमंत्री, मुख्य सचिव व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केलेल्या तक्रारीत केला आहे.

गिरीश मोगरे हे मूर्तिजापूर पंचायत समितीमध्ये कार्यरत असताना आणि कुठल्याही प्रकारे बदलीसाठी पात्र नसताना विभागीय आयुक्तांमार्फत त्यांची बदली जिल्हा परिषद बांधकाम विभागात करण्यात आली होती. एवढेच नव्हे तर सुनील जानोरकर हे शिक्षण विभागात कार्यरत असताना त्यांची सामान्य प्रशासन विभाग येथे अधीक्षक म्हणून बदली करण्यात आली. आणि अजून १ जुलै २०२५ उजाळायचा असताना गिरीश मोगरे यांची जागा रिक्त होण्यापूर्वी सामान्य प्रशासन विभाग अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्याचा प्रताप पदोन्नती समितीने घेतला आहे. जिल्हा परिषद मध्ये कार्यरत इतर अधिकारी, कर्मचारी यांना मात्र बदली आणि पदोन्नतीसाठी अनेक शासन निर्णय, शासकीय नियम लावून नोकरी करावी लागते.

त्यांचे संपूर्ण हयात जिल्हा परिषदेच्या विविध तालुका पातळीवर असलेल्या पदावर कार्यरत राहून संपून जाते. मात्र त्यांना अशी सूट मिळत नाही. संघटनेचे पदाधिकारी म्हणून काही विशिष्ट कर्मचारी यांना मात्र बदली आणि पदोन्नतीसाठी सर्व नियम मोडून शासकीय नियमाची थट्टा सुरू आहे, असेही वंचित बहुजन युवा आघाडीचे प्रदेश महासचिव राजेंद्र पातोडे यांनी निवेदनात म्हटले आहे. विशेष म्हणजे सुनील जानोरकर यांच्यावर महिला कर्मचारी यांच्या लैंगिक छळ केल्याबद्दल नुकताच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनेक वर्षे संबंधित महिला कर्मचारी यांच्या लैंगिक छळ सुरू असल्याची तक्रार असताना विशाखा समितीचा अहवाल सादर होईपर्यंत जिल्हा परिषद प्रशासनाकडून कुठलीही कारवाई करण्यात आली नाही, ही अत्यंत धक्कादायक बाब आहे. गुन्हा दाखल होऊनदेखील त्यांना निलंबित करण्यात आलेले नाही, त्याच वादग्रस्त अधिकारी यांचे भविष्यात रिक्त होणाऱ्या जागांवर नियुक्ती देण्याचा प्रताप केला जाणे हा शासकीय जागा आणि बदली तसेच पदोन्नतीसाठी अत्यंत गंभीर आहे. करिता रिक्त होण्यापूर्वी देण्यात आलेली बदली रद्द करून असा निर्णय घेणाऱ्या समितीवर कार्यवाही करण्यात यावी, अन्यथा आम्ही देऊ त्या अधिकारी कर्मचारी यांना आमच्या यादीनुसार बदली आणि पदोन्नती देण्यात यावी. नियम धाब्यावर बसवून जर कामकाज चालवले जात असेल तर त्याचा लाभ सर्व वंचित बहुजन अधिकारी, कर्मचारी यांना झाला पाहिजे, असेही वंचित बहुजन युवा आघाडीचे प्रदेश महासचिव राजेंद्र पातोडे यांनी तक्रारीत म्हटले आहे.

## वटपौर्णिमा उत्सवानिमित्त महिलांसाठी आज खास कार्यक्रमांची मेजवानी

### स्पर्धेत बक्षिसांची लयलूट; तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी आणि दैनिक अजिंक्य भारततर्फे आयोजन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** महिलांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी आणि दैनिक अजिंक्य भारततर्फे येथील खंडेलवाल भवन येथे शनिवारी (ता.२८) दुपारी एक वाजता वटपौर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवात महिलांसाठी वटपौर्णिमा विशेष स्पर्धा घेण्यात येणार असून, महिलांनी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फ ेअर सोसायटी आणि दैनिक अजिंक्य भारततर्फे वटपौर्णिमा उत्सवानिमित्त विशेष स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, वटपौर्णिमा महत्त्व कथन स्पर्धा, थाळी सजावट स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा, नृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास उपस्थित प्रमुख पाहुणे म्हणून तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी तथा अजिंक्य भारतच्या संचालिका तनुजा सुगत वाघमारे, एस. एस. खरोटे सुवर्णकार प्रतिष्ठानच्या संचालिका दीपाली सुनील खरोटे, लाईट ऑफ सक्सेस ॲकॅडमी अकोलाच्या संचालिका शुभांगी साकरकर,




प्रीती फॅशन अ‍ॅन्ड ब्युटी पार्लरच्या संचालिका प्रीती जामोतकर, युव्ही इनोव्हेशन प्रायव्हेट लिमीटेडच्या संचालिका जान्हवी सावजी, जागृती महाविद्यालयाच्या प्रिया वखरे, अग्रवाल स्किन ॲण्ड हेअर क्लिनिकचे संचालक डॉ. प्रवीण अग्रवाल, कोठारी कंस्ट्रक्शन कंपनीच्या संचालिका नितीशा कोठारी, पूजा बुटीक ॲन्ड रेंटल हाऊसच्या संचालिका पूजा राऊत आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेत परीक्षक म्हणून प्रीती घनबहादुर, भाग्यवती तायडे, ज्योती वर्मा, दीपाली काटे, वंदना गोमासे, स्नेहा पंचारिया आदी मान्यवर उपस्थित राहतील. या स्पर्धेत विजयी स्पर्धकांवर भरपूर बक्षिसांची लयलूट होणार असून, कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित प्रेक्षक महिलांसाठीदेखील बक्षीस जिंकण्याची सुवर्णसंधी मिळणार असून, सांस्कृतिक रंग आणि आनंदाची पर्वणी मिळणार आहे. या कार्यक्रमास सर्व महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

#### यांचे सहकार्य

महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आयोजित या कार्यक्रमास खरोटे ज्वेलर्स, प्रीती फॅशन अँड ब्युटी पार्लर, लाईट ऑफ सक्सेस ॲकॅडमी अकोला, युव्ही ई बाईक्स, कोठारी कंस्ट्रक्शन कंपनी अकोला यांचे सहकार्य लाभले आहे.

# खामगाव शहरातील अतिक्रमणे हटविली !

## कुणी म्हणतो...रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास...तर कुणाच्या रोजगाराचा घात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि. २७ : आज सकाळी नगरपालिकेचे बुलडोरजर चालायला सुरवात झाली आणि मोठ्या प्रमाणात रस्त्यालगतचे अतिक्रमण हटविले. यावेळी काही नागरिकांनी अतिक्रमण हटाव मोहिमेचे स्वागत केले आणि रस्ते मोकळे झाल्याने आनंद व्यक्त केला, तर शहरातील काही नागरिकांच्या रोजगारावर बुलडोझर चालल्याने त्यांनी अक्षरशः टाहो फोडला आणि रोजगाराचा घात झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.**

बुलडाणा जिल्हयातील व्यावसायिक हब म्हणून ओळखल्या जाणारे खामगाव शहरात आज नगर परिषदेने मोठ्या प्रमाणात अतिक्रमण काढण्याची मोहिम राबवीली. प्राप्त माहिती नुसार आज आणि उद्या म्हणजेच दि. २७ आणि दि.२८ जुन असे दोन दिवस ही मोहिम राबविल्या जाणार आहे. खामगाव शहरात नगर परिषद ते टॉवर चौकापर्यंत, महात्मा गांधी पुतळ्याजवळील, शहर पोलिस स्टेशन समारील, शाळा क्र. ६ समोरील सर्व अतिक्रमण आज दुपारी दोन वाजेपर्यंत काढण्यात आले होते. यावेळी अतिक्रमण धारकांची एकच धावपळ उडाली. अगदी त्यांच्या व्यवसायावर घाव घातल्या जात असल्याने अनेकांच्या डोळ्यात अश्रु दिसत होते. तर काही पक्के दुकानांसमोर बनविलेले टिन सेड जे अतिक्रमणात येतात त्यावरही आज नगर पालिकेने कडक भुमिका घेत बुलडोजर चालविले. शहरात या अतिक्रमण मोहिमे बाबत समिश्र प्रतिक्रया उमटत असल्याचे दिसून येत आहे. काही नागरिकांच्या मते अतिक्रमण मोहिम आश्यक होती तर काहिंच्या मते अनेक बेरोजगार युवक टपरी थाटून आपला उदरनिर्वाह चालवित होते. त्याचे उदरनिर्वाहाचे साधन प्रशासनाने हिरावून घेतले आहे. अनेक अतिक्रमणात दुकान थाटलेल्या युवकांनी पर्यायी जागा नगर परिषदेने उपलब्ध करून देण्याची सुध्दा मागणी केली आहे.

नगर परिषदेच्या अतिक्रमण हटाव मोहिमेत गोरगरीब नागरिकांच्या पोटावर लाथ बसली असल्याने अनेक नागरिक संताप व्यक्त करित आहेत. अतिक्रमण काढतांना जेसीबीद्वारे अनेक दुकाने काढतांना साहित्याची तोडफोड झाल्याने लाखोंचे नुकसान झाले आहे. नगर परिषदने उदरनिर्वाहाचे पर्यायी सुविधा उपलब्ध करून न दिल्याने कुटुंबावर उपास मारीची वेळ यणार असल्याने युवक हतबल झाल्याचे दिसत होते. लोकप्रतिनिधीचे जनतेच्या समम्याकडे अगदी दुर्लक्ष करित असल्याचे बोलल्या जात आहे. अतिक्रमण काढण्यापूर्वी गोरगरीब जनतेला नोटीस दिल्या मात्र खामगाव नगर परिषद व स्थानिक लोकप्रतिनिधी पर्यायी व्यवस्था करून देण्याची आवश्यकता असताना नगर परिषद व स्थानिक लोकप्रतिनिधीनी नागरिकांच्या समस्याकडे दुर्लक्ष केल्याची सामान्य नागरिकांची ओरड असल्याचे दिसून आले. अतिक्रमण दुकान काढल्याने बेराजगार युवक नगर परिषद प्रशासनावर आरोप करित आहेत. धनाढ्य लोकांचे अतिक्रमण काढण्यास दिरंगाई करत असून त्यांचे अतिक्रमण कधी काढणार? असा प्रश्न उपस्थित करीत आहेत. गोरगरीब जनतेच्या पोटावर लाथ मारण्याऱ्या अतिक्रमण हटाव मोहीम, नगर परिषद व लोकप्रतिनिधिचा अतिक्रमण धारक गोरगरीब नागरिकांकडून जाहीर निषेध करण्यात येत आहे. आज दिवसभर शहरात व्यावसायिकांची एकच धावपळ दिसून आली.

### दोन दिवस चालणार मोहीम,न.प.प्रशासन ॲक्शन मोडवर





शहरात अतिक्रमण हटाव मोहिम राबवितांना नगर परिषदेचे मुख्याधिकारी प्रशांत शेळके, स्व:ता पाहणी करून अतिक्रमण हटवितांना



टॉवर चौकात असलेले २० ते २५ वर्षांपासून असलेले अतिक्रमणसुध्दा आज हटविण्यात आले



अतिक्रमण काढतावेळी विरोध करतांना अतिक्रमणधारक महिला



अतिक्रमण हटाव मोहिम सुरू होताच स्वयंस्फुर्तीने अतिक्रमण काढतांना



शहरातील शाळा क्रं.६ जवळील जुने पक्के अतिक्रमण पाडतांना



अतिक्रमण मोहिम राबवितांना कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून गस्त घालतांना पोलिस

## बुलडाण्यात उद्योजकांसाठी सस्टेनेबिलिटी, व्यवसाय सुलभता व नियम शिथिलीकरण विषयांवर कार्यशाळा संपन्न

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि. २७:** जिल्ह्यातील उद्योजकांसाठी सस्टेनेबिलिटी, व्यवसाय सुलभता तसेच डी रेग्युलेशन नियम शिथिलीकरण या महत्वपूर्ण विषयांवर एकदिवसीय कार्यशाळा येथील नर्मदा हॉटेलच्या सभागृहात गुरुवारी यशस्वीरीत्याा आयोजित करण्यात आली. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर, पुणे यांच्यावतीने आयोजित या कार्यक्रमात बुलढाणा जिल्ह्यातील ६० उद्योजकांनी सक्रिय सहभाग घेतला. कार्यशाळेचे उद्घाटन सत्र अत्यंत माहितीपूर्ण ठरले.

पुणे येथील राईस एन्टरप्रासेसचे प्रकल्प प्रमुख योगेश जोशी यांनी सस्टेनेबिलिटी (शाश्वतता) या विषयावर सखोल मार्गदर्शन




केले. त्यांनी ऊर्जा संवर्धन, अक्षय ऊर्जा आणि अपारंपरिक ऊर्जा, तसेच हरित ऊर्जा व हरितगृह वायू या संकल्पना स्पष्ट केल्या. याव्यतिरिक्त, त्यांनी कचरा व्यवस्थापन, प्रदूषण आणि लीन मॅन्युफॅक्चरिंगच्या माध्यमातून शाश्वतता कशी साध्य करता येते, यावर भर दिला. उद्योगाच्या बजेटिंगच्या महत्वावरही त्यांनी प्रकाश टाकला. उद्योग मित्र कन्सल्टन्सी प्रा. लि., नवी मुंबईचे इंजिनिअर प्रितेश भेदे यांनी गव्हर्मेंट ई-मार्केटप्लेस पोर्टल वर नोंदणी कशी करावी आणि सरकारी निविदा कशा तयार कराव्यात, याबाबत सविस्तर आणि उपयुक्त माहिती दिली. यामुळे उद्योजकांना शासकीय खरेदी प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळेल. याप्रसंगी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे यांनी नियम शिथिलीकरण (डीरेग्युलेशन) या विषयावर विस्तृत सादरीकरण केले. त्यांनी शासनाचे नवीन धोरणे आणि नियम उद्योजकांना व्यवसाय करणे कसे सोपे करत आहेत, याबाबत माहिती दिली. तसेच उपस्थित उद्योजकांशी थेट संवाद साधून त्यांच्या शंकांचे निरसन केले.

व्यवस्थापक सुनील पाटील यांनी महाराष्ट्र शासनाच्या मैत्री पोर्टल माहिती दिली. हे पोर्टल उद्योजकांना विविध परवानग्या आणि नोंदण्या एकाच ठिकाणी मिळवण्यासाठी कसे उपयुक्त आहे, याची त्यांनी माहिती दिली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी एमसीसीआयए, पुणे येथील संतोष सावंत आणि प्रणय चोपडेकर यांनी विशेष प्रयत केले. समारोपप्रसंगी, उपस्थित मान्यवर आणि सहभागी उद्योजकांचे आभार प्रदर्शन करण्यात आले.

## पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारत मिळणार तरी केव्हा?



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**लाखनवाडा दि. २७:** लाखनवाडा येथे पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारतीची पडझळमुळे दयनीय अवस्था झालेली आहे.

लाखनवाडा येथे जिल्हा परिषद द्वारे पशु वैद्यकीय दवखाना श्रेणी अ असून लाखनवाडा परिसरातील सतरा ते अठरा खेडेगाव लागू आहे. यामध्ये संपूर्ण गावांमध्ये पशुधन मोठ्या संख्येने असून यांच्यावर उपचार करण्याकरिता लाखनवाडा येथे पशुधन वैद्यकीय दवाखान्यांमध्ये यावं लागते मात्र गेल्या दोन-तीन वर्षापासून या पशुधन वैद्यकीय दवाखान्याची दयनीय अवस्था झाली असून संपूर्ण स्लॅप वरचे प्लास्टर पडलेले आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी अवकाळी पावसामध्ये संपूर्ण इमारत गळत असून यामुळे या इमारत मध्ये असलेल्या औषधीचा साठा संपूर्ण या परिसरामधील पशुधनाला लागलेला औषधी साठा नाईलाज असतो बाहेरून विकत घ्यावा लागतो. या नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून ती इमारत संबंधितांच्या हस्तांतरित करावी अशी मागणी या परिसरातील जनता करीत आहे.

अजिंक्य भारत

आपलं बुलडाणा

२

बुलडाणा, शनिवार दि.२८ जून २०२५ www.ajinkyabharat.com

## थोडक्यात

### डॉ.शिंगणे यांनी मला संधी दिली तर पंचायत समिती निवडणूक लढणार



**शेंदुर्जन :** येथून जवळच असलेल्या निर्मळेश्वर पिंपळगाव लेंडी येथील डॉक्टर राजेंद्र शिंगणे साहेब यांचे खंदे समर्थक वैभव भैय्या टेके मुलाखत देताना म्हणाले , मला निवडणूक लढण्याची संधी मिळाली तर , निवडणूक लढून संधीच सोन करेल, वैभव टेके हे बुलढाणा जिल्हा सिंदखेडराजा तालुक्यातील किनगाव राजा सर्कल मधून जवळ असलेले निर्मळेश्वर पिंपळगाव लेंडी या गाव या गावातील डॉ. राजेंद्र शिंगणे साहेबांचे खंदे समर्थक वैभव भैय्या टेके हे साहेबांच्या सोबत खूप वर्षांपासून शरद चंद्र पवार साहेबांच्या पक्षात काम करत आहे .यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढण्याची इच्छा दर्शवली असून साहेबांनी मला ही जबाबदारी दिली तर मी पार पाडेल असं मत व्यक्त केलं आहे. त्यानी काही डॉक्टर राजेंद्र शिंगणे यांचे खंदे समर्थक असलेला युवा कार्यकर्ता वैभव भैय्या टेके याचे किनगाव राजा सर्कलमध्ये दांडगा संपर्क असून साहेबांचा विश्वास स्वार्थ ठरून अनेक लोकांच्या अडचणी प्रश्न सोडवण्याचा खूप प्रयत केला आहे शिवाय डॉक्टर शिंगणे यांच्यासाठी त्याांच्या विरोधी पक्षातील अनेक लोकांना शिंगावर घेतले आहे त्याामुळे यावेळेस पंचायत समितीसाठी का होईना वैभव भैय्या टेके यांना उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी, युवा कार्यकर्ता करत आहे

### शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाची २९ वी सभा उत्साहात

**बुलडाणा :**कृषी विज्ञान केंद्राच्यावतीने शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाची २९ वी सभा मौजे मुरादपूर येथील शेतकरी रामेश्वर इंगळे यांच्या शेतात मोठ्या उत्साहात पार पडली.सभेचे अध्यक्षस्थान विष्णूभाऊ गाडेकर यांनी भूषविले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे म्हणून कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. अमोल झापे, कृषी संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. दिनेश कानवडे, विशेषज्ञ डॉ. नरेंद्रकुमार देशमुख, डॉ. जगदीश वाडकर, शेतकरी-शास्त्रज्ञ मंचचे अध्यक्ष विजय भुतेकर, स्वप्नील महाजन उपस्थित होते. या वेळी डॉ. अमोल झापे यांनी शेतकरी-शास्त्राज्ञ मंचाची संकल्पना व उद्दिष्ट स्पष्ट करताना, कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा प्रसार शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यामागील उद्देश अधोरेखित केला. त्यांनी खरीप पिकासाठी उपयुक्त अशा कृषी निविष्ठांबाबतही माहिती दिली. सभेनंतर शेतकरी व शास्त्राज्ञ यांच्यात खरीप पिकांवरील कीड-रोग नियंत्रणाबाबत खुली चर्चा झाली. यानंतर सर्व मान्यवरांनी श्री. इंगळे यांच्या टोमॅटो लागवड प्रक्षेत्रास भेट देत प्रत्याक्ष निरीक्षण केले व इंगळे यांच्याकडून टोमॅटो लागवडीविषयी माहिती जाणून घेतली. शेतकरी-शास्त्राज्ञ मंचाचे सदस्य, ग्रामस्थ व पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

### भाजपाच्या वतीने आणीबाणीतील मिसाबंदींचा सत्कार



**संग्रामपूर :**माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात २५ जून १९७५ रोजी आणिबाणी लागू करण्यात आली होती. सुमारे २१ महिने आणिबाणी सुरू असताना सरकारच्या विरोधात आवाज उठविणाऱ्यांना तुरूंगात डांबले जात होते. त्याामुळे २५ जून हा दिवस भाजपाच्या वतीने काळा दिवस म्हणून पाळण्यात येत आहे. या निमित्ााने आज कृषी उत्पन्न बाजार समिती वरवट बकाल येथे आणिबाणीच्या काळात तुरूंगवास भोगलेल्या वानखेड येथील विठ्ठलराव मोटे यांचा कार्यक्रमाचे अध्यक्ष भाऊराव पाटील यांनी शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपा नेते पांडुरंगजी हागे यांनी केले. माजीतालुका अध्यक्ष लोकेश राठी, जिल्हा सरचिटणीस डॉ. गणेश दातीर यांनी आणिबाणी विषयावर मार्गदर्शन केले या प्रसंगी शेतकी खरेदी-विक्री संस्थेचे अध्यक्ष विश्वासराव पाटील, उपाध्यक्ष गणेशराव भुते, संचालक राजू बापू देशमुख, पांडुरंग उभे, निरंजन इंगळे, सुधीर लव्हाळे, विनोद मडोकार, संजय बोरसे, कृष्णा लासुरकर, संग्रामपूर शहराचे अध्यक्ष राहुल शिरसोले सह तालुक्यातील भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते.

# महसूल विभागाच्या सेवांसाठी आता सुलभ सेवा व्हॉट्सअॅप चॅटबॉट

## जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांची संकल्पना

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२७ :** महसूल विभागाच्या सेवा सामान्य नागरिकांच्या मोबाईलवर उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या संकल्पनेतून सुलभ सेवा या नावाने एक व्हॉट्सअॅप चॅटबॉट सुरू करण्यात आले आहे. हे चॅटबॉट राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या कृती कार्यक्रम ई-गव्हर्नन्सअंतर्गत विकसित करण्यात आले आहे.

याद्वारे जिल्ह्यातील नागरिकांना तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयातून मिळणाऱ्या विविध सेवांची माहिती तसेच त्याा सेवांसाठी अर्ज करण्याची सोय व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. सुलभ सेवा या चॅटबॉटमध्ये विविध प्रमाणपत्र उदा. उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचा दाखला, नॉन-क्रिमिलेयर दाखला, इत्यादी दाखले तसेच जिवंत सातबारा मोहीम आणि सलोखा' योजना यांसारख्या सेवांबद्दल सविस्तर माहिती दिलेली आहे, ज्यात आवश्यक कागदपत्रे आणि अर्ज प्रक्रिया यांचा समावेश आहे. त्यामुळे, नागरिकांना सरकारी कार्यालयात न जाता, घरबसल्या आवश्यक माहिती मिळवणे आणि संबंधित सेवांसाठी अर्ज करणे सोपे झाले आहे.

**सुलभ सेवा चॅटबॉटद्वारे मिळणारी माहिती:** महसूल विभागाअंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय आणि तहसील कार्यालय यांद्वारे मिळणाऱ्या विविध सेवांची सविस्तर माहिती मिळते.

**प्रत्योक सेवेसाठी लागणाऱ्या आवश्यक कागदपत्रांची यादी मिळते.** विशिष्ट सेवेसाठी कोणत्याा कार्यालयात उदा. जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसीलदार कार्यालय किंवा कोणत्याा संकेतस्थळावर अर्ज करावा, याची माहिती मिळते.

**सुलभ सेवा चॅटबॉटचा उद्देश:** या चॅटबॉटचा मुख्य उद्देश शासकीय कार्यालयांमध्ये येणाऱ्या नागरिकांचा वेळ वाचवणे, त्याांना योग्य आणि अचूक माहिती वेळेवर उपलब्ध करून देणे, तसेच प्रशासकीय कामकाज अधिक पारदर्शक आणि गतिमान करणे हा आहे. कोणतीही सेवा घेण्यापूर्वी नागरिकांना आवश्यक ती सर्व माहिती एका क्लिकवर, नागरिकांच्या मोबाईलवर उपलब्ध होईल, ज्यामुळे त्यांची गैरसोय टळेल.

**सुलभ सेवा चॅटबॉटचा वापर कसा कराल?**
हा चॅटबॉट वापरण्यास अत्यांत सोपा आहे. नागरिकांनी क्यूआर कोड स्कॅन करून किंवा +९१ ९४२३१ ८४८०४ हा व्हॉट्सअॅप क्रमांक सुलभ सेवा या नावाने सेव करून त्याावर असा संदेश पाठवून या सेवेचा लाभ घेता येणार आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या सुलभ सेवा व्हॉट्सअॅप चॅटबॉटचा अधिकाधिक वापर करून शासकीय सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

## वडनेर भोलजीसह परिसरातील पाणंद रस्त्यांची दुरवस्था



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**वडनेर भोलजी दि.२७:** वडनेर भोलजी ते काटी, आणि वडनेर भोलजी ते वाडी शिवाराकडे जाणाऱ्या पाणंद रस्त्याची स्वातंत्र्या पूर्वीपासूनच दुरवस्था झालेली आहे. या रस्त्याचे खडीकरण अथवा डांबरीकरण आतापर्यंत होणे गरजेचे होते. राजकीय उदासीनता अथवा प्रशासकीय अनास्थेमुळे या रस्त्याची समस्या आजही कायम आहे. पावसाळा सुरू झाल्यापासून तर किमान फेब्रुवारी, मार्च उजाडेपर्यंत या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखलाचे व पाण्याचे साम्राज्य असते. पेरणीच्या दिवसात शेतात खते, बियाणे घेऊन जाणेसुद्धा अवघड होते. तर हंगामात शेतकऱ्यांना शेतमाल घरीसुद्धा आणता येत नाही. सोयाबीनसारखे मुख्य पीकही काढणीनंतर शेतातच ठेवावे लागते. हा प्रकार प्रामुख्याने वडनेर भोलजी ते काटी शिवाराकडे जाणाऱ्या पाणंद रस्त्याावर उपरोक्त कालावधीत दरवर्षी घडतो.

पावसाळ्यात या पाणंद रस्त्यावर चिखल होत असल्याने शेतकऱ्यांची गुरे-ढोरे त्यामध्ये फसत असतात; मात्र तरीसुद्धा या रस्त्याची कामे करण्यासाठी प्रशासन धजावत नाही, हे फार दुर्दैवी आहे.

## पोलीसदल व विद्यार्थ्यांनी काढली नशा मुक्त भारत रॅली



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**दे.राजा दि.२७:** जागतिक अंमली पदार्थ दिनाच्या निमित्ताने नशा मुक्त भारत अभियान अंतर्गत देऊळगाव राजा शहरात सामूहिक शपथ व रॅलीच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवण्यात आले. पोलीस स्टेशन देऊळगाव राजा येथे उपविभागीय पोलीस अधिकारी मनिषा कदम यांच्या मार्गदर्शनाखाली २६ जून जागतिक अमली पदार्थ दिन नशा मुक्त भारत अभियानांतर्गत कार्यशाळेचे आयोजन ठाणेदार आशिष रोही यांनी केले होते. या अभियानासाठी शहरातील श्री व्यंकटेश कॉलेज व श्री छत्रपती शिवाजी हायस्कूलचे वर्ग नववीचे एनसीसीचे विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी झाले होते.

जागतिक अमली पदार्थ दिनानिमित्त उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम यांनी पोलीस स्टेशनला उपस्थित तीन पोलीस अधिकारी, पंधरा अंमलदार कर्मचारी शिक्षक वृंद व विद्यार्थी विद्यार्थिनींना नशा मुक्त भारत बाबत शपथ दिली. उपविभागीय पोलीस अधिकारी मनिषा कदम यांनी यावेळी म्हणाल्या की, जागतिक अंमली पदार्थ दिन आपण साजरा करत असताना अमली पदार्थांचे सेवन करण्यापासून अलिप्त राहण्याची गरज आहे तरुण पिढी हे देशाचे भविष्य असते. अंमली पदार्थांचे सेवन स्वतःच्या शरीरासाठी घातक आहेत त्यापेक्षा कितीतरी पटीने ते समाजासाठी व देशासाठी घातक असल्याचे मनीषा कदम यांनी सांगितले.

कार्यशाळेकरिता सहभागी नववीचे एनसीसीचे विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी नशा मुक्ती अभियानाबाबत मार्गदर्शन केले. कार्यशाळा पार पडल्यानंतर विद्यार्थी व विद्यार्थिनींची शहराच्या प्रमुख मार्गावरून जनजागृती रॅली काढण्यात आली.

## पुनर्वसित गावठाणातील निकृष्ट पोच रस्ता कामाची चौकशी करा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**नांदुरा दि.२७ :** नांदुरा तालुक्यातील मौजे टाकळी वतपाळ येथील पुनर्वसित गावठाणातील पोच रस्ता डांबरीकरण कामाची गुणवत्ता नियंत्रण यंत्रणेकडून सखोल चौकशी करून संबंधितांवर रीतसर कारवाई करावी अशा आशयाचे निवेदन कार्यकारी अभियंता जिगाव धरण व पुनर्वसन विभाग शेगाव यांना दिनांक २० जून रोजी माजी सरपंच,राम पांडव,आकाश वतपाळ, उपसरपंच सदानंद तायडे व प्रज्ञावंत तायडे,बसपा नेते प्रमोद तायडे यांच्या नेतृत्वा दिले आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद आहे की,टाकळी वतपाळचे पुनर्वसन मौजे मोमीनाबाद शिवारात होत असून या ठिकाणी गावातील मुख्य पोच रस्ता डांबरीकरण करण्यात आला आहे परंतु सदर रस्ता हा अत्यंत निकृष्ट दर्जाचा बनवला असून रस्ता बनवून एक महिना सुध्दा झाला नाही तर हा रस्ता जागोजागी उखडला असून बऱ्याच ठिकाणी दबला आहे. त्यामुळे रस्ता बेड तयार करत असताना गिट्टी, मुरुम टाकण्यासाठी वारंवार सरपंच, उपसरपंच,सदस्य तथा गावकरी यांनी संबंधित ठेकेदार, संबंधित यंत्रणेला सांगितले तसेच अॅड संतोष तायडे व सदानंद तायडे यांनी लेखी तक्रार सुद्धा दिली परंतु कुणाचेही ऐकून न घेता ठेकेद्राराने मनमानी पद्धतीने रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे केले. त्याचा परिणाम केवळ एका महिन्यातच रस्ता पूर्णतः खराब झाला आहे. या रस्त्यावर चालणे, वाहन चालविणे मुश्किल झाले आहे. सदर रस्ता हा रात्रीच्या वेळेस ठेकेदाराने घाईघाईने करून रस्ता कामाचे वाटोळे केले आहे. यामुळे गावकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. तरी सदर रस्ता डांबरीकरण कामाची गुणवत्ता नियंत्रण यंत्रणेकडून सखोल चौकशी करून संबंधितांवर कंत्राटदारावर रीतसर कारवाई करून त्यांना कोणतेही बिल अदा करू नये व रस्ता पुन्हा अंदाजपत्रकानुसार तयार करावा अन्यथा लोकशाही मागीने आंदोलन करावे लागेल यापासून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी संबंधित प्रशासन जबाबदार राहील असा इशारा सुद्धा देण्यात आला आहे. निवेदन देतेवेळी,अनिल गोरे, महेंद्र वतपाळ,विजयानंद तायडे, गजानन वसतकार, गणेश बगे, गोपाल पांडव, विशाल वतपाळ, उमेश वावरे, मोहन वसतकार, दिनेश तायडे,गणेश वसतकार, अमोल तायडे आदी बरेच गावकरी उपस्थित होते.

## पारधी आदिवासी आश्रम शाळेवर प्रवेश उत्सव साजरा



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**साखरखेर्डा दि.२७ :** येथून जवळच असलेल्या ''क्रांतीवीर समशेरसिंग पारधी'' आदीवासी आश्रम शाळा, वरदडा येथील विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. श्रीकृष्ण कृपा बहुउद्देशीय फासेपारधी समाज विकास संस्था वरदडा वतीने तेथे पारधी समाजातील आदीवासी विद्यार्थ्यांसाठी पारधी समाजातील सामाजिक कार्यकर्ते युवराज पवार यांनी क्रांतीवीर समशेरसिंग पारधी आदीवासी आश्रम शाळा सुरू केली. भूकमरीने असहाय बनून गावोगावी भिक मागणारी, उपजिवीकेची कोणतेही साधन नसल्याने शिक्षणापासून वंचित राहावे लागत असणाऱ्या फासे पारधी समाजातील सुमारे ८० मुले व ३१ अनाथ मुले-मुली या शाळेत दाखल करण्यात आले असून त्यांचा सर्वस्वी सांभाळ करून शिक्षणाच्या प्रवाहात आणले आहे. या शाळेत वर्ग १ ते ४ पर्यंत फासे पारधी समाजातील एकूण १६० मुले - मुली शिक्षण घेत आहेत. या आदीवासी आश्रम शाळेला शासनाचे कोणतेही अनुदान मिळत नसून शाळेचा सर्व खर्च ते स्वतः व दानशूर व्यक्तींच्या देणगीतून भागविता आहेत.

काल दि.२५ रोजी समशेर सिंग पारधी आदीवासी आश्रम शाळेतील मुलांच्या प्रवेशोत्सव उत्साहात साजरा झाला. यावेळी कैलाशजी कंडी ( मुंबई), कन्हैयाजी फराटे(मुंबई), आशिष कावळे,आदीवासी पारधी विकास परिषदेचे महामंत्री प्रविण पवार ( यवतमाळ) , अमरावती जिल्ह्यातील मंगरूळ येथील प्रश्नचिन्ह या आदीवासी फासेपारधी सुधार समिती चे मतीन भोसले , युवराज पवार, , माजी प्राचार्य डी.एन.पंचाळ , संतोष गाडेकर , आदी मान्यवरांनी उपस्थिती होती. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे फुले देऊन स्वागत केले.

यावेळी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकारच्या प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

## मातोश्री महिला अर्बनच्या वतीने 'एक पेड माँ के नाम'कार्यक्रम

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बीबी दि.२७ :** बीबी येथील मातोश्री महिला अर्बन यांनी एक पेड मा के नाम हा उपक्रम राबवून १०१ वृक्षांची लागवड केली .

या उपक्रमांतर्गत आपल्या परिसरातील पर्यावरण समतोल राखण्यासाठी हरितक्रांतीचा संदेश देण्यासाठी आणि भावी पिढ्यांसाठी हिरवळ निर्माण करण्यासाठी मातोश्री अर्बन या संस्थेच्या वतीने वृक्ष लागवड करण्यात आली.

यावेळी विविध जातीची झाडे लावण्यात आली . त्या प्रसंगी संस्थेचे सभासद शरद बोडखे त्याांच्या हस्ते मातोश्री वृद्धाश्रम पिंपरी खंदारे येथे वृद्धांना सावली मिळावी मन प्रसन्न राहण्यासाठी विविध मान्यवरांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. सौ दिपाली गायकी तसेच संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक व मातोश्री फाउंडेशन चे अध्यक्ष डॉ. दगडूबा गायकी तसेच संस्थेचे सर्व कर्मचारी वृद ग्रामस्थ उपस्थित होते.

## घरगुती वादातून मुलाने केली पित्याची हत्या

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मलकापूर दि.२७ :** येथील बुलढाणा रोडवरील मुक्ताईनगर भागात ४८ वर्षीय सेवानिवृत्ती माजी सैनिकांची हत्या झाल्याचा धक्कादायक प्रकार २६ जूनच्या सायंकाळी उघडकीस आली आहे. त्याामुळे एकच खडबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर असे की, बुलढाणा रस्त्यावरील वाकोडी ग्रामपंचायत कार्यालय परिसरातील मुक्ताईनगरात घरगुती वादातून माय लेकांनी ही हत्या केल्याची घटनास्थळी चर्चा होती. मृतक तुळशीराम मोहन पठ्ठे (वय ४८) हे पती जया पठ्ठे (वय ४५) यांच्यासोबत खावटीच्या वादावरून वाद घालत होते. वाद विकोपाला जाताच दोघांमध्ये हातपाई झाली. त्यांचा मुलगा निलेश (वय २०) हे दृश्य पाहून मधे पडून वडिलांना थांबवण्याचा प्रयत्न करत होता. पण वडिलांचा संताप काही कमी होईना अखेर मुलाने नियंत्रण गमावले. क्षणात सर्व काही बदलून गेल लोखंडी सळई उचलून त्याने आपल्या वडिलांवर वार केला. रक्ताच्या थारोळ्यात तुळशीराम यांचा जागीच मृत्यू झाला तर घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून, फिर्यादी सूरज गजानन चौधरी यांच्या तक्रारीवरून जया पठ्ठे व निलेश पठ्ठे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बँकेत झालेल्या अपहार प्रकरणी अद्यापही काहीच निष्पन्न का नाही ?

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**नांदुरा दि.२७ :** दि नांदुरा अर्बन को-ऑप बँक लि. नांदुरा मुख्यालयात पाच कोटी ७१ लाख ६५ हजार रुपयांचा अपहार होऊन पंधरा महिने झाले ,परंतु अद्याप काहीच निष्पन्न का झाले नाही ? असा प्रश्न बँकेचे अ वर्ग सभासद दाऊदयाल जानकीदास मुंदडा यांनी अध्यक्ष व संचालक मंडळ यांना दिनांक २० जून २०२५ रोजी दिलेल्या लेखी पत्राद्वारे उपस्थित केला आहे. या पत्रात सोबत त्यांनी सु .देशपांडे जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग १ सहकारी संस्था अकोला यांच्या चाचणी लेखापरीक्षण अहवालातील पान नंबर १८,२१,२२,२३ टीपणी सोबत जोडली आहे.

यामध्ये लेखा विभागाने एचडीएफसी बँक खात्याच्या ताळमेळ पत्रकातील प्रलंबित नोंदी प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असतानाही त्याचा तपशीलवार दिनांक व नोंदी सह उतारा मागविला नाही. केवळ प्रतिक गजानन शर्मा यांनी दिलेल्या मौखिक खुलासावर लेखा विभाग अवलंबून राहिला. लेखा विभागाचे मुख्य लेखापाल यांनी दिनांक २० मार्च रोजी प्रतीक शर्मा यांना एचडीएफसी बँक खाते जोडणी बाबत पत्र दिले. याबाबत ची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिनांक २१ मार्च २०२४ ला देण्यात आली. परंतु संगणक विभाग प्रमुखांना देण्यात आली नाही. या पत्रानुसार दि. २६ मार्च २०२४ पूर्वी एचडीएफसी बँक च्या खात्याची जोडणी करून तसा अहवाल मागविण्यात आला होता.परंतु प्रतिक शर्मा यांनी खात्याची जुळवणी करून तर दिलीच नाही. परंतु अफरातफरीची रक्कम पुनश्च एचडीएफसी बँक खात्याच्या जनरल लेजरला नावे टाकून अफरातफरीमध्ये समविष्ट खात्यात जमा करण्यात आली. यामध्ये प्रतीक शर्मा याने दिनांक २३ मार्च २०२४ ला सत्ताविस लाख रुपयांच्या सहा ट्रांजेक्शन केल्या असून दि. २४ मार्च २०२४ ला चार लाख विस हजार रुपयांची एन्ट्री आय एम पी एस द्वारे करण्यात आली आहे. प्रत्यक्षात २३ व २४ मार्च २०२४ बँकेचे सुट्टीचे दिवस आहेत.

प्रत्यक्षात चाचणी लेखा परीक्षकाच्या असे निदर्शनास आले की डिस्प्युटेड पेंडिंग एन्ट्री मध्ये साधारणतः सतरा महिन्यांपासून च्या नोंदी प्रलंबित आहे. या नोंदीचा तपशील रक्कम निहाय, दिनांक निहाय मागविणे लेखा विभागाचे कर्तव्य होते. त्यांनी तसा तपशील कधीही मागवल्याचे दिसून येत नाही. केवळ तांत्रिक माहिती नसल्याचे दिलेले कारण समर्पक नाही. आवश्यक ती तांत्रिक अर्हता धारण करणारे इतर अधिकारी बँकेत उपलब्ध असतांना त्यांनी वेळीच प्रतिमाह तपशील त्याच्या मार्फत प्राप्त करून घेणे आवश्यक होते. त्यांनी त्यांचे कर्तव्यात कसूर केल्याचा मत लेखापरीक्षक यांनी दिले आहे. या चाचणी अहवालामध्ये वरिष्ठ व्यवस्थापन या सर्व घटना क्रमास जबाबदार आहे. त्यामुळे संचालक मंडळाने वरीष्ठ व्यवस्थापन ची व्याख्या काय आहे हे सहकार खात्याचे वरिष्ठ वकिलांकडून समजून घ्यावे अन्यथा आपणास भविष्यात त्रास होईल. या लेखापरीक्षण अहवालानुसार हायकोर्ट नागपूर येथे लवकरच पिटिशन दाखल होणार असल्याचे मतही त्यांनी या पत्रात व्यक्त केले आहे. बहुतांश संचालकांना चाचणी लेखापरीक्षण अहवालाबाबत काहीच माहिती नाही यामध्ये बँकेचे जेष्ठ संचालक व माजी उपाध्यक्ष जगनभाऊ डांगे व विद्यमान उपाध्यक्ष दत्ताजी सुपे यांचा यात समावेश आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार अहवाल ऑडिट कमिटीसमोर ठेवला होता. परंतु प्रत्यक्षात ऑडिट कमिटीचे सदस्य सुभाष हरकुट यांनी मुख्यकार्यकारी अधिकारी यांचे म्हणणे फेटाळून लावले.

यावरून हे स्पष्ट होते की, बँकेचे प्रशासन अधिकारी संचालक मंडळापासून काहीतरी लपवीत आहे. अपहार झाला त्यावेळीही फॉरेन्सिक ऑडिट अहवाल संचालकांना दोन महिने पर्यंत दाखविण्यात आला नाही. त्यामुळे आपणा सर्वांवर पुढे मोठे संकट येण्यापूर्वीच आपण सावधान होणे गरजेचे आहे. त्याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना संचालक मंडळाच्या वतीने ठराव घेऊन सदर अपहार प्रकरणाची गृह खात्यामार्फत सीबीआय चौकशी मागणी करण्याबाबत विनंती करण्यात यावी असेही त्यांनी या पत्रात नमूद केले आहे.

अजिंक्य भारत
# आपलं वाशिम
शनिवार, दि. २८ जून २०२५



## थोडक्यात

### दीड महिन्यांपासून वीज खांब शेतातच!

**आसोला खुर्द :** चाकूर व आसोला खुर्द शेतशिवारात मे महिन्यात आलेल्या वादळ-वाऱ्यामुळे वीज खांब जमिनदोस्त झाले. या घटनेला दीड महिना उलटून गेला तरीही महावितरणकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. मे महिन्यात चाकूर व आसोला खुर्द शिवारात मान्सूनपूर्व पाउस व वादळीवाऱ्याने थैमान घातले होते. शेतामध्ये काही वीजखांब जमिनदोस्त झाले. या भागातील शेतकऱ्यांनी महावितरणकडे वारंवार तोंडी व लेखी तक्रारी करून वीज खांब पुनः स्थापित करण्याची मागणी केली.

### काँक्रिट रस्त्याचे बांधकाम पूर्ण; पण नालीचे काय?

**मानोरा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी ५ ऑक्टोबर २०२४ रोजी श्रीक्षेत्र पोहरादेवी येथे विरासत ए बंजारा नंगारा वास्तुसंग्रहालयाच्या लोकार्पणासाठी आले होते. यानिमित्ताने बसस्थानक परिसरापर्यंत मंदिर ९ महिन्यांपूर्वी काँक्रीट रस्त्याचे बांधकाम पूर्ण करण्यात आले, मात्र, या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना नालीचे काम आजही अपूर्ण आहे. या नाल्यांअभावी पावसाचे पाणी थेट रस्त्यालगतच्या घरांसमोर साचत आहे. परिणामी, नागरिकांना ये-जा करताना चिखलाचा सामना करावा लागत आहे.

### तीन दिवसांपासून इसम बेपत्ता


**मंगरूळपीर :** ''कपड्याच्या दुकानाची वसुली करून येतो,'' असे सांगून शेलूबाजार येथे गेलेला मंगरूळपीर शहरातील एक ५३ वर्षीय व्यक्ती तीन दिवसांपासून बेपत्ता आहे. याप्रकरणी त्यांच्या भावाने २६ जून रोजी मंगरूळपीर पोलिस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार किशोर रामनारायण बाहेती (वय ५६, रा. मंगरूळपीर) यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीत असे नमूद केले आहे की, फिर्यादीचा भाऊ विजय रामनारायण बाहेती (५३, रा. राजस्थानी चौक, मंगरूळपीर) हे २४ जून रोजी सायंकाळी त्यांच्या (एमएच ३७ एक्स ४६६२) क्रमांकाच्या दुचाकीने शेलूबाजार येथील कपड्याच्या दुकानाची वसुली करून येतो, असे सांगून घरून निघून गेला.

### शक्तीपीठ महामार्गात पोहरादेवीचा समावेश करावा




**मानोरा :** वर्धा ते गोवा शक्तीपीठ महामार्गात बंजारा काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री क्षेत्र पोहरादेवीचा समावेश करावा, अशी मागणी बंजारा समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. महाराष्ट्र सरकारने सध्या ज्या शक्तीपीठ महामार्गाला मान्यता दिली आहे, त्यात अनेक धार्मिक स्थळांचा समावेश करण्यात आला आहे; मात्र संत सेवालाल महाराजांची कर्मभूमी आणि बंजारा समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या पोहरादेवीला डावलले गेले असल्याने समाजात तीव्र नाराजी पसरली आहे, असे निवेदनात नमूद केले. वर्धा-नांदेड रेल्वेमार्गाच्या वेळीही पोहरादेवी नाव जाहीर करून प्रत्यक्ष स्टेशन सावळी येथे देण्यात आले होते. आता त्याचप्रमाणे शक्तीपीठ महामार्गातही पोहरादेवीला वगळले आहे, ही बाब योग्य नसल्याचे निवेदनात नमूद केले.

### राजश्री शाहू महाराज जयंती साजरी



**मंगरुळपीर :** येथील स्थानिक यशवंतराव चव्हाण इंग्लिश हायस्कूल येथे राजश्री शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साह साजरी करण्यात आली. शिक्षिका शितल जाधव यांनी शाहू महाराजांवर आपले विचार प्रगट केले. त्यानंतर निलेश सुर्वे व संतोष चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना आजच्या तरुण पिढीसाठी छत्रपती शाहू महाराज यांचे योगदान कसे उपयुक्त ठरेल यावर विचार मांडले. आभार प्रदर्शन शर्मा यांनी केले.

# शेतकऱ्यांना महाबीज देणार 'अनुदानाचे सोने'

## ८१४ बिजोत्पादकांच्या खात्यात पावणे तीन लाखाचे अनुदान

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २७ :** राष्ट्रीय अन्न सुरक्षा गळीत धान्य व कडधान्य योजनेंतर्गत खरीप व रब्बी २०२३-२४ हंगामातील उत्पादित बियाण्यास महाबीजमार्फत ऐन पेरणी हंगामात बीजोत्पादकांना अनुदान म्हणून पावणे तीन लाख रुपये खात्यात जमा करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा गळीत धान्य योजनेंतर्गत सोयाबीन, जवस व मोहरी या पिकास तर राष्ट्रीय अन्न सुरक्षा कडधान्य योजनेंतर्गत उडीद व हरबरा इत्यादी पिकांच्या नवीन वाण अनुदानास पात्र आहेत.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा गळीत धान्य योजनेंतर्गत सोयाबीन पिकास रु. ६६१ प्रती क्विंटल व मोहरी आणि जवस पिकास रु. १०५१ प्रती क्विंटल तसेच राष्ट्रीय अन्न सुरक्षा कडधान्य योजनेंतर्गत उडीद पिकास रु. ३७०० प्रती क्विंटल व हरबरा पिकास रु. २५५४ प्रती क्विंटल अशी एकूण रक्कम रुपये २२८.७९ लक्ष रुपये महाबीजकडून बिजोत्पादकांना अनुदानाची रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे.

खरीप व रब्बी २०२३-२४ हंगामास ज्या बिजोत्पादकांचा नवीन वाणाचा बिजोत्पादन कार्यक्रम बीज प्रमाणीकरण यंत्रणेच्या अंतिम अहवालात पात्र ठरलेला आहे. अश्या बिजोत्पादकांना या योजनेचा लाभ मिळालेला आहे. यामुळे नवीन वाणाच्या बियाणे उत्पादनास जिल्ह्यामध्ये प्रोत्साहन मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

वाशिम जिल्ह्यातील बियाणे उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे, शाश्वत उत्पादनात वाढ करणे, जिल्ह्यातील बीजोत्पादक शेतकऱ्याने नवीन वाणाचे उत्पादित केलेल्या बियाण्याचा वापर जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी करून आपली उत्पादकता व उत्पादन वाढवावे, असे महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक एस. एस. सावरकर यांनी कळविले आहे.

### महाबीजचा खरीप हंगामासाठी सुसज्ज आराखडा!

महाबीजने आगामी खरीप हंगामासाठी अडीच लाख क्विंटल प्रमाणित बियाण्यांचा पुरवठा करण्याची घोषणा केली आहे. हे बियाणे सारथी पोर्टलच्या क्यूआर कोडसह बाजारात उपलब्ध होणार असून, शेतकऱ्यांना त्यामार्फत बियाण्याचे स्त्रोत, प्रक्रिया व गुणवत्ता यांची सविस्तर माहिती मिळणार आहे. हे बियाणे महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करून अनुदानित दरात मिळणार असून, या योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना लवकरात लवकर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या हंगामात ७१,००० क्विंटल बियाणे नव्या संशोधित वाणांचे असून, तूर, मूग, उडीद, धान, बाजरी, नाचणी व सोयाबीन या पिकांचे बियाणे आकर्षक अनुदान दरात मिळणार आहे. काही वाणांसाठी १००% अनुदानही उपलब्ध आहे. महाबीजने विक्रेत्यांसोबत बैठका घेऊन संपूर्ण राज्यात बियाणे वितरणाची तयारी केली आहे. शेतकऱ्यांसाठी गावपातळीवर कार्यशाळाही आयोजित केल्या जात आहेत. शिवाय, ''महाबीज वार्ता'' या यूट्यूब चॅनेलद्वारे शेतकऱ्यांना नव्या वाणांची माहिती, सल्ले व अनुभव सहज उपलब्ध होत आहेत. ५० व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या महाबीजचा हा विश्वासार्ह आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित उपक्रम शेतकऱ्यांसाठी मोठा वरदान ठरणार आहे.

## जिल्हा परिषदेच्या शाळेत दुर्घटना: स्लॅबचा भाग कोसळला

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २७ :** तालुक्यातील भट उमरा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील स्लॅब चा काही भाग अचानक कोसळला. या घटनेत एका विद्यार्थ्याला किरकोळ दुखापत झाल्याची माहिती समोर आली आहे.

भट उमरा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत नेहमी प्रमाणे तासिका सुरू असताना स्लॅबचे प्लास्टर कोसळले आणि यात बाकावर बसलेला विद्यार्थी गंभीर जखमी झाला आहे. भटउमरा गावात असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत ही दुर्घटना घडली.भटउमरा गावातील जिल्हा परिषद शाळेतील वर्गात तास सुरू होता अचानक एका कोपऱ्यातील स्लॅबचा भाग कोसळला. तेथे बसलेल्या विद्यार्थ्यावर त्या भागाचे तुकडे पडले ज्यात तेथे बाकावर बसलेला विद्यार्थी गंभीर जखमी झाला. त्या विद्यार्थ्याच्या डोक्याला मार लागला. उपचारासाठी त्याला तात्काळ जवळच्या दवाखान्यात नेण्यात आले. शिवाजी उमाळे विद्यार्थ्याचे नाव असून तो सातवी इयत्तेत शिकत आहे. या घटनेने शाळेतील विद्यार्थी भयभीत झाले आहेत. तसेच पालकांनाही आपल्या मुलाबद्दलची चिंता वाढली आहे. शाळेची इमारत दहा वर्षापूर्वीच बांधण्यात आली होती.

या दुर्घटनेनंतरचा व्हिडिओ सोशल मीडियावर समोर येत आहे. त्यात दिसून येते की स्लॅबच्या प्लास्टरचा मोठा भाग खाली कोसळला आहे. वर्गात मोठ्या प्रमाणात सिमेंटचे तुकडे पडल्याचे दिसत आहेत.

## रेती चोरीप्रकरणी टिप्पर चालकाच्या विरोधात गुन्हा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**रिसोड, दि. २७ :** टिप्पर मधील रेतीच्या परवान्याबाबत मंडळ अधिकाऱ्याकडून विचारपूस करत असताना चालकाने उडवा-उडुची उत्तर देत दिशाभूल करून टिप्परसह रेती घेऊन पळून गेल्या प्रकरणी रिसोड पोलीस स्टेशनमध्ये टिप्पर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. देवानंद भास्कर मोरे राहणार जामदया तालुका सेनगाव जिल्हा हिंगोली असे आरोपीचे नाव आहे.

याबाबत सदाशिव महादेव पडवे, मंडळ अधिकारी रिठद तहसील कार्यालय रिसोड यांनी रिसोड पोलीस स्टेशनला दिनांक २६ जून रोजी दिलेल्या फिर्याद दिली. त्यांनी म्हटले आहे की दिनांक २५ जून रोजी संध्याकाळी साडेसहा ते रात्री आठ वाजताच्या दरम्यान त्यांनी रिसोड लोणी मार्गावर गिरीराज धाब्याजवळ रेती घेऊन येत असलेल्या टिप्पर ला थांबून चालक देवानंद भास्कर मोरे यास सदर रेती गौण खनिज बद्दल परवाना बद्दल विचारणा केली. यादरम्यान टिप्पर चालकाणे उडवा उडवीचे उत्तरे देऊन त्याच्या ताब्यातील टिप्पर व रेतीसह अवैधरित्या रीतीची चोरी करून पळून गेला. चोरी केलेल्या रेती सह टिप्पर ची किंमत ५ लाख १८ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी रिसोड पोलीसांनी गौण खनिज अधिनियम नुसार गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## मोर्णा नदीवरील पुलाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २७ :** मालेगाव तालुक्यातील गोकसावंगी गावाजवळील मोरणा नदीवर असलेल्या जुन्या पुलाची अवस्था दिवसेंदिवस अधिकच धोकादायक होत चालली आहे. पुलावर मोठ्या प्रमाणावर खच पडले असून, रस्त्याच्या दुतर्फा मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे या मार्गावरून वाहतूक करणाऱ्या ग्रामस्थांना तसेच गुरेढोरे व दुचाकी वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

या पुलावरून दररोज शाळकरी विद्यार्थी, शेतकरी, महिलावर्ग व गावातील सर्वसामान्य नागरिक ये-जा करतात. मात्र, पूल पूर्णतः जीर्ण झाल्यामुळे कधीही मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पावसाळ्याच्या काळात तर या पुलाची अवस्था आणखीनच बिकट होते, कारण नदीला पूर आला की पुलावरून पाणी वाहू लागते आणि वाहतुकीचा पूर्ण ठप्प होतो. ग्रामस्थांनी गेल्या चार वर्षांपासून संबंधित विभाग व स्थानिक प्रशासनाकडे पुलाच्या दुरुस्तीची मागणी सातत्याने केली आहे. लेखी अर्ज, ग्रामपंचायतीचे ठराव, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या माध्यमातूनही याबाबत सूचना देण्यात आल्या. मात्र, अद्याप कोणतीही दुरुस्ती किंवा नवीन पुलाच्या कामाला सुरुवात करण्यात आलेली नाही.

गावकऱ्यांनी यावर नाराजी व्यक्त करत म्हटले की, ''प्रशासनाकडून केवळ आश्वासन दिले जाते, प्रत्यक्षात काहीही कार्यवाही होत नाही. एखादी दुर्घटना झाल्यावरच प्रशासन जागे होणार का? या पूलामुळे संपूर्ण परिसरातील वाहतुकीला अडथळा निर्माण झाला असून, बाजार, शाळा, आरोग्यसेवा यासाठी अन्य मार्गाने जाणे शक्य नसल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण आहे. लवकरात लवकर या पुलाची दुरुस्ती किंवा नवीन पुलाच्या कामाची सुरुवात न झाल्यास जनआंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.प्रशासन काय करते याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## दारू, जुगार बंदीसाठी महिलांची पोलीस अधीक्षक कार्यालयावर धडक!


दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मानोरा, दि. २७ :** तालुक्यातील गिरोली सर्कलमधील भिलडोंगर गावातील समस्त महिला भगिनीनी गावातील अवैध दारूविक्री आणि बेकायदा वरली मटका जुगाराला आळा घालून नवीन पिढीला वाचवण्याचे मोठे पुण्याच काम दारू बंदी अन्न शुल्क विभाग व पोलीस प्रशासनाने करावे, असे निवेदन दि. २५ जून रोजी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना महिलांनी दिले आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, मौजे भिलडोंगर येथे देशी व विदेशी दारू खुलेआम राजरोसपणे सुरू असुन गावाला लागून असलेल्या गीराट येथे हातभट्टीची दारू सहजरित्या मिळत आहे. मद्यपी नशेमध्ये अर्वाच्या भाषेत मुलीची छेड काढतात. त्यामुळे शाळकरी मुले, मुली रस्त्यावरून जाण्यासाठी धजावतात. दारू सेवन केल्यावर गावातील गुंड सामान्य नागरिकांना मारण्याची कापण्याची धमकी देतात, याबाबत वारंवार पोलिसांना कळवून सुद्धा करवाही होत नाही, आतापर्यंत दारूमुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले असून गावातील तीन लोकांना दारुपायी जीव गमावण्याची पाळी आलेली आहे. या परिसरात जुगार पण मोठया प्रमाणात सुरू आहे. अवैध दारू व जुगार बंदीसाठी तत्काळ कारवाई करावी, असे निवेदन महिला बचत गटाच्या महिलांनी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना दिले आहे. निवेदन देतेवेळी अनुसया पवार, माला पवार, सीमा राठोड, बेबी सस्ते, गुंफा पवार, मीरा पवार, गेना पवार, सरपंच चिंतामण खुळे, प्रवीण पवार ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील पवार, विनोद राठोड इत्यादी सर्व सामान्य नागरिकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

## काजळेश्वर परिसरातील पऱ्हाटीचे पीक वाणीने केले फस्त




दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा लाड, दि. २७ :** कारंजा तालुक्यातील काजळेश्वर परीसरातील प-हाटीचे पीक जमीनीतून निघालेल्या पिकाला वाणी नावाच्या प्रजातीने खाण्याचा सपाटा लावला आहे. पीक फस्त केल्याचे लक्षात येताच अनेक शेतकऱ्यांनी दुबार पेरणी साठी धावपळ चालू केली आहे.

वृत्त असे की सोयाबीनला बाजारभाव आधारभूत किंमती एकढा मिळत नसल्याने काजळेश्वर; पानगव्हान; उकर्डा; जानोरी; पलाना; विराहीत; पारवा खांदला; उजळेश्वर शेतशिवारातील शेतक-यांनी कपाशी पीकाची लागवड मोठ्या प्रमाणात केली . पेरणीवर वरचेवर पाऊस आल्याने पीके अंकुरली होती. मात्र वाणी नावाच्या प्रजातीने कोवळे पीक खाण्याचा सपाटा लावला. अनेक शेतकऱ्यांचे कपाशी पीक दोन दिवसात नेस्तनाबूत केले. शेतातील पीकाची पाहणी केली असता प्रत्येक कपाशी कोवळ्या रोपावर वाणी नावाच्या प्रजातीने पीके फस्त करण्याचा सपाटा लावला .शेकडो एकर कपाशी पीक असलेली शेती वाणीने कोवळी रोपे खाऊन नष्ट केले. त्यामुळे शेतकऱ्यावर हे नवे संकट उभे ठाकले.

> मी पाच एकर कपाशी पीकाची लागवड केली होती पेरणीही साधली मात्र वाणी जातीच्या प्रजातीने माझे संपूर्ण पिक खाऊन फस्त केले. दुबार पेरणी साठी कपाशी बीयाणे शोध सुरु आहे. अन्यथा त्या संपूर्ण क्षेत्रात सोयाबीन पेरावे लागेल.
>
> **- नामदेव तिडके,** शेतकरी काजळेश्वर

### नदीच्या महापुरामुळे शेकडो हेक्टर शेतीचे नुकसान



**रिसोड :** वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात सतत दोन दिवस अति मुसळधार पाऊस पडल्याने कांच,उतावळी तसेच पैन गंगा नदीला महापूर आला.या पुराच्या पाण्या मुळे नदी काठची शेकडो हेक्टर शेत जमीन पेरलेल्या पिकांसह खरडून गेली आहे. रिसोड तालुक्यात सात मंडळा मध्ये मुसळधार पाऊस पडला त्यामुळे नदिकाठच्या शेतक-यांची पेरलेलं सोयाबीन,हळद पिकांचे मोठे नुकसान झालेले आहे या मध्ये शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून या शेत नुकसानीचे पंचनामे करून आर्थिक आधार देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

> रिसोड तालुक्यात जवळपास सात मंडळामध्ये मुसळधार पाऊस पडला आहे त्यामध्ये नदीकाठचा परिसर पुर्णपणे बाधीत झाला आहे. या नुकसानीची पाहणी करुन प्राथमिक अहवाल आल्यानंतर पंचनाम्याचे आदेश देवु.
>
> **- प्रतीक्षा तेजनकर,** तहसीलदार रिसोड

## रेशन धान्याच्या संशयित साठ्यावर छापा; ७ लाखांचा मुद्देमाल जप्त

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २७ :** वाशिम जिल्ह्यात असलेल्या कारंजा तालुक्यातील दोनद बुद्रूक आणि सोहळ येथील टिनपत्र्याच्या गोदामांमध्ये रेशन धान्याची अवैध साठवणूक केल्याची माहिती मिळाल्यानंतर पुरवठा विभागाने २५ जून रोजी या ठिकाणी पोलिस बंदोबस्तात छापेमारी केली. या कारवाईत सुमारे ६५० धान्याचे कट्टे जप्त करण्यात आले असून, त्याचे एकूण बाजारमूल्य ७ लाखांपेक्षा अधिक असल्याचे सांगण्यात आले.

गुप्त माहितीच्या आधारे कारंजा तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागाने केलेल्या कारवाईत दोनद बुद्रूक येथील गोदामातून ३००, तर सोहळ येथून ३५० कट्टे गहू आणि तांदूळ, कट्टे धान्य आढळून आले. या धान्याचे सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत वितरण अपेक्षित होते. मात्र ते गोदामात अवैधरीत्या साठवले जात होते. छापेमारीदरम्यान वजन

### विविध ठिकाणची दोन गोदामे सीलबंद

काटे, हमाली हुक, पावती पुस्तके आदी साहित्यही जप्त करण्यात आले असून, दोन्ही गोदामे सील करण्यात आली आहेत. निरीक्षण अधिकारी स्मिता नायगावकर, मंडळ अधिकारी महेश धानोरकर, सुनील खाडे, ग्राम महसूल अधिकारी डी. व्ही. ताथोड, पोलिस पाटील शारदा ढवक, तसेच पोलिस अधिकारी भगवंत ठाकरे यांनी ही कारवाई केली.

शेतमालक व गोदाम भाडेकरूविरुद्ध तक्रार दोनद बुद्रुक येथील शेत प्रविण पोले यांच्या मालकीचे असून त्यांनी गोदाम शारदा सावंत (मंगरूळपीर) यांना भाड्याने दिले होते. सोहळ येथील गोदाम मनोज इंगळे यांच्या शेतात असून ते विनोद जाधव यांच्याकडे भाडेतत्त्वावर होते. संबंधित शेतमालक व गोदाम भाडेकरूंविरोधात कारंजा ग्रामीण व धनज बुद्रुक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

अजिंक्य भारत

# आपला जिल्हा

अकोला । शनिवार, दि. २८ जून २०२५




## थोडक्यात

### ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांची आत्महत्याग्रस्त कुटुंबीयास भेट



**अकोट**: कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष तथा राज्यमंत्री दर्जाप्राप्त ॲड. नीलेश हेलोंडे पाटील हे आज अकोला जिल्हा दौऱ्यावर आले होते. यादरम्यान त्यांनी रामापूर येथील मृत प्रमोद रमेश धुर्वे या आत्महत्याग्रस्त कुटुंबीयास भेट दिली व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व त्या कुटुंबास आतापर्यंत शासनाकडून कोणकोणत्या योजनेचा लाभ मिळाला? व शासनाकडून किती रुपये निधी मिळाला, याबाबत त्यांच्या पत्नी, मुलगी, सासरे यांची विचारपूस केली व हजर असलेले अधिकारी, कर्मचारी यांना या कुटुंबास शासनाच्या मिळणाऱ्या योजनेचा पूर्णपणे लाभ द्यावा, याबाबत कडक आदेश दिले. नंतर रामापूर जिल्हा परिषद शाळेत त्यांच्या हस्ते एक झाड लावून वृक्षारोपण केले. यावेळी जिल्हा महिला बाल विकास प्रकल्प अधिकारी सुनील चव्हाण, अकोट तहसीलदार माया वानखडे, अकोट गटविकास अधिकारी राहुल कराळे, युवासेना विस्तारक, सावकारग्रस्त शेतकरी समिती अध्यक्ष रमेश पाटील खिरकर, पी.ए.होपळ अकोलखेड मंडळ अधिकारी,सुनील ठाकरे कृषी सहायक, जे.डी. मोहाडे सचिव, जयश्री धवने तलाठी, गंगाधर गावंडे रोजगार सेवक, अनिल काळेकर कर्मचारी व गावातील प्रतिष्ठित व्यक्ती यांची उपस्थिती

### बाबाभाई सेजपाल यांना समाजसेवा पुरस्कार प्रदान



**अकोट** : अकोट हरिराम बाप्पा सेवा समितीचे सचिव यांना राजननगाव छत्तीसगड येथे उदयाचल संस्थेच्या माध्यमातून त्याचे सामाजिक कार्याचा भाग म्हणून त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. त्यांनी आतापर्यंत शेकडो रुग्णांना जीवनदान दिले व शेकडो अंध रुग्णांना मोफत ऑपरेशन करून जग दखविले. यावेळी डॉ. बाफना ,विनोद रायच्या, अतुल रायच्या, दिवैश रायच्या ,जोशी ,उत्तम जैन व सर्व पदाधिकारी यावेळी त्यांच्या कामाचा गौरव करून पुढील उदयाचल संस्थेत मित्र परिवाराच्या संघटनेत सामावून घेतले.

### सेंट पॉल्स ॲकॅडमी येथे अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त कार्यक्रम



**अकोट**: स्थानिक सेंट पॉल्स ॲकॅडमी अकोट येथे २६ जून रोजी जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन अकोट शहर पोलीस स्टेशन यांच्यावतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा.नवनीत लखोटिया होते. कार्यक्रमाला प्रमोद चांडक, लुनकरण डागा, रेखा चांडक, शारदा लखोटिया, सुधा डागा हे संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते, तसेच शाळेचे मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल, प्रभुदास नाथे, पर्यवेक्षक अभिजीत मेंढे, सारिका रेळे, मालती महल्ले, प्रशांत मंगळे उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अमोल माळवे (ठाणेदार अकोट शहर पोलीस स्टेशन )पी.एस.आय. बोडखे तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.याप्रसंगी ठाणेदार अमोल माळवे यांनी अमली पदार्थांचे दुष्परिणाम सांगितले व विद्यार्थ्यांकडून प्रतिज्ञा म्हणून घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार अभिलाष काळमेघ यांनी मानले. कार्यक्रमाला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## कित्येक दिवसांपासून होती शेतकऱ्याला पावसाची प्रतीक्षा

# एकाच पावसाने लावली शेतकऱ्याची वाट!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**पातूर नंदापूर, दि. २७ :** शेतीच्या मशागती शेतकऱ्यांनी यावर्षी पावसाचा अंदाज चांगल्या प्रकारे दाखवल्यामुळे संपूर्ण मशागती आटोक्यात आल्या होत्या. जून महिन्यामध्ये भरपूर प्रमाणात पाऊस सांगितल्याप्रमाणे शेतकरी आनंदात होता. यावर्षी जून महिन्यामध्ये पेरणी होतील या आशेने शेतकऱ्यांनी उसनवारी करून, सोने गहाण ठेवून आपल्या शेत माऊलीच्या कुशीत बियाणे टाकले.

गेल्या १८ जूनला भरपूर प्रमाणात पाऊस बरसलाही दुसऱ्या दिवसांपासून पेरणीला सुरुवात केली. २४ तारखेपर्यंत संपूर्ण शेतकऱ्यांचा पेरण्या आटोपला होत्या. परंतु २५ जूनला रात्रीपासून मुसळधार पावसाला सुरुवात झाली पाऊसही भयंकर झाला की दुसऱ्या दिवशी नदी नाल्यांना पूर आला शेतकऱ्यांच्या पेरणी झालेल्या जमिनी खरडून गेल्या सर्व शेतकऱ्यांच्या शेतामध्ये चोहीकडे पाणीच पाणी दिसत होते. कित्येक दिवसापासून होती शेतकऱ्याला पावसाची प्रतीक्षा अन एकाच पावसाने लावली शेतकऱ्याची वाट अशी स्थिती निर्माण झाली. परिसरामध्ये शेतीच्या मशागती शेतकऱ्यांनी यावर्षी पावसाचा अंदाज चांगल्या प्रकारे दाखवल्यामुळे संपूर्ण मशागती आटोक्यात आल्या होत जून महिन्यामध्ये भरपूर प्रमाणात पाऊस सांगितल्याप्रमाणे शेतकरी आनंदात होता. यावर्षी जून महिन्यामध्ये पेरणी होतील या आशेने शेतकऱ्यांनी उसनवारी करून, कुण्या कुण्या शेतकऱ्याने सोने गहाण ठेवून आपल्या शेत माऊलीच्या कुशीत बियाणे पेरण्यासाठी महाग मोलाचे बियाणे आणून तारेवरची कसरत केली. आणि १८ जूनला भरपूर प्रमाणात पाऊस बरसला शेतकरी आनंदात झाला. शेतकऱ्यांनी संपूर्ण परिसरामध्ये दुसरा दिवसापासून पेरणीला सुरुवात केली. २४ तारखेपर्यंत संपूर्ण शेतकऱ्यांचा पेरण्या आटोपला होत्या.

दोन दिवस पावसाचे वाट पाहत शेतकरी बसला होता परंतु निसर्ग कोपल्यामुळे २५ जूनला रात्रीपासून मुसळधार पावसाला सुरुवात झाली पाऊसही भयंकर झाला की दुसऱ्या दिवशी नदी नाल्यांना पूर आला शेतकऱ्यांच्या पेरणी झालेल्या जमिनी खरडून गेल्या सर्व शेतकऱ्यांच्या शेतामध्ये चोहीकडे पाणीच पाणी दिसत होते. काही शेतकऱ्यांनी पेरणी केल्यानंतर शेतातली बियाणे दडपले. अजूनपर्यंत निघालेच नाही त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. परंतु अजूनपर्यंत शेतकऱ्यांच्या शेतीचे सर्वे करण्यासाठी कोणत्या अधिकाऱ्याने संकेत दिले नाहीत. शेतकऱ्याची पेरणी अजून उगवली सुद्धा नाही आणि तीच शेती खरडून गेली तरीही शासनाला जागं आली नाही. शेतकऱ्यांसमोर दुबार करण्याचे संकट उभे असून आता पैसा कुठून आणायचा? त्यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे.

### अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेताच्या पंचनाम्याला सुरुवात



**पिंजर** : बुधवारी आणि गुरुवारी पिंजर आणि खेरडा मंडळामध्ये अतिवृष्टीने पावसाचा मोठा हाहाकार झाला. या अतिवृष्टीने सर्व शेत जलमय झाल्यामुळे कुठे बंधारे फुटले, तर कुठे नाले फुटून शेतकऱ्याच्या शेतात सर्व पाणी घुसले आणि शेतकऱ्याच्या पिकाची ऐशीतैशी झाली आहे. परिणामी, जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी तातडीने आदेश काढल्यामुळे बार्शीटाकळी तालुक्यातील नुकसान झालेल्या पिकांच्या सर्वेला सुरुवात करण्यात आली आहे. शुक्रवारी तातडीने प्रभारी नायब तहसीलदार अक्षय नागे, तालुका कृषी अधिकारी संध्या करवा, पिंजरचे मंडळ कृषी अधिकारी राठोड, महसूल मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक, इत्यादींनी भेंडीमहाल येथील नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची भेट घेऊन त्यांनी शेताची पाहणी केली आणि तातडीने पंचनामे सर्वेला सुरुवात केली आहे.

यामध्ये अक्षय नागे प्रभारी तहसीलदार तथा नायब तहसीलदार निवासी बार्शीटाकळी, संध्या करवा तालुका कृषी अधिकारी, पिंजरचे मंडळ अधिकारी, कृषी सहायक कृषी पर्यवेक्षक, संघपाल वाहूरवाघ पाणी फाउंडेशन बार्शीटाकळी, तालुका समन्वयक, संदीप राठोड तालुका युवा मोर्चा अध्यक्ष भारतीय जनता पार्टी, संदीप थोरात कृषी सहायक,तलाठी मोहिनी थोटांगे, तलाठी ज्ञानेश्वर हजारे, राठोड मंडळ अधिकारी कृषी, सरपंच प्रदीप राठोड, उपसरपंच सुधाकर चव्हाण, पोलीस पाटील राम महल्ले, दिनेश राठोड, अतिवृष्टीने अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झालेले मनिष देशमुख, मंगेश देशमुख, साहेबराव जाधव, प्रकाश जाधव,अरविंद जाधव, मदन जाधव, सुधाकर जाधव, रामेश्वर राठोड, विजय चव्हाण,पवन चव्हाण, किसान राठोड, मधुकर राठोड, सर्व इत्यादी शेतकरी यावेळी उपस्थित होते.

## पावसामुळे शेतीचे, शेतीसाधनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान

### तत्काळ पंचनामे करा: शेतकऱ्यांकडून मागणी



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पिंपळखुटा, दि. २७ :** पातूर तालुक्यातील पिंपळखुटा येथे गुरुवारी दुपारी ३ वाजता अचानक उतावळी नदीत खूप मोठ्या प्रमाणात पूर आल्याने शेतकऱ्यांचे नदीतील मोटर पंप तसेच स्पिंकलर पाइप, ठिबकचे मोठ्या प्रमाणात वाहून जाण्याचे शेतकऱ्यांना कडून माहिती मिळाली आहे. नदी काठच्या शेतकऱ्याच्या शतीमधील पीक खरडून गेल्याचेही चित्र आहे. मोठ्या प्रमाणात फळझाडांचे नुकसान झाले आहे. या नुकसानाचे शासनाकडून तत्काळ पंचनामे करावे व शेतकरी यांना मदत जाहीर करावी.

मी २५ तारखेला सोयाबीन व तूर पिकाची पेरणी केली आणि २६ तारखेला दुपारी आलेल्या पावसामुळे माझ्या पूर्ण शेतातून पाणी वाहून खरडून गेल्याने पिकाचे नुकसान झाले आहे.

**शेख प्यारू**
शेतकरी, पिंपळखुटा.

माझ्या शेतामधील दोन मोटर पंप व ११ पाइप वाहून गेले, तसेच कपाशी पिकाचे नुकसानसुद्धा झाले.

**राजू शहा**
शेतकरी, पिंपळखुटा.

हळद पिकाचे नुकसान व १४ पाईप आणि सात स्पिंकलर वाहून गेले.

**प्रमोद सिताराम हरमकार**
शेतकरी, पिंपळखुटा.

लिंबू पिकामधील ६ पाइप व पाइपलाइन वाहून गेली.

**मुक्तार खान**
शेतकरी, पिंपळखुटा.

## चोंढी धरण ओव्हरफ्लो, अनेक गावात पाणीच पाणी!

### शेतीचे प्रंचड नुकसान, पिके पाण्याखाली: काही गावांचा संपर्क तुटला!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बाळापूर, दि. २७ :**२६ जून रोजी संध्याकाळी झालेल्या पावसामुळे काही पेरणी केलेल्या जमिनी पाण्याखाली गेल्या तर अनेक गावांचा संपर्क तुटल्यामुळे बाहेरगावी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे हाल झाले.

तालुक्यातील अनेक ठिकाणी मे महिन्यातच लागवड केलेली पऱ्हाटी (कपाशी) चे पेरणी असलेली शेती पूर्ण पाण्याखाली गेल्याने शेतकरी हवालदिल झाला तर काही भागात बल्हाडी



शिवारातील शेतीमधील लिंबुची झाडे पुरामुळे खरडून वाहून गेली. तसेच नदीतून पाणी घेण्यासाठी टाकलेले मोटरपंप पुरामध्ये वाहून गेले, तसेच अनेक गावांमधील घरांमध्ये पाणी शिरले तर लोहारा गावातील पुलावरुन पुराचे पाणी फिरल्याने शेगाव अकोट रस्त्यावरील वाहतूक ठप्प झाली होती.

हात्ता शेतशिवारात पिकांचे अंकुर आले ते अंकुरही पाण्यामध्ये बुडून नुकसान झाले. बाळापूर शहरातील पुलावर इंटरनेटचे बसवलेले बॉक्स पाण्याने वाहून गेल्यामुळे अनेक नागरिकांच्या कामांमध्ये अडचण निर्माण झाली. चिंचोली येथील शेतकरी शत्रुघ्न अंभोरे यांच्या ३ एकर शेतीमधील लिंबू पुर्णपणे पाण्याखाली असल्याने खराब झाले. अनेकांचे कपाशीचे पीक पूर्ण पाण्याखाली गेल्याने नुकसान झाले.

गेल्या वर्षी लिंबूची लागवड केलेली होती आणि मे महिन्याच्या अखेर पऱ्हाटीची लागवड केलेली काल मन नदीच्या पाण्यामुळे शेतातील प्रचंड नुकसानाची पाहणी करून सर्वे करावे.

**अजय बाबर**

## शाळेची घंटा वाजली: गणवेश व गोड भाताचे वाटप

**खेटी** : जिल्हा परिषद व माध्यमिक शाळांचे २०२५,२६ चे शैक्षणिक सत्र सोमवार २३ जूनपासून सुरुवात झाल्याने सोमवारी शाळेची पहिली घंटा वाजली असून, खेट्री येथे उर्दू व मराठी शाळेतील विद्यार्थ्यांचे स्वागत सरपंच जहूर खान यांच्यासह शिक्षकांनी केले आहे. विद्यार्थ्यांची गावात प्रभात फेरी काढून गणवेश वाटप करण्यात आले. जि. प.उर्दू शाळेचे मुख्याध्यापक अब्दुल रफीक, मराठी शाळेचे मुख्याध्यापक नरेंद्र डिवरे यांच्या स्वखर्चाने विद्यार्थ्यांना गोड भाताचेही वाटप करण्यात आले, यावेळी सरपंच जहूर खान, पोलीस पाटील भगवंतराव ताले, उर्दू शाळेचे मुख्याध्यापक अब्दुल रफिक, मराठी शाळेचे मुख्याध्यापक नरेंद्र डिवरे व शिक्षक विजयकुमार गाढे, संजय कचाले, कातपुरे, शीतल, मो.नातीक, शाकीर खान, सै.नवेद, आसिम अहमद, शहनाज परवीन, मो. सुफियान, तसेच शाळा समिती अध्यक्ष मो. वाजीद, राष्ट्रपाल तिडके, उपाध्यक्ष इब्राहिम खान, अंगणवाडी सेविका ताले, ढमगाले, चांदकर व बहुसंख्य पालक उपस्थित होते.

## अखेर अकोट-अकोला रेल्वे पुलावर पथदिवे लागले!



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. २७ :** अकोट शहरातील अकोट-अकोला रेल्वे पुलावर रात्रीचा गडद अंधार पसरत असल्याने या ठिकाणी सतत अपघात घडत, दोघांचा जीवपण गेला; परंतु या पुलावर विद्युत लाईट लावण्याकडे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत होते. अशा परिस्थितीत शिवसेना उबाठा गट, वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी यांनी या ठिकाणी तीव्र आंदोलन केले. उपोषण केले. सतत निवेदन व मागणी पत्र देत पाठपुरावा केला. अखेर आंदोलनकर्त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून, अकोट नगर परिषदचे मुख्याधिकारी नरेंद्र बेबरे यांनी याप्रकरणी मागणीची दखल घेत अकोट-अकोला मार्गावरील उड्डाण पुलावर पथदिवे लावण्यात आले आहेत. आज या पदव्यांचे आंदोलनकर्त्यांनी रितसर लोकार्पण केले, त्यामुळे सर्वसामान्य जनतेला आता या पुलावरून रात्रीला वाहतूक करताना मोठा दिलासा मिळणार आहे. रेल्वे रुळावर उड्डाणपूल बांधल्यानंतर या पुलावर पथदिवे लावण्याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले होते, त्यामुळे या पुलावरून अकोला व दर्यापूरकडे जाणाऱ्या वाहनधारकांना तसेच या पुलाच्या पलीकडे राहणाऱ्या वस्तीमधील नागरिकांना रात्रीला जीव मुठीत घेऊन पुलावरुन प्रवास करावा लागत होता, तसेच नागरिकांना धडक लागण्याच्या घटनांमुळे गंभीर दुखापती झाल्या. या पुलावर पथदिवे नसल्यामुळे रात्री अंधार पसरतो. त्यामुळे शिवसेना उबाठा गटाने व वंचित बहुजन आघाडीने वेगवेगळी आंदोलने केली. शिवसेना उपजिल्हाप्रमुख दिलीप बोचे यांनी या ठिकाणी रास्ता रोको करून जागरूक नागरिकांचा हा मुद्दा रेटा लावून धरत जनआक्रोश सुरू केला होता. अखेर या ठिकाणी मुख्याधिकारी तथा प्रशासक नरेंद्र बेंबरे यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन लवकरच पुलावर पथदिवे लावण्याबाबतचे आश्वासन दिले होते. त्या आश्वासनानुसार मुख्याधिकारी नरेंद्र बेंबरे यांनी अकोट शहरातील जनतेच्या समस्येचा विचार करता पथदिवे लावण्यासाठी नगरपालिकेने निविदा काढत पथदिवे लावण्याचे काम पूर्ण केले, त्यामुळे या पुलावर असलेले अंधाराचे साम्राज्य दूर होणार आहे. या उड्डाण पुलावरील पथदिव्यांचे रेसर लोकार्पण शिवसेना उपजिल्हाप्रमुख दिलीप बोचे यांच्यासह तालुका प्रमुख ब्रम्हा पांडे, रोशन पर्वतकर ,वंचित चेविशाल आंग्रे, डॉ. गजानन महल्ले, राहुल पाचडे, अमोल पालेकर, सुभाष सुरत्ने, विजय ढेपे ,अक्षय घायल, अतुल पांडे होते याकरिता आंदोलनासाठी प्रहारचे जिल्ह्याप्रमुख कुलदीप वसू, गोलू भगत, काँग्रेस शहर अध्यक्ष सारंग मालानी यांनी सुध्दा सहकार्य केले होते.

## बबनराव लोणीकरांच्या विरोधात अकोट येथे शिवसेनेच्यावतीने तीव्र निदर्शने

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट , दि. २७ :** माजी मंत्री भाजप आमदार बबन लोणीकर यांनी एका संविधानिक पदावर असताना शेतकऱ्यांच्याविषयी एका आयोजित कार्यक्रमात बोलताना आक्षेपार्ह विधान केल्याबद्दल आज अकोट येथे शिवसेना ( उ. बा.ठा.) च्या वतीने आ.लोणीकर याच्या विरोधात छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात लोणीकरांच्या प्रतिमेला चपलांचा हार घालून काळे फासून निषेध करण्यात आला. भारत हा कृषिप्रधान देश असून, याठिकाणी सत्तेचा माज येऊन भारतीय जनता पार्टी अशा नेत्यांना खत पाणी पुरवतात, त्यामुळे सत्तेच्या मस्तीमुळे असे नेते शेतकऱ्यांविरोधात प्रतिक्रिया देतात, असा सूर उपस्थितांच्यावतीने उमटून आला. या आंदोलनात शिवसेना उपजिल्हाप्रमुख दिलीप



बोचे, सहकार सेनेचे सचिव प्रा.अतुल म्हैसने ,माजी कृ.बा.सदस्य डॉ.गजानन महल्ले, तालुका प्रमुख ब्रम्हा पांडे,युवासेना ता. प्रमुख राहुल पाचडे,शहर प्रमुख ॲड. मनोज खंडारे, अमोल पालेकर, विधानसभा संघटक विक्रम जायले, वैद्यकीय आघाडीचे रोषण पर्वतकर, पं.स.सदस्य सुरज गणभोज, आदिवसी तालुकाप्रमुख सुभाष सुरत्ने, विजय ढेपे, अतुल पांडे ,कमल वर्मा,अमोल बदरखे,गोपाल कावरे,अक्षय घायल, प्रणव चोरे, बंडू बोरोकार,विजय जवंजाळ,मंगेश वसु, उमेश आवारे,प्रथमेश बोरोडे, विलास ठाकरे नंदू बोंद्रे,अनिल नारे, अरूण सपकाळ,बच्चु भगत,जनार्धन वसू, अभिषेक डिक्कर,संकेत राऊत,आकाश बरेठीया,विलास जाधव, योगेश बरेठीया, भुराभाई, प्रद्युम्न डिक्कर,रितेश, डिक्कर,नितिन डिक्कर, प्रशांत रणगिरे, प्रशांत येऊल मल्हार गडदे ,आदित्य लाहोरे, अभिजीत मंडले, अविनाश तासतोडे,शिवा शिंदे,दर्शन सोनेकर, हितेश सातपुते,सोहेल वानखडे सुमीत भगत, नरेश सभागचंदानी,प्रशांत भोरखडे, योगेश वडतकार, प्रवीण किरकाडे अरूण सपकाळ,विजय सोनोने,प्रवीण अंभोरे, ऋषीकेष मंगळे सदर आंदोलन हे शिवसेना संपर्क नेते खा. अरविंद सावंत, उपनेते आ.नितिन बाप्पू देशमुख,मा. आ.संजय गावंडे, मा. आ. दाळू गुरूजी,माजी आ.हरिदास भदे, जिल्हा प्रमुख मंगेश काळे, जिल्हा प्रमुख गोपाल दातकर यांच्या मार्गदर्शनात व शिवसेना,युवासेना,महिला आघाडी,शेतकरी सेना, सहकार सेनेच्या सर्व आजी-माजी पदाधिकारी व शिवसैनिकांच्या उपस्थितीत करण्यात आले.

## थोडक्यात

### शिवशाही बसला ट्रकची धडक

खामगाव : शेगावकडे जाणाऱ्या शिवशाही बसला भरधाव ट्रकने धडक दिल्याची घटना खामगावजवळ घडली. या अपघातात बसचे नुकसान झाले असून, ट्रकचालकाविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एमएच ०९ ईएम-२१५७क्रमांकांची. शिवशाही बस शेगावकडे जात असताना जयपूर लांडे फाट्याजवळ एमएच-१५-सीएक्स-१८९९ क्रमांकाचा ट्रक वेगाने बसला समोरून धडकला. ही धड़क बसचालकाच्या बाजूने लागली. ट्रकचा चालक उमाकांत कडू कोळी (२९), रा. पाडसा, ता. यावल, जि. जळगाव बाने आपले वाहन निष्काळजीने चालवल्याची तक्रार बसचालक भास्कर बसंतराच गिते यांनी खाम गाव शहर पोलीस ठाण्यात दिली. या तक्रारीवरून ट्रकचालकाविरुद्ध पोलिसांनी भारतीय न्यायसंहितेच्या कलम २८५ व ३२४ (२) नुसार गुन्हा करण्यात आला आहे.

### भाजपाच्या वतीने छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी

खामगाव : भारतीय जनता पार्टी खामगाव च्या वतीने आज छत्रपती शाहू म हाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. स्थानिक भाजपा कार्यालयात छत्रपती शाहू महाराज यांची जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम पार पाडला. यावेळी भाजपा पदाधिकांच्या वतीने छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करीत पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजपाचे संजय शिनगारे, राजेंद्र धनोकार, श्याम पाटेखेडे, विलास काळे, डॉ एकनाथ पाटील, गणेश सोनोने, गजानन मुळीक, रवी गायगोळ, आदित्या केडीया, उत्तम पाटील, बोराले भैया, दीगोळे, भगवान सिंग चव्हाण आदी भाजपा कार्यकर्त्यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### बीबी येथे शाहू महाराज जयंती साजरी

**बीबी** : बीबी येथील राजर्षी शाहू मल्टीस्टेट क्रेडिट सोसायटी या शाखेत शाहू महाराज जयंती २६ जून रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम शाहू महाराज यांच्या फोटो प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन म न्यवरांच्या उपस्थितीत शाखेचे सदस्य प्रभाकर डहाळके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाखेचे व्यवस्थापक शंकर देवकर, प्रवीण मोरे, वाघमारे ,विजय पंदे, रियाज पठाण ,राधेश्याम जाधव, आदी मान्यवर, सभासद ,ग्राम स्थ, कर्मचारी वृंद, उपस्थित होते.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १५०० – २५०० |
| गहू | २३५० – २४६८ |
| तुर | ५२०० – ६७५० |
| हरभरा | ५३०० – ५७२५ |
| सोयाबीन | ३६०० – ४३५० |
| भुईमुग | ४५०० – ६००० |
| बाजरी | २१०० – २१०० |
| मक्का | १९०० – १९६५ |
| तीळ | ७६०० – ७६०० |

# खामगाव तालुक्यात आतापर्यंत ४५ टक्के पेरणी पूर्ण

## कपाशीच्या पेऱ्यात घट तर सोयाबीनचा पेरा वाढला

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२७ :** तालुक्यात यंदाच्या खरिप हंगामासाठी शेतकऱ्यांनी जोरदार तयारी केली असून, आतापर्यंत अंदाजे ४५ टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. मागील काही दिवसांपासून झालेल्या मध्यम ते जोरदार पावसामुळे शेती कामांना चांगला वेग आला आहे.

तालुक्यातील अनेक गावांमध्ये सोयाबीन, कापूस, तूर व मूग या प्रमुख पिकांची लागवड मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आहे. पावसाच्या नियमित हजेरीमुळे शेतकऱ्यांमध्ये आशावादाचे वातावरण आहे. कृषी विभागाच्या प्राथमिक अहवालानुसार, तालुक्यातील एकूण पेरणीयोग्य क्षेत्रापैकी जवळपास ४५ टक्के क्षेत्रावर पेरणी पार पडली आहे.

गेल्या काही दिवसांपासून ढगाळ वातावरण असून तुरळक ठिकाणी हलका पाऊस झाला आहे. मात्र मोठ्या प्रमाणात पेरणीसाठी आवश्यक असलेला जोरदार व सातत्याचा पाऊस अद्याप झालेला नाही. यामुळे अनेक शेतकरी पेरणी थांबवून पावसाची प्रतीक्षा करत आहेत.



**प्रमुख पिके व पेरणीचा आढावा:**
खामगाव तालुक्यात सोयाबीन, कपाशी, तूर, मका यासारखी प्रमुख खरीप पिके घेतली जातात. यंदा आतापर्यंत पेरणी झालेल्या क्षेत्रात:
सोयाबीन २५% कपाशी १५% तूर आणि मका ५%

तालुका कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार, खामगाव तालुक्यात एकूण १ लाख हेक्टर क्षेत्रावर खरीप हंगामात पेरणी होणे अपेक्षित आहे. यासाठी बी-बियाणे, खते व कीडनाशके यांचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्यात आल्याचे कृषी विभागाने सांगितले.

''सोयाबीनचे बी रोपाच्या वाढीसाठी पावसाची वेळेवर गरज आहे. जर आणखी पाऊस लांबला तर उगवण आणि उत्पादनावर परिणाम होऊ शकतो,'' अशी चिंता स्थानिक शेतकरी व्यक्त करीत होते. मात्र आता वेळेवर पावसाने जोरदार हजेरी लावल्याने शेतकऱ्याने सुटकेचा निश्वास सोडला. तालुक्यात आणखी ६५ टक्के पेरणी बाकी आहे. परंतु पावसाने उघड देताच शेतकऱ्यांची पेरणीची घाई सुरू होईल. या महिन्याच्या शेवटपर्यंत अर्ध्याअधिक शेतकऱ्यांची पेरण्या आटोपलेल्या असतील. मागील दोन दिवसांत पावसाने जोरदार हजेरी लावल्याने अनेक भागात पेरण्या खोळबंल्या आहेत. पावसाने उसंत दिल्यास उर्वरित पेरण्यासुध्दा वेगाने पुर्ण होतील. शेतकऱ्यांना आवश्यक असलेले बि,बीयाणे,खते मुबलक प्रमाणात बाजारात उपलब्ध आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी जास्तीचे पैशे देवून पेरणीसाहित्य खरेदी करू नये असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

''आतापर्यंत पेरणीची गती समाधानकारक आहे. आगामी आठवड्यात पावसाची स्थिती अनुकूल राहिल्यास उर्वरित क्षेत्रातही लवकरच पेरणी पूर्ण होईल,'' असे तालुका कृषी अधिकारी सुनिल पवार यांनी सांगितले.

भालेगाव बाजार येथील शेतकरी विठ्ठल पाटील म्हणाले, ''यंदा वेळेवर पाऊस झाल्यामुळे आम्ही वेळ न दवडता पेरणी सुरू केली. पीक व्यवस्थापनासाठीही तयारी केली आहे.''

## जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त भव्य मोटारसायकल रॅली



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मेहकर दि.२७ :** जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त दि. २७ जून २०२५ रोजी जनेफळ पोलीस ठाण्याच्यावतीने ''नशा मुक्त भारत'' अभियान अंतर्गत भव्य मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला स्थानिक नागरिक, पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

ही रॅली पोलीस ठाण्यापासून सुरू होऊन गावातील मुख्य रस्त्यांद्वारे जनतेत जनजागृती करत पुनः पोलीस ठाण्यावर विसर्जित झाली. यामध्ये ठाणेदार अजीनाथ मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राहुल चव्हाण, भगवान शिंदे, सुखदेव मोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मोहन सावंत, अरविंद चव्हाण, नागेश महाजन, पंढरीनाथ काकड, विनोद फुपाटे, माधव काळे, प्रशांत अर्साडे, सुशील काटरे, विशाल ढोंगडे, तसेच महिला पोलीस अधिकारी सुनिता शिंदे यांनी सक्रीय सहभाग घेतला.

यावेळी तंटामुक्त समिती अध्यक्ष कृष्णा हावरे, राजेश ठाकरे व इतर प्रतिष्ठित नागरीकांनीही रॅलीत सहभाग घेत समाजात 'नशा बंदी'संदर्भात जनजागृतीचा संदेश दिला. अनेक युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिक या रॅलीत सहभागी झाले होते. रॅलीदरम्यान ''नशा बंदी करा जीवन सुंदर करा'', ''युवकांनो, नशेपासून दूर राहा'' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. पोलीस निरीक्षक अजीनाथ मोरे यांनी यावेळी सांगितले की, ''अमली पदार्थांचे वाढते प्रमाण हे समाजासाठी अत्यांत घातक आहे. या संकटाविरुद्ध पोलिसांसह सर्वच घटकांनी एकत्र येणे अत्यावश्यक आहे. जनतेत जागरूकता निर्माण करूनच आपण हे समूळ उच्चाटन करू शकतो.'' कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्धपणे करण्यात आले. सहभागी नागरिकांना पोलीस प्रशासनाकडून अमली पदार्थांविषयी माहितीपत्रकांचे वाटपही करण्यात आले.

या रॅलीमुळे जनेफळ परिसरात समाजमनामध्ये नशा विरोधी जाणीव अधिक प्रबळ झाली असून, युवकांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण झाल्याचे स्पष्टपणे जाणवत होते. गावात अशा सामाजिक भान असलेल्या उपक्रमांचे आयोजन भविष्यातही करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## ही तर हिटलरशाही...जनता रस्त्यावर येवून जाब विचारणार- सानंदा

### खामगावातील अतिक्रमण हटाव मोहिमेत अन्यायकारक,अमानवीय कृत्य

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२७ :** स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये असलेले अतिक्रमणे काढून टाकण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश व शासनाचे परिपत्रके असले तरी त्यावर कारवाई करतांना सर्व सामान्यांचे नुकसान होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक असतांना खामगावात त्याकडे नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी जाणीवपुर्वक दुर्लक्ष करुन हीटलरशाहीचा प्रत्यय दिला आहे. गोरगरीब अतिक्रमण धारकांनी विनवणी केली असतांनाही त्यांनी जुल्मी व अमानवीय पध्दतीने ते हटविले.याचा सर्वच स्तरातून निषेध होत असून संतप्त जनता रस्त्यावर उतरुन जाब विचारल्याशिवाय राहणार नाही असा इशारा माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी दिला.

नगर परिषद हददीत अतिक्रमण व अवैध बांधकामे होवु न देणे, ही मुख्याधिकारी यांची जबाबदारी व त्यांचे कर्तव्य आहे. मात्र त्याकडे अर्थपुर्ण दुर्लक्ष करुन ती फोफावण्यास मागील अंदाजे १० वर्षात संधी दिल्या गेली. अतिक्रमणकर्त्यांनी उदर निर्वाहसाठी कर्ज व व्याजाने पैसे घेवून अतिक्रमणाच्या छोटया-मोठया टपऱ्या लावल्या. दरम्यान शुक्रवार दि.२७ जून २०२५ रोजी अतिक्रमण काढतांना संबंधीतांना मुख्याधिकाऱ्यासमोर हात जोडुन विनवणी केली तसेच व्याजाने पैसे घेत व्यवसाय सुरु केल्याचे सांगितले. त्यामुळे आमचे साहित्य सुरक्षीतपणे काढुन घेतो अशी विनंती केल्यानंतरही मुख्याधिकाऱ्यांनी हीटलरशाही पध्दतीने त्याांच्या साहित्यांची नासधूस करुन रोजगाराचे साधनही हिरावले.पावसाळयाच्या दिवसात अतीक्रमणाची मोहिम काढून अनेकांचे संसार उद्ध्वस्त करणारा हिटलर मुख्याधिकारी कोणाच्या इशाऱ्यावरुन कारवाई करतात हे सर्वश्रुत आहे. त्यामुळे त्या सर्वांना अतिक्रमणधारक जनता त्यांची जागा दाखविल्याशिवाय राहणार नाही असेही माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी म्हटले आहे.



खामगाव नगर परिषदेला कर्जबाजारी करुन शहरामध्ये २०० कोटी रुपयांचे निकृष्ट दर्जाच्या सिमेंट रस्त्याचे कामे सुरु आहे. ती कामे करण्याअगोदर अंडरग्राऊंड ड्रेनेजचा प्रकल्प मंजुर झाल्याशिवाय ती कामे करु नये असे शत व अटी मध्ये नमुद असतांना देखील त्यांनी ही कामे सुरु केलेली आहे.यामुळे अंडर ग्राऊंड ड्रेनेजची काम सुरु करतांना नव्याने झालेले रस्ते पुन्हा खोदावे लागतील व अंडर ग्राऊंड केबल,पाणी पुरवठा योजनेचे काम करावे लागेल व त्यामुळे शासनाचा,पर्यायाने जनतेच्या कोटयावधी रुपयांचा निधी व्यर्थ जाणार आहे. म्हणून प्रशासकीय मान्यतेच्या अटीचे उल्लंघन केल्यामुळे प्रशांत शेळके यांच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे.

खामगाव नगर परिषदेचे विद्यमान मुख्य प्रशासक तथा मुख्याधिकारी प्रशांत शेळके यांच्या कार्यकाळात झालेल्या विविध विकासकामे,लिज प्रकरणाची विशेष ऑडिट करुन सक्षम अधिकाऱ्यामार्फत समयबध्द कालावधीत चौकशी करुन कारवाई करावी अशी मागणी सुध्दा माजी आमदार सानंदा यांनी मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.मकरंदजी पाटील, कामगार मंत्री ना.आकाश फुंडकर, बुलढाणा जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.कारवाई न झाल्यास जनहितार्थ जनआंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील माजी आमदार सानंदा यांनी निवेदनात दिला आहे.

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी कार्यक्रम

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**रायपूर दि.२७:** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा अंतर्गत रायपूर या गावाची निवड करण्यात आली आहे.

या कार्यक्रमांतर्गत रायपूर येथे सूक्ष्म नियोजन प्रक्रिया राबविण्यात आली आहे. तसेच टप्प्यामध्ये गावात मशाल फेरी, जिल्हा परिषद शाळेच्या वतीने प्रभात फेरी मार्फत झाडे लावा, झाडे जगवा! असा संदेश दिला. तसेच महिला व कास्तकारांची सभा आयोजित करण्यात आली.



या कार्यक्रमांतर्गत गाव नकाशा काढणे, शेती आधारित रेशीम उद्योग, दुग्ध व्यवसाय सेंद्रिय शेती, गांडूळ खत निर्मिती करणे जमिनीचे आरोग्य, जलतारा प्रकल्प बचत गटामार्फत राबविण्यात येणारे सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग अशा विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. मृद व जलसंधारण कामांतर्गत गावात झालेल्या कामाची जसे की सिमेंट बांध, खोलीकरण, माती बांधा, गाळ काढणे डाळीचे बांध याबाबत चर्चा करून भविष्यात शेतकीय कामा संबंधी माहिती देण्यात आली. कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणून सोहम बेलोकार, एच डी हुडेकर सहाय्यक कृषी अधिकारी तसेच रायपूर येथील सहाय्यक कृषी अधिकारी, आणि कविता जाधव या उपस्थित होत्या. सदर कार्यक्रम कृषी विभागामार्फत घेण्यात आले यात समस्त गावकऱ्यांनी सहभाग नोंदविला.

## काँग्रेस तालुकाध्यक्षपदी राम जाधव तर शहराध्यक्षपदी राहुल सवडतकर



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**चिखली दि.२७:** चिखली काँग्रेस तालुकाध्यक्षपदी मा. रामभाऊ जाधव तर शहराध्यक्षपदी मा. राहुल सवडतकर यांची काँग्रेस चे जिल्हा अध्यक्ष राहुल बोन्द्रे यांच्या हस्ते अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे.

यावेळी नियुक्तीचे पत्र देऊन त्यांचा देखील सत्कार करण्यात आला. हा समारंभ शहर व तालुक्यातील असंख्य काँग्रेस कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. नव्या नेतृत्वाच्या स्वागतासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी एकत्र येत पक्षाच्या आगामी वाटचालीसाठी एकजुटीचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी माजी तालुकाध्यक्ष मा. समाधानभाऊ सुपेकर, माजी शहराध्यक्ष मा. अतहर काझी यांच्या सह असंख्य काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

## थकित गृहकर्जाची वसुली तात्काळ थांबवा : तहसीलदारांना निवेदन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**संग्रामपूर दि.२७:** महिंद्रा रूरल हाऊसिंग ची सक्तीची थकित गृह कर्जाची वसुली ही तात्काळ थांबवण्यात यावी यासाठी धामणगाव येथील नागरिकांनी तहसीलदार यांना २७ जून रोजी निवेदन दिले आहे.

सदर दिलेल्या निवेदनात नमूद आहे की महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड चे अधिकारी यांचे कडून गृहकर्जाची सक्तीची वसुली सुरू आहे आम्ही धामणगाव येथील रहिवाशी असुन शेत मजुरीचे काम करतो आणि कुटुंबासमवेत राहतो. आम्ही थकबाकीदार घरातील कर्तेपुरुष असुन संपूर्ण कुटुंबाची तसेच आमच्या पाल्याच्या शिक्षणाची संपुर्ण जबाबदारी ही आमच्यावरच आहे.



आमची आर्थीक परिस्थिती ही अत्यंत गरिबिची आहे. मोल मजुरी शिवाय आमच्याकडे उत्पन्नाचे काणतेही साधन नाही. सध्या स्थितीमध्ये सध्या पावसाळ्याचे दिवस असून या दिवसांमध्ये रोजगार सध्या मिळत नाही. त्यामुळे महिंद्रा फायनान्स मार्फत देण्यात आलेले कर्ज व त्यांच्या किस्त वेळेवर भरणे शक्य झाले नाही. त्यामुळे- आम्ही घेतलेली मुळ रक्कम भरण्यास तयार आहे. महिंद्रा फायनान्स कडून सक्तीची वसुली झाल्यास थकबाकीदार यांचे वर उपासमारीची वेळ येईल व त्यांचे कुटुंब उघड्यावर पडेल. त्यामुळे आम्हा शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय राहणार नाही तसेच असा काही प्रकार झाल्यास याबाबत ची संपूर्ण जबाबदारी महिंद्रा फायनान्स वर राहील असा इशाराही या निवेदनातून देण्यात आला आहे.

या निवेदनावर रामधन गोतमारे, प्रकाश गोतमारे, पंजाबराव गोतमारे, दिनकर काकड, भगवान वेरुळकर, गजानन गोतमारे, बाळकृष्ण गोतमारे, सुभाष गोतमारे, भाऊराव वानखडे, सविता धोरण, शिवहरी गोतमारे आदींच्या स्वाक्षऱ्या या

## आ.मनोज कायंदे यांनी घेतला बांधावर न्याहरीचा आस्वाद!

### मतदार संघात बांधावर जाऊन केली पीक नुकसानीची पाहणी

अजिंक्य भारत/ ज्ञानेश्वर म्हस्के

**अंढेरा दि.२७ :** अतिशय साधी राहणीमान आणि उच्च विचारसरणी या युक्ती प्रेमाने जनसामान्यांमध्ये मिळून मिसळून राहण्याच्या स्वभावामुळे नेहमीच चर्चेत असणारे सिंदखेडराजा मतदारसंघाचे युवा आ.मनोज कायंदे हे वेगवेगळ्या सामान्य घटनेने नेहमीच चर्चेत असतात.

मागील दोन दिवसांपासून संपूर्ण जिल्हाभर अतिवृष्टीमुळे बांधीत झालेली पिके यांची आपल्या मतदारसंघात दि.२७ जून वार शुक्रवारला शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिक नुकसानीची पाहणी करत प्रशासनाला तात्काळ सर्वे करण्याचे आदेश दिले. तसेच बांधीत झालेल्या अनेक गावांना भेटी दिल्या आणि शेतकऱ्यांशी चर्चा केली. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. अधिकाऱ्यांशी तात्काळ संवाद साधून समस्या सोडविण्याचे आदेश दिले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसगट नुकसान भरपाई कशी मिळेल यासाठी पाठपुरावा करु असे आश्वासन दिले. हे सगळं सुरू



असताना सकाळी आठ वाजेपासून घराच्या बाहेर पडलेले आमदार एक वाजता सहज मजाक मध्ये बोलले मला भूक लागली आहे. शेजारी असलेल्या मायमाऊलीने लगेच टोपली मधून पाच-सहा भाकरी काढल्या ठेचा लोणचं आमदार साहेबांच्या हातावर टेकविल्या बरोबर आमदार साहेब यांनी तात्काळ तेथेच बांधावर चक्क न्याहरीचा आस्वाद घेतला. आणि तात्काळ पुढील गावाच्या बांधावर जाण्यासाठी पुढे निघाले. आमदार साहेबाचा हा साधेपणा बघून सामान्य लोक आवक होत आहे.सामान्याचा आमदार अशी प्रतिमा जोपासत आमदार साहेब नक्कीच मतदार संघाचा विकास करतील ही अपेक्षा जनतेमध्ये प्रचंड प्रमाणात बळावली आहे. अधिकाऱ्यांचा ताफा सोबत असल्याने अधिकाऱ्यांची चांगली तारांबळ उडाली. आमदार साहेबांसोबत चिखल तुडवत शेतात जावं लागलं मात्र या कृतीमुळे शेवटच्या घटकातला बळीराजा सुखावून गेला.

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

शनिवार, दि. २८ जून २०२५

## थोडक्यात

### सुरवाडी येथून मोटारसायकल लंपास

**तिवसा :** शहरातील सुरवाडी परिसरातून हजार अज्ञात चोरट्याने मोटारसायकल चोरून नेल्याची घटना २४ जूनच्या रात्री घडली. या प्रकरणी तिवसा पोलीस स्टेशनमध्ये शुभम ज्ञानेश्वर सातपुते (वय ३०, रा. वरुडा) यांनी तक्रार दाखल केली आहे. शुभम सातपुते यांची हिरो स्प्लेंडर प्रो (क्रमांक एमएच २७ ए डब्ल्यू १४८९) ही अंदाजे ३० हजार रुपये किंमतीची दुचाकी त्यांचे मामा प्रकाश बाबूराव पडोळे यांच्या सुरवाडी येथील घरी फाटकाजवळ उभी करून ठेवली होती. अज्ञात चोरट्याने संधी साधून ती चोरून नेली. पोलीसांनी अज्ञात चोराविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### जखमी युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू

**माहुली जहांगिर :** शेतातून काम करून घराकडे भरधाव ट्रॅक्टर उलटला यात युवक गंभीर जखमी झाला. त्याला नागपूर येथे हलविण्यात आल्यानंतर उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला. करजगाव मार्गावर हा अपघात १३ जून रोजी घडला. नारायण महेश कसारे असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी मृताची आईने पोलीस ठाण्यात तक्रार दिली. मुलाकडे कोणतेही लायसन्स नसताना त्याला ट्रॅक्टर मालक शरद देशमुख यांनी ट्रॅक्टर चालवायला असे तक्रार नमूद केले आहे. त्याआधारे माहुली जहांगिर पोलीस ठाण्यात मृतासह शरद देशमुख यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहे.

### अल्पवयीन मुलीला पळवून नेले

**चिखलदरा :** तालुक्यातील एका गावातून अल्पवयीन मुलीला युवकाने मोटारसायकलवर बसवून फूस लावून पळवून नेल्याची घटना २१ जून रोजी घडली. पीडित मुलीच्या आईने पोलीस ठाण्यात तक्रार दिली. आपल्या मुलीला कैलास बेलसरे वय २५, रा. मोरगड यानेच पळवून नेल्याचा संशय पोलीस तक्रारीत व्यक्त केला. त्या आधारे चिखलदरा पोलिसांनी युवकाविरूध्द पळवून नेल्याचा गुन्हा दाखल केला.

### डोक्यावर हांडा मारून केले गंभीर जखमी

**धारणी :** काका-पुतण्यामध्ये शेतीसंदर्भात चर्चा सुरू असताना तू येथे काय करीत आहे असे म्हणून वाद घालून एकाने काकाच्या डोक्यावर हांडा मारून त्यांना गंभीर जखमी केले. तालुक्यातील निरागुडी येथे ही घटना २४ जून रोजी घडली. नानकराम ओंकार मावस्कर वय ५२ असे जखमीचे नाव आहे.

### उसणवारीवर पैसे देण्यास नकार दिल्याने मारहाण

**येवदा :** उसणवारीवर पैसे देण्यास नकार दिल्याने दोघांनी एका इसमाला लाथाबुक्यांनी मारहाण करून जखमी केले तसेच धमकी दिली. इंदिरानगर, येवदा येथे घटना घडली. किरण अशोक मोहोड व उमेश प्रकाश धाकतोडे यांनी दिनेश भगवान जाधव यांना उधारीवर पैसे मागितले असता त्यांनी नकार दिला. यावरून वाद घालून त्यांना सदर दोघांनी मारहाण केली.

### लिफ्ट देणे पडले महागात, दुचाकी लंपास

**धारणी :** एका इसमाला लिफ्ट देणे पडले महागात पडले. जिफ्ट मागणाऱ्याने त्यांची दुचाकी चोरून नेल्याची घटना २४ जून रोजी घडली. याप्रकरणी धारणी पोलीस स्टेशनमध्ये सुभाष बुधराम मेटकर रा. काकरमल तक्रार दाखल केली आहे. पोलीस सुत्रानुसार, सुभाष जांबेकर हे त्यांच्या एमएच १९ बिटी ३१२७) क्रमांकाच्या दुचाकीने निमदारी येथून लवादा गावाकडे जाताना फुलचंद जांबेकर नामक इसमाने हात दाखवून लिफ्ट मागितली. त्यांना सोबत घेवून ते जाताना मार्गावरील हॉटेलवर चहा पिण्यासाठी थांबले असता नजर चुकवून त्यांची अंदाजे २० हजार रुपये किंमतीची दुचाकी जांबेकर याने चोरून नेल्याचे सुभाष मेटकर यांनी तक्रारीत म्हटले आहे.

# विद्यार्थ्यांच्या भेटीला येणाऱ्यांना आता आचारसंहिता!

## शाळांच्या प्रवेशद्वारावरच राहणार नोंदवही

अजिंक्य भारत | सुधीर केने

**अमरावती, दि. २७ -** राज्यातील शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत राज्य शासन अतिशय गंभीर झाले आहे. यासाठी विद्यार्थ्यांच्या सुरक्षा संदर्भात वेगवेगळे पावले उचलली जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या भेटीसाठी येणाऱ्या अभ्यांगतांसाठी आचार संहिता लागू करण्यात आली आहे. शाळेच्या प्रवेशद्वारावरच नोंदवही ठेवणे बंधनकारक असून येणाऱ्या जाणाऱ्यांची नोंद या वहीमध्ये घेतली जाणार आहे.

गेल्या काही वर्षात शाळांमध्ये विद्यार्थ्यांवर होत असलेल्या अत्याचार आणि त्यातून घडलेल्या घटना ही बाब शिक्षण विभागासाठी लाजिरवाणी आहे. म्हणूनच राज्यातील सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व त्या अनुषंगाने कोणकोणत्या उपाययोजना कराव्यात यासाठी राज्य शासनाने निर्देश दिले आहेत.

शाळा सुरू असताना शाळेमध्ये विद्यार्थ्याला भेटण्यासाठी येणाऱ्या व्यक्तींसाठी आचारसंहिता लागू केली आहे. त्याचबरोबर शाळेच्या प्रवेशद्वारावर नोंदवही ठेवण्यात येणार आहे. सदर व्यक्ती कोणत्या विद्यार्थ्याला भेटण्यास आला त्याचे नाव, व्यक्तीचे नाव, व पत्ता आणि त्याचे कारण आधी सर्व माहिती नोंदवहीत नोंदली जाणार आहे. प्रत्येक शाळेत विद्यार्थी सुरक्षा समितीचे गठन करण्यात येणार आहे. जिल्हास्तरावरील विद्यार्थी सुरक्षा आढावा समितीचे गठन आणि विभागीय स्तरावर पर्यवेक्षण यंत्रणा राहणार आहे.



लैंगिक गुन्ह्यांपासून बालकाचे संरक्षण कायदा २०१२ यामध्ये ज्या तरतुदी आहेत त्या तरतुदींची अंमलबजावणी प्रत्येक शाळेने करणे आवश्यक आहे. सदर कायदा हा केंद्र शासनाचा असून या कायद्याखाली नियमावली केंद्र शासनाने लागू केली आहे. या कायद्यातील तरतुदी बाबत शिक्षणाधिकारी आणि प्रशासन अधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळा व्यवस्थापनांना कळविणे आवश्यक आहे. खाजगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांना शाळेत व परिसरातील महत्वाच्या ठिकाणी पर्याप्त संख्येने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्याचबरोबर सदर कॅमेरे नियमित कार्यरत असल्याची खात्री शाळा व्यवस्थापन यांनी करणे आवश्यक आहे. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांनाही सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे आवश्यक आहे. त्यासाठी निधी उपलब्ध करायचा असल्याने शिक्षणाधिकारी यांनी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

### स्वच्छतागृहाजवळ परिचर

राज्यातील प्रत्येक शाळेत मुली व मुलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे असणे अनिवार्य आहे. एवढेच नव्हे तर मुलींसाठी असलेल्या स्वच्छतागृहांजवळ एक महिला परिचर व मुलांसाठी असलेल्या स्वच्छतागृहांजवळ एक परिचर तैनात केला जावा असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहे. या उपायोजनांची अंमलबजावणी संबंधित शाळेत कशाप्रकारे झाली याची माहिती तात्काळ शिक्षण उपसंचालक कार्यालयाने मागीतली आहे.

# जिल्ह्यामध्ये १ हजार ६५० गावांत 'स्वच्छ सर्वेक्षण' मोहीम

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २७ :** जिल्ह्यात स्वच्छ भारत मिशन आराखड्यातील १ हजार ६५० गावांत स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ या उपक्रमांतर्गत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनात निर्माण झालेल्या सुविधांचा वापर तसेच सार्वजनिक ठिकाणी असलेले परिसर स्वच्छता शिवाय प्रत्येक कुटुंबांना भेटी देऊन बदललेल्या मानसिकतेची माहिती घेण्यासाठी केंद्र शासनाच्यावतीने पाहणी करण्यात येणार आहे. सर्व ग्रामस्थांनी मिळून लोकसहभाग व श्रमदानातून या सार्वजनिक सुविधांचा पुरेपूर वापर करत परिसराची स्वच्छता व प्लास्टीक मुक्तीची अंमलबजावणी करावी, असे आवाहन जि.प. सीईओ संजिता मोहपात्रा यांनी केले आहे. जिल्ह्यात दरवर्षीप्रमाणे स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण या क्रमात प्रत्येक ग्रामपंचायत सहभागी होत असते.

केंद्र शासनाच्यावतीने प्रत्येक ग्रा. पं. ची अद्ययावत माहिती घेऊन उभारण्यात आलेल्या घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या सुविधांची चाचणी व तपासणी रपी करण्यासाठी हे पथक जिल्ह्यात दाखल झाले आहे. प्रत्येक ग्रा. पं. ची तपासणी एकूण १ हजार गुणांपैकी प्राप्त झालेल्या गुणांकनाच्या आधारे जिल्ह्याचे गुणांकन ठरणार आहे. त्याचप्रमाणे राज्याचे देखील गुणांकन




देशपातळीवर ठरणार असल्याने प्रत्येक गावाने आपापल्या सुविधांचा वापर नियमित करण्याचे आवाहन सीईओ मोहपात्रा यांनी केले आहे. या पाहणीदरम्यान प्लॉस्टिक संकलन व व्यवस्थापन म्हणजेच वर्गीकरण केंद्राची पाहणी, खत खड्ड्यांचे व्यवस्थापन, परिसर स्वच्छता तसेच गृहभेटीतून हा परिषद अमरावती मिळणारी माहिती इत्यादीबाबत गुणांकन होणार आहे.

घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या सुविधांबाबत थेट निरीक्षणासाठी १२० गुण आहेत. ग्रामस्थांचा प्रतिसादांसाठी १०० गुण, गावातील सुविधांचा वापराबाबत २४० गुण तर प्रत्यक्ष पाहणी व निरीक्षणदरम्यान ५४० गुणांची प्रश्नावली असणार आहे. असे एकूण १ हजार गुणांपैकी प्राप्त होणाऱ्या गुणांच्या आधारे देशातील व महाराष्ट्रातील सर्वांत स्वच्छ सुंदर गाव व ग्रामपंचायत या मोहिमेदरम्यान घोषित होणार आहे. गाव भेटीदरम्यान प्रत्यक्ष निरीक्षण करताना स्वच्छता सुविधांचे निरीक्षण, ग्रामस्थांचा सहभाग जनजागृती दृश्यमान स्वच्छता इत्यादीबाबत पाहणी होणार आहे.

# ट्रकचालकाचे अपहरण करून तांदूळ चोरणारी टोळी गजाआड

## २९ लाखांचा मुद्देमाल जप्त | सहा तासांत पोलिसांची कारवाई

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.२७ :** ट्रकचालकास जबर मारहाण करून अपहरण करत २७ टन तांदूळ लंपास करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला आहे. गुन्हे शाखा युनिट-१ च्या पथकाने अवघ्या ६ तासांत दोन आरोपींना अटक करून २९ लाखांचा मुद्देमाल जप्त केला असून इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

२२ जून रोजी जळगाव जिल्ह्यातील निझामुद्दीन मोहम्मद सईद (वय ५४) हे तांदूळ भरलेला ट्रक (क्रमांक एमएच २० ईजी २६३९) घेऊन गोंदिया येथे निघाले होते. दरम्यान, सेलिब्रेशन हॉल, रिंगरोड परिसरात चार अज्ञात इसमांनी चारचाकी वाहनातून त्यांचा ट्रक थांबवून त्यांना ट्रकबाहेर उतरवले. त्यानंतर डोळ्याला पट्टी बांधून त्यांना दुसऱ्या गाडीमध्ये बसवून तब्बल ४ तास फिरवण्यात आले. त्यांचा ट्रक आणि त्यातील २७ टन तांदूळ (किंमत सुमारे ७ लाख रुपये) दुसऱ्या ट्रकमध्ये भरून अज्ञातांनी पळवून नेला. नंतर फिर्यादी व ट्रक निर्जनस्थळी सोडण्यात आला. या घटनेनंतर नांदगावपेठ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा अत्यंत गंभीर स्वरुपाचा असून यामुळे अमरावती आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास जलद गतीने करण्याचे आदेश दिले. गुन्हे शाखा युनिट-१ च्या पथकाने फिर्यादीची चौकशी करून रस्त्यावरील सीसीटीव्ही फुटेज तपासले.




गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे लालखडी परिसरात छापा टाकण्यात आला. यावेळी अजमत खान करामत खान (वय ३६, रा. रहमत नगर, अमरावती) व शेख इम्रान शेख रहमान (वय ३४, रा. हबीब नगर नं. १, अमरावती) यांना अटक करण्यात आली.

# बाल कलाकार सई पांचाळने पटकाविला प्रथम क्रमांक

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. २७ :** अखिल नटराजम आंतर सांस्कृतिक संघ नागपूर मेंबर ऑफ इंटरनॅशनल डान्स कौन्सिल यांच्या कडून भारतीय नृत्य महोत्सवाचे आयोजन पंजिम गोवा येथे २ जून ते ५ जून या कालावधीत घेण्यात आले होते आंतरराष्ट्रीय नृत्य महोत्सवा मध्ये दर्यापूर येथील प्रबोधन विद्यालयाची विद्यार्थिनी तथा नृत्य क्षेत्रात अनेक पारितोषिके मिळविणारी बाल नृत्यांगना कु सई



निलेश पांचाळ हिची निवड करण्यात आली होती, गोवा येथे झालेल्या या आंतर राज्जीय स्पर्धेत दर्यापूरातील कु सई पांचाळ हिने अप्रतिम नृत्य सदर करीत स्पर्धा जिंकली, स्पर्धेतील परीक्षक यांनी सई च्या नृत्यचे विशेष कौतुक करत तीला पुढील भविष्याच्या शुभेच्छा दिल्या, या स्पर्धेत कु सई ने प्रथम क्रमांक फटकावला असून तिचे सर्वत्र कौतुक होत आहे या नृत्य कार्यक्रमात संपूर्ण भारतातील नृत्य कलावंत याची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती यांसह अनेक मान्यवर तथा सिने कलाकार उपस्थित होते, यामध्ये बॉलीवूड कोरिओग्राफर डान्स डायरेक्टर वैभव घुगे यांच्यासह ढोलकीच्या तालावर फेम शुभम बोराडे हे लावणी प्रिन्स उपस्थित होते , बाल कलाकार असून सुद्धा कु सई पांचाळ हिने अनेक स्पर्धाकांवर मात करीत नृत्याचे कला विष्कार सादर करीत परीक्षकावर छाप पाडली तिच्या यशात आई शीतल ,पांचाळ वडील निलेश पांचाळ व बहीण कु वेदिका यांनी तीला प्रोत्साहन दिले, यावेळी तिची नृत्य शिक्षिका अर्चना रापतीवर यांनी सहकार्य केले

### दोन लाखांची फसवणूक

**अमरावती -** पोलिस असल्याची बतावणी करून, तिवसा हद्दीतील एका १९ वर्षीय विद्यार्थ्याची २ लाख रुपये व मूळ शैक्षणिक कागदपत्रांची फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी संकल्प संजय राणे (वय १९) यांच्या तक्रारीवरून विनायक काशीनाथ बोरकर (वय ६०) याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ऑनलाईन जुगार अड्ड्यावर धाड

## गाडगेनगर पोलिसांची कारवाई

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २७ :** शहरात ऑनलाईन जुगारांचं वाढत चाललेलं जाळं अखेर पोलिसांच्या रडारवर आलं आहे. रहाटगाव चौकात फोरसिजन मार्केटमध्ये 'फन टार्गेट' या वेबसाईटवर 'चकी' नावाचा ऑनलाईन जुगार मोकळ्याने खेळवला जात होता, आणि या अवैध धंद्याचं फड अगदी डल्ल्या बिनधास्तपणे सुरू होतं.

गुन्हे शाखा युनिट २ ने अचानक धाड टाकत हा गोरखधंदा उध्वस्त केला. पोलिसांनी केलेल्या कारवाईनंतर स्पष्ट झालं की, रहाटगाव चौकातील लॉटरी सेंटर हे फक्त आडसावं होतं. खरा धंदा चालायचा 'फन टार्गेट' वर! चकी नावाचा ऑनलाईन गेम खेळून ग्राहकांकडून रोख रक्कम उकळली जात होती.



गुन्हे शाखेचे पो.नि. संदीप चव्हाण यांना मिळालेल्या गुप्त माहितीवरून संपूर्ण पथकासह छापा टाकण्यात आला. छाप्यावेळी काही इसम संगणकांवर खेळ खेळताना आढळून आले. पोलिसांची चाहूल लागताच काही जुगारी पळून गेले. मात्र, गोपी राजू डाखोरे (रा. अप्पर वर्धो कॉलनी) यास अटक करण्यात आली. डाखोरेच्या ताब्यातून ऑनलाईन जुगाराचे साहित्य आणि रोकड असा एकूण २७,९८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कोणताही वैध परवाना नसल्याचे त्याने कबूल केले. या कारवाईनं एक गोष्ट सिद्ध झाली की गुन्हेगार कुठल्याही टेक्नॉलॉजीचा वापर करू लागले, तरी पोलिसांचा ससेमिरा त्यांच्यामागे लागलाच आहे. पण आता अपेक्षा अशी ही कारवाई 'फक्त एका सेंटरपुरती' मर्यादित न राहता, संपूर्ण शहरात जुगारवाल्यांवर धाडसशीर झडती सुरू व्हावी!चौकशीतून धक्कादायक माहिती समोर आली आहे. या जुगार धंद्याचे मुख्य सूत्रधार संकेत कुलट (रा. राठी नगर) आणि रोहन तायडे (रा. देशमुख लॉन) असून हे दोघे सद्यस्थितीत फरार आहेत. याशिवाय गणेश झाडे (रा. यवतमाळ) याच्याकडून गेमसाठी लागणारे लॉगिन आयडी आणि पासवर्ड ऑनलाईन घेण्यात येत असल्याचेही उघड झाले आहे. पोलीस आयुक्त अरविंद चावरीया यांनी अवैध धंद्यांवर धडक कारवाईचे आदेश दिल्यानंतर ही कारवाई झाली.

परंतु शहरभरात सुरू असलेले अशाच प्रकारचे सेंटर अजूनही बिनधास्त सुरू आहेत. शहरात एवढा उघडपणे ऑनलाईन जुगार चालतो, आणि प्रशासनाला कानोकान खबर लागत नाही, हेच खरे आश्चर्य!, शहरात किती ऑनलाईन सेंटर अजूनही सुरू आहेत?, जुगार, गुटखा, ड्रग्ज यांचा संगनमताने पोसला जाणारा गोरखधंदा कोण चालवतंय ?. फरार आरोपींना संरक्षण देणारे मोठे हात कोणाचे? असे काही प्रश्न या कारवाईमुळे चर्चेत आले आहे. गुन्हे शाखेच्या पथकात पो.नि. संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि महेश इंगोले, पो.उ.नि. संजय वानखडे, पोहेकॉ. गजानन ढेवले, दीपक सुंदरकर, मनोज ठोसर, आस्तिक देशमुख, संग्राम भोजने, मंगेश शिंदे, योगेश पवार आदींचा समावेश होता.

# जप्त केलेला एक हजार किलो गांजा नष्ट

## ३३ कारवाईत दोन कोटींचा मुद्देमाल नामशेष

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २७ :** जागतिक अंमली पदार्थविरोधी दिनाचे औचित्य साधून अमरावती शहर पोलीस आयुक्तालयातर्फे आतापर्यंतची सर्वात मोठी अंमली पदार्थ नाशाची कारवाई करण्यात आली. शहरातील विविध पोलिस ठाण्यांमध्ये एनडीपीएस कायद्यांतर्गत जप्त केलेल्या १००० किलो गांज्याचा (सुमारे दोन कोटी रुपये किमतीचा) मुद्देमाल विशेष देखरेखीखाली २६ जून रोजी नष्ट करण्यात आला. ही कारवाई महाराष्ट्र एनवायरो पावर लिमिटेड, बुटीबोरी (जि. नागपूर) येथील इंसीनेटरमध्ये करण्यात आली. २००५ पासून २०२५ पर्यंतच्या एकूण ३३ प्रकरणांमधून हा गांजा जप्त करण्यात आला होता.

अमरावती शहर पोलिस आयुक्तालय हद्दीतील नागपुरी गेट येथील ११ प्रकरणे, बडनेरातील ६ प्रकरणे, गाडगेनगर २ प्रकरणे, खोलापुरी गेट २ प्रकरणे, राजापेठ ५ प्रकरणे, सिटी कोतवाली ४ प्रकरणे, वलगाव ३ प्रकरणे अशा सर्व प्रकरणात पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातील १ हजार किलोपेक्षा अधिक गांजाचा माल जप्त केला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून गांजा हा माल विविध ठाण्यात पडून होता.



त्याची विल्हेवाट लावण्यासाठी कायदेशिर प्रक्रिया शहर पोलिसांकडून पार पाडण्यात आली. पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या आदेशानुसार, अंमली पदार्थ नष्ट करण्यासाठी त्रिसदस्यीय ड्रग डीस्पोजल कमिटी स्थापन करण्यात आली होती. या समितीत पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, कल्पना बारवकर, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांचा समावेश होता.

समितीची बैठक आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या परवानगीनंतरच महाराष्ट्र एनवायरो पावर लिमिटेड, बुटीबोरी येथे गांजा जाळून नष्ट करण्यासाठी अधिकृत मंजुरी मिळाली होती. त्यानंतर गांजा नष्ट करण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. गांजा नष्ट करताना ड्रग डीस्पोजल कमिटीचे सदस्य, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी, कंपनी व्यवस्थापक, दोन पंच, तसेच पोलिस निरीक्षक सिमा दाताळकर, सहायक निरीक्षक योगेश इंगळे, उपनिरीक्षक कैलास सानप, आणि पोलीस अंमलदार अजय मिश्रा, सुधीर गुडधे यांच्यासह इतर अधिकारी घटनास्थळी उपस्थित होते.

# माजी मंत्री लोणीकरांच्या पुतळ्याचे दहन

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**मोर्शी, दि. २७ :** तहसील कार्यालयाच्या आवारात आज दि.२७ जून रोजी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अमित अढाऊ यांच्या नेतृत्वात वादग्रस्त व बेताल वक्तव्य करणारे माजी मंत्री भाजप नेते बबनराव लोणीकर यांचा प्रतिकात्मक पुतळा जाळून त्यांचा जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला.

यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी बबनराव लोणीकर मुर्दाबाद, भाजप सरकार हाय हाय,या सरकारचं करायचं तरी काय खाली मुंडक वरती पाय अशा गगनभेदी घोषणेने परिसर दुमदुमून गेला होता.त्यामुळे काही काळ



तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी सामान्य नागरिकांना उद्देशून तुझ्या मायच्या बहिणीच्या व बायकोच्या नावावर लाडकी बहिण योजनेचे पैसे आम्हीच देतो. तुझ्या पायात बूट चप्पल आमच्यामुळेच आहे, त्याच्या मायचा पगार त्याच्या बापाचा पगार हा लोणीकरणे केला. त्याच्या बापाला पेरणीसाठी पैसे मोदींनी दिले.असे वादग्रस्त विधान केल्यानंतर त्याचे तीव्र पडसाद देशभरात उमटले असतांना सत्तेची गुमी चढलेल्या व पैशाची मस्ती आलेल्या बबनराव लोणीकर यांना पदमुक्त करण्यात यावे. अन्यथा यापुढे तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा स्वाभिमानी संघटनेचे नेते अमित अढाऊ यांनी दिला आहे.यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमितभाऊ अढाऊ, युवा नेते स्वप्निल कोठे, राजूभाऊ मुळे, संजूभाऊ आपकाजे, गोपालभाऊ चोपडे, आकाश चिखले,पियुष राऊत,प्रशांत राऊत, प्रफुलभाऊ उमरकर, पुरुषोत्तमभाऊ देवताळे, रवींद्र चौधरी, जानरावजी पचारे यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.




# माहितीच्या अधिकाराची पायमल्ली

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**चांदूर बाजार, दि. २७ :** येथील उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयात गेल्या दोन महिन्या पासून आमचे प्रतिनिधी गजानन ढवळे यांनी माहितीच्या अधिकारात माहिती मिळण्यासाठी गेल्या दोन महिन्यांपासून अर्ज केला आहे. याउपर अनेकदा माहिती मागवून ही संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही दखल घेतली नाही. शुक्रवार, दि. २७ रोजी ढवळे हे पुन्हा कार्यालयात गेले असता कार्यालयात अधिकारी व कर्मचारी आढळून आले नाही. यांच्यावर कोणाचाही अंकुश नसल्यामुळे कर्मचारी कधीही कार्यालयात येणे व निघुन जाणे हा नित्यनियम झाला आहे. आमच्यावर कोणतेही वरिष्ठ अधिकारी कारवाई करू शकत नाही असा भ्रम त्यांच्या झालेला दिसतो. तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग व त्यांच्या अधिनस्त सर्व कर्मचारी अधिकाऱ्यांना समज द्यावी अशी मागणी श्री ढवळे यांनी केली आहे.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
शनिवार, दि. २८ जून २०२५


## थोडक्यात

### क्षुल्लक कारणावरून दांड्याने मारहाण

**अमरावती :** स्वयंपाक घरात तेल का सांडविले याबाबत विचारणा करणाऱ्या इसमाला नातेवाईकांनी लाथाबुक्क्यांनी व कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण करून जखमी केले. वडाळी परिसरात ही घटना घडली. दिनेश भीमराव शेंडे यांच्या तक्रारीवरून दिलीप शेंडे, सागर दिलीप शेंडे व एक महिला यांच्याविरूध्द फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली फ्रेजरपुरा पोलीस करीत आहे.

### शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी

**अमरावती :** घरात शिरून महिलेला बाहेर खेचत आणून मारहाण केली तसेच तिच्या मुलीलासुध्दा शिवीगाळ करून धमकी दिल्याची वडाळी परिसरात घडली. याप्रकरणी पीडित महिलेने फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारे पंकज सुभाष भुरे रा. वडाळी याच्याविरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

### पुसदा येथून दारू विक्रेता ताब्यात

**अमरावती :** वलगाव पोलीस ठाणे हद्दीतील पुसदा गावात दारूची अवैध विक्री होत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी धाड घालून उमेश अण्णाजी वरघट याला रंगेहात ताब्यात घेत त्याच्याजवळून ९० मिलीच्या १३ नग दारू बॉटल्स किंमत अंदाजे ४५५ रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. यासप्रकरणी वलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला. या घटनेचा पुढील तपास वलगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली वलगाव पोलीस करीत आहे.

### अप्परवर्धा कार्यालय परिसरातून सेट्रिंगचे साहित्य लंपास

**अमरावती :** अप्परवर्धा कार्यालय परिसरातून सेटिंगचे अंदाजे ४० हजार रूपये किंमतीचे साहित्य अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना २४ जून रोजी घडली. याप्रकरणी संदीप त्र्यंबराव ढोबळे वय ५१, रा. अमरावती यांनी गाडगेनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारे अज्ञात चोरट्यांविरूध्द कलम ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

### मोपेडच्या धडकेत इसम गंभीर

**अमरावती :** जुनीवस्ती आरा मशीनजवळील रस्त्यावर मोपेडने धडक दिल्याने यात इसम गंभीर जखमी झाला. हा अपघात २५ जून रोजी धडला. महादेवराव हजारे रा. जुनी वस्ती, मोतीनगर, बडनेरा असे जखमीचे नाव आहे. त्यांना खासगी रूग्णालयात नेल्यानंतर जिल्हा रूग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. याप्रकरणी सुधाकर हजारे यांनी बडनेरा पोलीस ठाण्यात मोपेड चालकाविरूध्द तक्रार दाखल केली.

### दारू विक्रेत्यावर पोलिसांची कारवाई

**अमरावती :** भातकुली पोलीस ठाणे हद्दीतील पेढी क्वार्टर परिसरात दारूची अवैध विक्री होत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी धाड घालून अनिकेत दशरथ चव्हाण याला रंगेहात ताब्यात घेत त्याच्याजवळून १८० मिलीच्या ८ नग देशी दारू बॉटल्स किंमत अंदाजे ८०० रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

### ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी

**चिखलदरा :** बिहाली नाक्यानजिक घटांग मार्गावर ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने यात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. राकेश मंगल झामरकर वय २५, रा. कालापाणी असे जखमीचे नाव आहे. राकेश राकेश हा त्याच्या दुचाकीने परतवाडा येथून जाताना हा अपघात घडला.

# बापू कॉलनीत अतिक्रमणावर चालला बुल्डो झर!

## नागरिकाच्या तक्रारीवरून आ. राणा यांनी दिले कारवाईचे निर्देश

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २७ –** गेल्या अनेक दिवसांपासुन कवंर नगर झोपडपट्टीमध्ये कॉर्नर लगत असलेल्या जागेवर अवैध बांधकाम करुन अतिक्रमण करण्यात आले होते. विशेष म्हणजे हा रस्ता १८ मीटरचा असल्याने अतिक्रमण करुन ९ मीटरचा करण्यात आला होता. त्यामुळे त्या ठिकाणावरुन रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्यांना वाहतुकीमध्ये अडथळा निर्माण होत होता. विशेषत: रुग्णांना नेणारी रुग्णवाहिका, शाळेच्या विद्यार्थ्यांचे स्कुल वाहन, तसचे जाणारे येणारे ज्येष्ठ नागरिक यांना त्रास होत असल्यामुळे अनेक तक्रारी आ.रवि राणा यांच्याकडे आलेल्या असतांना संबंधित व्यक्तीला सुचना सुद्धा करण्यात आल्या होत्या. परंतु कोणत्याही प्रकारे रिप्लाय न देता सर्रासपणे भंगारचा व्यवसाय सुरु होता. तसेच त्यामुळे परिसरात अस्वच्छता पसरली होती. त्यामुळे नागरिकांच्या वारंवार तक्रारीवरुन आ.रवि राणा यांनी मनपाच्या अधिकाऱ्यांना तातडीने याठिकाणचे अवैध असलेले बांधकाम पाडण्यासंदर्भात सुचना दिल्या. त्यानुसार पोलीसांच्या बंदोबस्तात व मनपा अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत कवंर नगर झोपडपट्टीमधिल अवैध अतिक्रमित बांधकाम पाडण्यात आले. त्यामुळे





त्या रस्त्यावरुन जाणाऱ्या रुग्णवाहिका, शाळकरी विद्यार्थ्यांचे वाहन तसेच स्वत: सायकलने शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला असुन आता कोणत्याही प्रकाराचा वाहतुकीचा अडथळा नागरिकांना होणार नसल्याचे यावेळी आ.रवि राणा यांनी सांगितले. यावेळी मनपाचा ए.डी.टी.पी विभाग, अतिक्रमण विभाग, पोलीस विभाग, विद्युत विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## तेजस्विनी कोकाटे हिचे पॉलिटेक्निकमध्ये सुयश!

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**मोर्शी, दि. २७ :** शहर कॉंग्रेस कमेटीचे अध्यक्ष भुषण कोकाटे तथा माजी नगरसेविका सौ.वैशाली कोकाटे यांची मुलगी तेजस्विनी कोकाटे हिने अमरावती येथील डॉ. पंजाबराव देशमुख मुलींचे तंत्रनिकेतन येथून तृतीय वर्षाला कॉम्प्युटर सायन्समध्ये ८९ टक्के गुण प्राप्त करून मोर्शीच्या शिरपेच्यात मानाचा तुरा रोवला. तिने आपल्या यशाचे श्रेय कॉलेजच्या प्राचार्य डॉ.गुल्हाने मॅडम, प्राध्यापक, प्राध्यापिका, आजी आजोबा व आईवडील आत्या यांना दिले.कु.तेजस्विनी भूषण कोकाटे हिने मोर्शी शहराचे नावलौकिक केल्याबद्दल प्रा.दिलीप मालपे (उपाध्यक्ष खरेदी विक्री संघ मोर्शी),पंकज विधळे (संचालक खरेदी विक्री संघ मोर्शी) शरद विधळे, विजय कोकाटे, डॉ.गजानन पाटील, डॉ. योगेश पोके, डॉ.विजय वानखडे, डॉ.पंकज मुळे, ॲड.स्वराज श्रीराव, ॲड. नरेंद्र इंगळे, पत्रकार अजय पाटील, गजानन हिरुळकर, शेखर चौधरी, संजय उल्हे,गजानन ढोंगे, ॲड.प्रियंका शेळके, ॲड.मोहन श्रीवास, नगरसेवक सागर ठाकरे, राजाभाऊ साठवणे, संजय सोनटक्के, नितीन लुंगे, अजय कोंडे, आबु बारस्कर, प्रशांत ब्राह्मणे, कृष्णा वाघमारे, सुरेश सिहले, सविता ठाकरे, पुष्पा परतेती,अब्दुल नइम,वसीम कुरेशी , राजेंद्र लाखोडे आदींनी अभिनंदन केले.

## शेतकऱ्यांच्या उपोषणाला उबाठा शिवसेनेचा पाठिंबा

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**चांदूर बाजार, दि. २७ :** तालुक्या अंतर्गत येणाऱ्या वणी (बेलखेडा) गावातील शेतकऱ्यांची गाई, म्हशी, बैल, शेळया इत्यादी जनावरे मागील १० ते १५ वर्षा पासून वारंवार चोरीला जात आहे. आणि ही संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे.

चोरीला जाणाऱ्या जनावरची संख्या ही ८५ आहे. ही संख्या ज्यांनी जनावरांच्या चोरीची तक्रार केली तेवढ्यांचीच आहे कोणी कोणी तर तक्रार ही केलेल्या नाही म्हणून जनावरे चोरीचा आकडा याच्या पेक्षाही मोठा असु शकतो. शेतकऱ्यांच्या जनावरांच्या वाढत्या चोरींच्या घटनेला आळा घालण्या करिता कायम स्वरूपी उपाययोजना केली पाहिजे.

सन २०१० पासून आतापर्यत २९ शेतकऱ्यांचे जी ८५ जनावरे चोरी गेलेली आहेत त्याचा तपास करून चोरांना त्वरित अटक करण्यात यावी,सतत होणाऱ्या जनावरांच्या चोरीच्या घटनांना प्रतिबंध करण्याकरिता हलगर्जीपणा करणाऱ्यांवर तसेच चोरट्यांना पाठीशी



घालणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, जनावर चोरींच्या घटनेमुळे ज्या शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले त्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी. शेतकऱ्यांच्या होणाऱ्या नुकसानावर प्रशासन उदासीन दिसत आहे. म्हणून एवढे जनावरे चोरीला जाऊन सुद्धा पोलिसांना एवढ्या वर्षापासून चोरट्यांचा सुगावा लागत नाही आहे. येवढ्या वर्षापासून आता पर्यत पोलिसांनी एकही चोरटा ताब्यात घेतला नाही आहे. चोरट्यांना पकडण्यात पोलिसांना अक्षरशः अपयश आलेले आहे. म्हणून चोरट्यांचे मनोबल वाढत जात आहे आणि चोरीच्या घटना ज्यास्त वाढत आहे. सामान्य नागरिकांच्या कोणत्याही कार्यक्रमाला वेळेचे बंधन काटेकोर पणे पाळले जाते १० वाजले की साऊंड बंद करण्यासाठी पोलीस प्रशासन सक्रीय होतात. ५ मिनिट ही १० च्या वर चालत नाहीत. मग हे सर्व नियम काय सामान्य नागरिकांसाठीच आहेत का.

**वंचित बहुजन युवा आघाडीचा पाठिंबा**

वंचित बहुजन युवा आघाडीचे अविनाश वासनिक, सचिन बागडे, गोपाल वासनिक, सुरज चव्हाण तालुका अध्यक्ष आदिंनी शेतकरी मुकेश अलोने तसेच सहकारी आंदोलनकर्ते यांच्या आंदोलनाला वंचित बहुजन आघाडीने पाठिंबा दिला आहे.।

## अनुप गाडगे यांना लोकनायक बापूजी अणे पुरस्कार

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २७ :** राज्य शासनाचा अमरावती विभागीय लोकनायक बापूजी अणे उत्कृष्ट पत्रकरिता पुरस्कार २०२१ अनुप गाडगे यांना जाहीर करण्यात आला आहे. राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे अत्यंत मानाचा समजला जाणारा या पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. पत्रकारिता क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी राज्य शासनाच्या वतीने दरवर्षी विविध पुरस्कार देऊन पत्रकारांना सन्मानित केले जाते. २०१९ ते २०२३ पर्यतचे उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार मंगळवारी राज्य शासनाने जाहीर केले. यामध्ये अमरावती विभागीय लोकनायक बापूजी अणे पुरस्कार २०२१ साठी पत्रकार अनुप गाडगे यांची निवड झाली. ५१ हजार रुपये, मानचिन्ह व प्रशस्तीपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. गेल्या १९



वर्षांपासून अनुप गाडगे हे पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहे. विविध विषयांवर शोध पत्रकारिता करून अभ्यासपूर्ण लिखाण करण्यात त्यांचा हातखंडा आहे. त्यांच्या प्रभावी वृत्तांची विविध पातळीवर दखल घेतल्या गेली.

राज्य शासनाचा लोकनायक बापूजी अणे पुरस्काराचे मानकरी ठरल्याबद्दल आमचे सहकारी अनुप गाडगे यांचे हार्दिक अभिनंदन व त्यांच्या भावी – उज्वल वाटचालीसाठी त्यांना अनंत स्नेहदायी हार्दिक शुभेच्छा.

## उपविभागीय जलसंधारण कार्यालयात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी

**अंजनगाव सुर्जी, दि. २७:** समतेची शिकवण देणारे राजर्षी शाहू महाराज यांची २६ जून रोजी १५१ वी जयंती जि.प.उपविगीय जलसंधारण कार्यालय अंजनगाव सुर्जी येथे साजरी केली गेली.प्रत्येक नागरिकांना समान न्याय मिळावा यासाठी राजर्षी शाहू महाराजांना आठवले जाते. शाहू महाराजांचा २६ जून हा जन्मदिवस महाराष्ट्रात 'सामाजिक न्याय दिवस' म्हणून पाळला जातो.या कार्यालयीन प्रशासकीय प्रायोजिक तत्त्वावर उपविगीय जलसंधारण कार्यालय येथे यावेळी जलसंधारण प्रभारी अधिकारी अभियंता चंद्रशेखर गोळे, ऋषिकेश वाघमारे,



अनिल ठाकरे, रविंद्र नाथे, सुनील सांगळे, राजू कोकाटे यावेळी उपस्थित होते.

## राज्य सरकारच्या श्रावण बाळ योजनेपासून अनेक वृद्ध वंचित

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, दि. २७ :** महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून सामाजिक न्याय विभागा तर्फे श्रावण बाळ योजनेतून राज्यातील अनेक वृद्धांना १५०० रुपये आर्थिक अनुदान दिल्या जाते.परंतु महाराष्ट्र शासनाने सामाजिक न्याय विभागाचा निधी लाडकी बहीण योजनेत वळविल्याने गेल्या काही महिन्यांपासून राज्यातील अनेक वृद्ध श्रावण बाळ योजनेपासून



वंचित असल्याचे पाहायला मिळत आहे. श्रावण बाळ योजनेची वृद्धांना आर्थिक मदत मिळण्याची प्रक्रिया राज्य सरकार सामाजिक न्याय विभागाच्या पोर्टल वरून लिंक असलेल्या आधार क्रमांकाद्वारे थेट बँक खात्यात जमा होत असल्यामुळे अनेक वृद्धांना श्रावण बाळ योजनेपासून वंचित रहावे लागत आहे.तर गेल्या काही दिवसांपासून वृत्त वाहिन्यांच्या माध्यमातून सामाजिक न्याय विभागाचा निधी लाडकी बहीण योजनेत वळविल्याचे वृत्त आपण जनतेने ऐकले असणार.तर कार्यालयाच्या फेरफटका मारून दमलेले वृद्ध वंचित तर राहत नाही आहेत ना? लाडक्या बहिणीला निधी पुरवून सरकार पांगळेपण असलेल्या वृद्धांना आणखी पांगळ तर करीत नाही ना? वृद्धापकाळात आधाराचा हात देण्याऐवजी तापत्या उन्हात धाप टाकत वृद्ध बँक खात्यात योजनेचे पैसे जमा झाले की नाही पाहण्यासाठी कार्यालयाच्या चकरा मारीत असून याकडे सरकार गांभीर्याने लक्ष केंद्रित करणार का? याकडे चिंता व्याकुळ श्रावण बाळ योजना लाभार्थी टक लावून पाहत आहेत

### काटपुरला पुरामध्ये मोटारसायकल वाहून गेली

**काटपूर :** गुरुवारला दुपारी दोन वाजतापासून मुसळधार पावसामुळे नदीला पूर आला. यावेळी एका शेतकऱ्याने पात्रात ठेवलेली मोटरसायकल पुरामध्ये वाहून गेली. येथील शेतकरी अक्षय अशोकराव यावले हे गुरुवारी शेतामध्ये गेले होते. शेताला लागून असलेल्या नदीपात्रात त्यांनी त्यांची स्पेलंडर प्रो. कंपनीची एमएच २७ बिसी ५२२१ क्रमांकाची अंदाजे ६० हजार रूपये किंमतीची मोटार सायकल उभी करून ठेवली होती. दरम्यान अचानक नदीला पूर आल्याने पुरात मोटारसायकल वाहून गेल्याने त्यांचे नुकसान झाल.



## जि.प. शाळा येथे विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. २७ :** संपूर्ण महाराष्ट्र प्रवेश उत्सव हा उसात साजरा होताना तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा हिंगणी मिर्झापूर येथील विद्यार्थ्यांना सुद्धा पहिल्याच दिवशी पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

यावेळी शाळेला इमारत बांधणी करण्यासाठी जागा उपलब्ध करून देणारे सेवा सहकारी सोसायटी अध्यक्ष दिलीप पाटील गावंडे यांच्या हस्ते मुलांना पुस्तके वाटप करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापिका किरण लोथे, शिक्षिका भारत माहुरे, रमेश काळे, छाया भांडे, तसेंच ज्येष्ठ नागरिक पंजाबराव गावंडे आदी उपस्थित होते. पहिल्या दिवसाच्या प्रथम दिन प्रवेशोत्सव मध्ये विद्यार्थी अतिशय आनंदित व प्रगोलीत होते उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका किरण लोथे यांनी सर्वांचे स्वागत केले.

## राष्ट्रवादी शरद पवार पक्षात शेकडो कार्यकर्त्यांचा प्रवेश



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २७ :** राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद चंद्र पवार गटाला मजबूत करण्याकरता शरद चंद्र पवार यांच्यावर विश्वास ठेवून अमरावती येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शरदचंद्र पवार गट प्रदेश सरचिटणीस सन्माननीय निखिल भाऊ देशमुख अमरावती यांच्या नेतृत्वात शेकडो असंख्य युवकांनि वजेष्ठ कार्यकर्ते यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला. प्रमुख मार्गदर्शन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शरद पवार गटाचे युवकांचा व जेष्ठ कार्यकर्त्यांचा प्रवेश बाबत प्रमुख मार्गदर्शन अमरावती शहर जिल्हा पदाधिकारी प्राध्यापक हेमंतराव देशमुख शहर जिल्हाध्यक्ष, सौ वर्षा भटकर पाटील महिला शहर जिल्हाध्यक्ष, सय्यदभाई मन्सूर अमरावती शहर कार्याध्यक्ष, मंगेशभावु भटकर पाटील प्रदेश सरचिटणीस ओबीसी सेल, विशालभावु बोरखडे तसेच सतीशभावु भाऊ चरपे अमरावती शहर सचिव यांच्या मार्गदर्शनात अनेक ज्येष्ठ कार्यकर्ते व तरुण युवकांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद चंद्र पवार गटात असंख्य कार्यकर्त्यांनी आज प्रवेश केला व त्यांचे कार्यकर्त्यांचे अमरावती शहरात भव्य स्वागत करण्यात आले.

# खेळाडूंनी वाढविला विद्यापीठाचा नावलौकिक – कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २७ :** विद्यापीठाच्या खेळाडूंनी दक्षिण-पश्चिम विभाग व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करुन विद्यापीठाला विविध पदके व पारितोषिके प्राप्त करुन दिली आहेत. या सर्व खेळाडूंनी विद्यापीठाच्या विद्यापीठाचा नावलौकिक देशपातळीवर पोहचविला असून त्यात गौरवास्पद भर घातली आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्यावतीने २०२४-२५ मधील दक्षिण-पश्चिम विभाग व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये प्राविण्यप्राप्त चमूतील खेळाडूंना रोख पुरस्कार, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देवून तसेच चमू व्यवस्थापक आणि प्रशिक्षक यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.





व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. सुभाष गावंडे, डॉ. विकास टोणे, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. तनुजा राऊत उपस्थित होते.

## प्राविण्यप्राप्त खेळाडू व्यवस्थापक व प्रशिक्षकांचा सत्कार

कुलगुरू पुढे म्हणाले, पदक मिळविणे सोपे नाही. पारंपारिक विद्यापीठांसह खाजगी विद्यापीठातील खेळाडू सुद्धा या स्पर्धांमध्ये सहभागी होतात. खाजगी विद्यापीठे अद्ययावत सुविधा खेळाडूंना पुरवितात, त्या तुलनेत आपल्या खेळाडूंना कमी सुविधा असतात. तरी विद्यापीठाच्यावतीने खेळाडूंसाठी विविध सोयी-सवलतीमध्ये विद्यापीठाने वाढ केली आहे. रेल्वेतून ए.सी. कोचमध्ये प्रवासाची सुविधा विद्यापीठाने उपलब्ध करुन दिली असून भत्त्यामध्ये सुद्धा वाढ केली आहे.

कुलगुरू पुढे म्हणाले, सर्व खेळाडू, चमू व्यवस्थापक व प्रशिक्षकांनी अतिशय मेहनत घेतल्यामुळे अनेक पारितोषिके प्राप्त करुन विद्यापीठाच्या नावलौकिकात राष्ट्रीय स्तरावर भर घातली आहे. त्या सर्वांचे त्यांनी विद्यापीठाच्यावतीने अभिनंदन केले. भविष्यात आमचे खेळाडू आणखी पदके व पारितोषिके प्राप्त करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, देश पातळीवर दैदिप्यमान यश सर्व उत्कृष्ट खेळाडूंनी मिळविले आहे. कार्यशाळेच्या माध्यमातून सर्व क्रीडा विषयावर तज्ज्ञ विचार मांडतील, त्यावर साधक-बाधक चर्चा होवून त्याचा उपयोग क्रीडा शिक्षणाचा विकास होण्याकरीता निश्चितच होईल. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी क्रीडा स्पर्धेच्या आयोजनामध्ये क्रीडा प्रशिक्षक व व्यवस्थापक अथक परिश्रम घेतात. कुलगुरू सुद्धा आपणा सर्वांच्या पाठीशी आहेत. अनेक सुविधा व संधी खेळाडूंना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत, त्यामुळे भविष्यात आमचे खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाच्या नावलौकिकात आणखी भर घालतील, असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. अंबादास कुलट, प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे तसेच शारीरिक शिक्षण मंडळाचे पदाधिकारी, पाचही जिल्ह्यांतील क्रीडा संचालक, पालक मोठा संख्येने उपस्थित होते.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालय, नांदगांव पेठचे डॉ. श्रीकांत माहुलकर व नाशिकचे डॉ. राजेश क्षत्रिय यांनी, दुसया सत्रात श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या डॉ. कविता वाटाणे व यवतमाळचे डॉ. अनुप कोठारी, तिसया सत्रात सरस्वती कला महाविद्यालय, दहिहांडाचे डॉ. सागर नारखेडे व नागपूरच्या डॉ. माधवी मार्डीकर, तर चवथ्या सत्रात कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरबचे डॉ. अजय बोंडे व अमरावतीचे आशिष देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. समारोपीय समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, तर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रविण रघुवंशी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव



### उबुंटू इंग्लिश स्कूलमधील मोफत क्रिकेट शिबिराचा समारोप

**यवतमाळ :** येथील उबुंटू इंग्लिश स्कूलतर्फे उन्हाळी सुट्टीत आयोजित निःशुल्क क्रिकेट शिबिराचा समारोप नुकताच मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. समारोपानंतर शिबिरार्थी विद्यार्थ्यांचा सराव सामना घेण्यात आला. विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले आहे. या शिबिरात प्रशिक्षक पराग पांडे यांनी विद्यार्थ्यांना क्रिकेटचे धडे दिले. विद्यार्थ्यांचे पोषण आणि शारीरिक विकासावरही यावेही विशेष भर देण्यात आला. समारोप कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अबासाहेब पारवेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदय नावलेकर उपस्थित होते. त्यांनी खेळ आरोग्यासाठी किती आवश्यक आहे, हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग खांदवे, कार्यकारी संचालक अनुप यादव, बीसीसीआयचे प्रशिक्षक बाळूनवघरे आणि मुख्याध्यापिका शुभांगी बोरखडे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन श्री पडघन यांनी केले. तर आभार पराग पांडे यांनी मानले.



### विद्यार्थ्यांचे लेझीम पथकाच्या गजरात स्वागत

**घाटंजी :** येथील मोवाडा जिल्हा परिषद शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ विद्यार्थ्यांची गावातून लेझीमच्या तालावर मिरवणूक काढून करण्यात आला. या अनोख्या प्रवेशोत्सवात विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहाने आपला सहभाग घेतला. शाळेच्या पहिल्या दिवशी शिक्षणविषयक घोषणा देत, ट्रॅक्टर आणि मॅक्सिमामधून विद्यार्थ्यांची लेझीम पथकासह गावातून मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत सरपंच प्रवीणा राठोड, पोलिस पाटील जिजाबाई मेश्राम, विस्तार अधिकारी प्रज्ञा पाटील, केंद्रप्रमुख किसन किनाके, साधन व्यक्ती स्वप्नील वातिले, दीपक राठोड आदी सहभागी झाले होते. त्यानंतर शाळेत पहिलीत नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी आनंद पांडे आणि किसन किनाके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शुभेच्छा दिल्या. हा संपूर्ण कार्यक्रम मुख्याध्यापक राजू उपरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडला. यावेळी पालक व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### आर्णी शहरातील विविध शाळांना मनसेची भेट

**आर्णी :** तिसऱ्या भाषेची सक्ती थांबवावी, या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) आक्रमक भूमिका घेतली आहे. राज ठाकरे यांचे पत्र आर्णी शहरातील विविध शाळांना देत, सरकारच्या हिंदी लादण्याच्या निर्णयाला विरोध करण्याचे आवाहन मनसेने केले आहे. 'शाळांनी सरकारच्या या हेतूंना साथ दिल्यास तो महाराष्ट्रद्रोह मानला जाईल, असा स्पष्ट इशारा राज ठाकरे यांनी पत्रातून दिला आहे. मनसे पदाधिकाऱ्यांनी नगर परिषदेच्या सर्व शाळा, भारती शाळा आणि इतर प्रमुख शाळांना भेट देऊन व्यवस्थापनाशी संवाद साधला. या उपक्रमात सचिन यलगंधेवार, कपिल ठाकरे, विकास ठमके, महेश बांते, महादेव मेटके, धीरज कोडापे, शुभम मोरे यांच्यासह अनेक पदाधिकारी सहभागी झाले होते. लवकरच शहरातील सर्व शाळांमध्येही हे पत्र पोहोचवून, मराठीच्या लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले जाणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या भूमिकेमुळे आता शिक्षण क्षेत्रात नव्या चर्चेला तोंड फुटले आहे.

### पंढरपूर वारीसाठी यवतमाळ विभागातून २५० एसटी बसेस सज्ज

**यवतमाळ :** आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर, पंढरपूर वारीसाठी



जाणाऱ्या वारकऱ्यांच्या सोयीसाठी यवतमाळ परिवहन विभागाने विशेष नियोजन केले आहे. जिल्ह्यातील नऊ आगारांमधून ३० जूनपासून तब्बल २५० विशेष एसटी बसेस पंढरपूरसाठी थेट धावणार आहेत. ही विशेष वाहतूक प्रामुख्याने २ ते १३ जुलै दरम्यान सुरू राहील, अशी माहिती विभाग नियंत्रक अमृतराव कच्छवे यांनी दिली. ६ जुलै रोजी मुख्य आषाढी एकादशी आहे. यवतमाळ, पुसद, वणी, उमरखेड, दारव्हा, पांढरकवडा, नेर, दिग्रस आणि राळेगाव आगारांतून या गाड्या सुटतील. ज्या गावांमधून आगारात येणे शक्य नाही, तेथे ४० ते ५० प्रवाशांची संख्या झाल्यास थेट गावातूनही अतिरिक्त बस सोडण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. वारकऱ्यांच्या प्रवासासाठी या काळात काही कमी उत्पन्नाच्या फेऱ्या तात्पुरत्या बंद ठेवण्यात येणार आहेत. वारकऱ्यांची सुरक्षितता जपण्याला प्राधान्य दिले जाईल, असेही कच्छवे यांनी स्पष्ट केले.

# पाच हजार ४३३ रुग्णांवर उपचार

## पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य संकल्प अभियान

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.२७:** राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त दिग्रस, दारव्हा, नेर येथे आरोग्य संकल्प अभियान राबविण्यात आले. माँ आरोग्य सेवा समिती यवतमाळ व दत्ता मेघे आयुर्विज्ञान संस्था संचालित आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी (मेघे) यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या आरोग्य शिबिरात तिन्ही तालुक्यांत एकूण पाच हजार ४३३ रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. गंभीर आजार असलेल्या दोन हजार ६१०रुग्णांना पुढील उपचारासाठी सावंगी (मेघे) येथे पाठविण्यात येणार आहे.



शासकीय रुग्णालयात अनेक आजारांवर मोफत उपचार होतात. मात्र कर्करोग, किडनी, मेंदूविकार अशा गंभीर आजारांवरील उपचार महागडे व खर्चिक आहेत. मतदारसंघातील नागरिकांचा अशा महागड्या आजारांवरील उपचारासाठी एक रुपयासुद्धा खर्च होऊ नये. त्यांच्यावर सर्व उपचार मोफतच व्हावेत, यासाठी दर तीन महिन्यांनी दिग्रस, दारव्हा, नेर तालुक्यात पालकमंत्री संजय राठोड यांच्या मार्फत गेल्या अनेक वर्षांपासून नियमित आरोग्य तपासणी शिबिर घेतले जाते. आरोग्य संकल्प अभियानांतर्गत दिग्रस, नेर व दारव्हा येथे हे मोफत आरोग्य तपासणी, उपचार, शस्त्रक्रिया व औषध वितरण शिबिर घेण्यात आले. या शिबिरात तिन्ही तालुक्यांत नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती. नेत्ररोग, मेडिसीन, बालरोग, शल्यचिकित्सा, स्त्रीरोग, अस्थिरोग, कान, नाक, घसा, त्वचारोग, श्वसनरोग, दंत व मुख रोग, मानसिक विकार, हृदयरोग, मुत्ररोग, मेंदूविकार, न्यूरोसर्जरी, प्लास्टिक सर्जरी, रेडिओलॉजी, आयुर्वेदिक आणि कर्करोग रुग्णांची मोफत तपासणी व उपचार करण्यात आले. याशिबिरात दिग्रस तालुक्यात एक हजार ८२४, नेर एक हजार ७६० तर दारव्हा तालुक्यात एक हजार ८४९ अशा एकूण पाच हजार ४३३ रुग्णांनी लाभ घेतला. या रुग्णांमधून दोन हजार ६१० रुग्णांना पुढील उपचारासाठी सावंगी मेघे येथे उपचारासाठी दाखल करण्यात येणार आहे. या रुग्णांना दिग्रस, नेर, दारव्हा येथून पालकमंत्री संजय राठोड यांच्या जनसंपर्क कार्यालयातून पुढील मोफत उपचारासाठी सावंगी मेघे येथे नेले जाणार आहे. तेथे तपासणी केल्यानंतर ज्या रुग्णांवर सावंगी मेघे येथे उपचार होणार नाही, अशा रुग्णांना नागपूर, मुंबई येथे उपचारासाठी घेऊन जाण्यात येणार आहे. सर्व रुग्णांवर सर्व उपचार शासकीय योजनांमधून मोफत केले जातात. ज्या आजारांवर शासकीय योजनांमधून उपचार शक्य नाही, त्या उपचारांसाठी पालकमंत्री संजय राठोड यांच्या मार्गदर्शनात माँ आरोग्य सेवा समितीच्या माध्यमातून आर्थिक मदत केली जाते. गंभीर आजारांवरील महागडे उपचार, रुग्णांच्या विविध रक्त तपासण्या, औषधी व सर्व रूग्णांसह त्यांच्या एका नातेवाइकांचा येण्या-जाण्याचा व जेवणाचा सर्व खर्च पालकमंत्री संजय राठोड उचलतात.

सावंगी मेघे येथे उपचारासाठी जाणाऱ्या रुग्णांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी यवतमाळप्रमाणेच तेथील दवाखान्यात रूग्णसेवक नेमण्यात आले आहेत. हे रूग्णसेवक दिग्रस, दारव्हा, नेर तालुक्यातील शिबिरांमधून उपचारासाठी जाणाऱ्या रुग्णांना सर्व सेवा पुरवतात. त्यांच्या विविध तपासण्या, औषधी, राहण्याची, जेवणाची व्यवस्था हे रूग्णसेवक करून देतात. दिग्रस, दारव्हा, नेर तालुक्यात नियमित होणाऱ्या या आरोग्य शिबिरामुळे विविध आजारांचे रुग्ण घटत असल्याचे दिसून येत असल्याचा अनुभव या शिबिरात कार्यरत डॉक्टरांनी सांगितला. संजय राठोड यांची समाजसेवक आणि रुग्णसेवक म्हणून असलेली ओळख या आरोग्य संकल्प शिबिरातून नव्याने अधोरेखित झाली. रुग्णसेवक म्हणून जनसामान्यांच्या आरोग्याचे प्रश्न सोडविण्याची तळमळ मंत्री संजय राठोड यांच्या कामातून आजी प्रकर्षाने जाणवते, अशी प्रतिक्रिया यावेळी अनेक रुग्णांनी दिली.

## डुमणी-कुऱ्हा रस्त्याच्या कामाला अखेर सुरुवात

### ‘अजिंक्य भारत’च्या वृत्ताचा दणका, प्रहारच्या इशाऱ्यानंतर प्रशासनाला जाग

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**आर्णी, दि. २७ :** तालुक्यातील डुमणी-कुऱ्हा रस्त्याच्या दुरवस्थेबद्दल 'प्रहार जनशक्ती पक्षा'ने दिलेल्या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर, अखेर सार्वजनिक बांधकाम विभागाने कामाला सुरुवात केली आहे. ‘दै. अजिंक्य भारत’ने १९ मे रोजी या गंभीर समस्येला वाचा फोडली होती, ज्याची प्रशासनाने आता दखल घेतली आहे.





डुमणी-कुऱ्हा रस्ता
१५ दिवसांत पूर्ण करा
दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

आर्णी-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गाला सावळी, सदोबा, डुमणी, कुऱ्हा, अंतरगाव, केळझरा या गावांना जोडणाऱ्या या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले होते आणि गिट्टी पूर्णपणे उखडली होती. या जीवघेण्या रस्त्यावरून प्रवास करताना नागरिकांना मोठी कसरत करावी लागत होती. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी, प्रहारचे तालुकाप्रमुख रवी जाधव यांनी १५ दिवसांची मुदत देत, काम न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला होता. अर्धवट झालेल्या रस्त्याची चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली होती. ‘दै. अजिंक्य भारत’ने या समस्येवर वृत्त प्रकाशित केल्यानंतर आणि ‘प्रहार’च्या इशाऱ्यानंतर, सुस्त प्रशासन जागे झाले आणि रस्त्याच्या कामाला अखेर सुरुवात झाली आहे. सध्या या मार्गाचे काम वेगाने सुरू असून, नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे. एका महत्वपूर्ण रस्त्याचे काम मार्गी लागल्याने, परिसरातील अनेक गावांतील नागरिकांची मोठी सोय झाली आहे. या प्रकरणामुळे, लोकशाहीत नागरिक आणि संघटनांचा दबाव प्रशासनाला काम करण्यास कसे भाग पाडू शकतो, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

## नायब तहसीलदारांनी केले २४ शेतरस्ते मोकळे

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**महागाव, दि. २७:** येथील नायब तहसीलदार गोदाजी राठोड यांनी पुढाकार घेऊन तालुक्यातील २४ शेतरस्ते आणि पांदणरस्ते अतिक्रमणमुक्त केले आहेत. अनेक महिन्यांपासून बंद असलेले हे रस्ते मोकळेझाल्याने, शेतकऱ्यांमधून समाधानाची भावना व्यक्त होत आहे. तहसीलदार अभय मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली धडक मोहीम राबविण्यात आली आहे.

तहसीलदार अभय मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली, नायब तहसीलदार गोदाजी राठोड यांनी ही मोहीम प्रभावीपणे राबवली. सेवादास नगर, करंजी, कोठारी, मोहदी, हिवरा, फुलसावंगी,



नांदगाव यांसह इतर गावांमधील रस्ते खुले करण्यात आले. हे रस्ते बंद असल्याने शेतकऱ्यांना पिकांपर्यंत पोहोचण्यात आणि शेतीची कामे करण्यात मोठ्या अडचणी येत होत्या. राठोड यांनी केवळ कार्यालयीन आदेश न देता, स्वतः गावोगावी जाऊन पाहणी केली आणि तातडीने रस्ते मोकळे करून घेतले. त्यांच्या या कार्यामुळे 'आमचा न्याय परत मिळाला,' अशा भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत. प्रशासनाच्या या थेट कृतीमुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## घाटंजीतील उर्दू शाळेला नवी इमारत

### लोकार्पण सोहळा साजरा, अवघ्या अडीच महिन्यांत बांधकाम पूर्ण




**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**घाटंजी, दि. २७ :** येथील नगर परिषदेच्या प्राथमिक उर्दू शाळेच्या नवीन इमारतीचे लोकार्पण नुकतेच उत्साहात पार पडले. अनेक वर्षांची प्रतीक्षा संपवून, अवघ्या अडीच महिन्यांत हे बांधकाम पूर्ण झाल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

आमदार राजू तोडसाम आणि लोकनेते अण्णा पारवेकर यांच्याहस्ते फीत कापून इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. अवघ्या अडीच महिन्यांत हे बांधकाम पूर्ण केल्याबद्दल मुख्याधिकारी राजू घोडके यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. अण्णासाहेब पारवेकर यांच्या मोलाच्या योगदानामुळेच हे शक्य झाल्याची कृतज्ञता मुस्लिम समाजाने व्यक्त केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार तोडसाम होते. यावेळी तहसीलदार विजय साळवे, सचिन पारवेकर, नितीन कोठारी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात दिव्यांग बांधव व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक राजू घोडके यांनी केले, तर सूत्रसंचालन रूपेश कावलकर यांनी केले.

## मनोचिकित्सक डॉ. घरझोडे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. २७ :** येथील मनोचिकित्सक आणि आरोग्य भारतीचे नवनियुक्त सदस्य डॉ. दीपक घरझोडे यांना कनेक्ट पीपल सोसायटीतर्फे महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या सामाजिक आणि आरोग्य क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन हा गौरव करण्यात आला.

अहिल्यानगर येथे झालेल्या सोहळ्यात खासदार निलेश लंके आणि राणी लंके यांच्या उपस्थितीत, सहाय्यक पोलिस आयुक्त संतोष खाडे यांच्याहस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. घरझोडे यांनी यवतमाळातील वाढती बाल गुन्हेगारी, विद्यार्थ्यांच्या आत्महत्या आणि ऑटिझम यांसारख्या विषयांवर व्याख्यान व चर्चासत्रांच्या माध्यमातून मोठी जनजागृती केली आहे. यावेळी आरोग्य भारतीचे प्रांतपाल डॉ. प्रसाद बनसोड, डॉ. अनिल आखरे, राकेश मिश्रा, मनीष गुबे आदी उपस्थि होते.

## स्वयंरोजगार विकास प्रशिक्षणाचे आयोजन

**यवतमाळ, दि. २७ :** महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रातर्फे (एमसीईडी) यवतमाळ येथे स्वयंरोजगार प्रशिक्षण आयोजित केले आहे. २ ते ८ जुलै दरम्यान होणाऱ्या या सशुल्क प्रशिक्षणासाठी नावनोंदणी सुरू झाली आहे. उद्योग भवनात होणाऱ्या या प्रशिक्षणात उद्योग संधी निवड, प्रकल्प अहवाल तयार करणे आणि शासकीय कर्ज योजनांची माहिती दिली जाईल. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेतील (सीएमइजीपी) कर्ज प्रस्तावांसाठी मार्गदर्शन मिळेल. हे प्रशिक्षण सशुल्क आहे. इच्छुकांनी अधिक माहिती व प्रवेशासाठी १ जुलैपर्यंत प्रतिक इंगोले यांच्याशी (८२७५१०८७५८) संपर्क साधावा, असे आवाहन एमसीईडीच्या प्रकल्प अधिकाऱ्यांनी केले आहे.

# बाभूळगाव तालुक्यात १२ हजार विद्यार्थी रमले 'प्रवेशोत्सवात'

## १२५ शासकीय आणि खासगी शाळांची घंटा वाजली, यंदापासून सर्व शाळांमध्ये 'सीबीएसई' पॅटर्न लागू

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**बाभूळगाव, दि. २७ :** उन्हाळ्याच्या दीर्घ सुट्टीनंतर, बाभूळगाव तालुक्यातील १२५ शासकीय आणि खासगी शाळांची घंटा सोमवारी (दि. २३) पुन्हा एकदा वाजली आणि 'चला शाळेत जाऊ या' म्हणत सुमारे १२ हजार विद्यार्थी शाळेत दाखल झाले. ठिकठिकाणी 'शाळा प्रवेशोत्सव' साजरा करत, विद्यार्थ्यांचे फुले आणि पेढे देऊन स्वागत करण्यात आले.



नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी सकाळपासूनच शाळा आणि शहरात उत्साहाचे वातावरण होते. अनेक दिवसांनी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद होता, तर पहिल्यांदाच शाळेत पाऊल ठेवणाऱ्या चिमुकल्यांना त्यांचे पालक समजावून शाळेत सोडत होते. शाळांची प्रवेशद्वारे फुगे आणि फुलांनी सजवण्यात आली होती. काही शाळांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी मिरवणुका काढल्या, तर काही ठिकाणी 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. शासकीय शाळांमध्ये पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके आणि गणवेशाचे वितरण करण्यात आले. यावर्षीपासून शासनाच्या नवीन शिक्षण धोरणानुसार, तालुक्यातील इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या सर्वच शाळांमध्ये 'सीबीएसई' पॅटर्न लागू केला जात आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन अभ्यासक्रमाबद्दल उत्सुकता आहे, तर खासगी शाळांचा खर्च वाचणार असल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले आहे. मात्र, आत्तापर्यंत मराठी माध्यमातून शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी हे एक मोठे आव्हान असणार आहे. ज्यामुळे त्यांच्या शिकवण्याच्या कौशल्याचा कस लागणार आहे.

### विद्यार्थ्यांची स्वागत दिंडी

बाभूळगाव शहरात शिक्षण विभागाने प्रवेशोत्सवानिमित्त एक विशेष मिरवणूक (दिंडी) आयोजित केली होती. स्थानिक शाळेचे विद्यार्थी आणि शिक्षक यात मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. ढोल-ताशांच्या गजरात निघालेल्या या दिंडीने शहराचे लक्ष वेधून घेतले. अनेक नागरिक आणि पालकही या आनंदात सहभागी झाले होते, ज्यामुळे शाळेच्या पहिल्या दिवसाचा उत्साह द्विगुणीत झाला.

### ‘सीबीएसई’ पॅटर्नचे आव्हान

या वर्षापासून इयत्ता १ ते १० वी पर्यंत सर्व शाळांमध्ये 'सीबीएसई' पॅटर्न लागू होत आहे. या निर्णयामुळे खाजगी शाळांवरील पालकांचा खर्च वाचणार असला, तरी शिक्षकांसमोर मोठे आव्हान आहे. विशेषतः, आतापर्यंत मराठी माध्यमातून शिकविणाऱ्या निम-इंग्रजी शासकीय शाळांमधील शिक्षकांना नवीन अभ्यासक्रम आणि शिकवण्याची पद्धत आत्मसात करण्यासाठी विशेष परिश्रम घ्यावे लागणार आहेत. ज्यामुळे त्यांच्या कौशल्याचा कस लागेल.

अजिंक्य भारत
# आपलं यवतमाळ
शनिवार, दि. २८ जून २०२५



## थोडक्यात

### वणी शहरात चोरीचे सत्र सुरू

**वणी :** शहरात चोऱ्यांचे सत्र सुरूच आहे. एका बंद घराचे कुलूप तोडून अनोळखी चोरट्याने रोकड आणि दागिने लंपास केले. येथील जनता सेलिब्रेशन समोर राहणारे विक्की करसे यांच्या घरी गुरुवारी, दि. १९ जून रोजी ही चोरी झाली. घरात कोणी नसल्याची संधी साधून चोरट्याने १५ हजार रुपये रोख आणि सोन्याचे लॉकेट चोरले. चोर सीसीटीव्हीत कैद झाला आहे. पोलिसांनी पंचनामा करून तपास सुरू केला आहे.

### बारावी उत्तीर्ण युवतीची आत्महत्या

**वणी :** वणी तालुक्यातील राजूर (कॉलरी) येथे एका १८ वर्षीय युवतीने घरातच गळफास घेऊन आत्महत्या केली. तिने नुकतीच बारावीची परीक्षा उत्तीर्ण केली होती. प्रिया बन्सी प्रजापती (वय १८) असे मृत युवतीचे नाव आहे. गुरुवारी दुपारी ३ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. प्रिया ही पुढील शिक्षणाच्या तयारीत होती. तिने नैराश्यातून हे पाऊल उचलल्याचा प्राथमिक अंदाज आहे. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. मृतदेहउत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आला. पोलिस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

## निधन

### अमोल राणे यांचे निधन


**यवतमाळ:** येथील काळे



ले-आऊटमधील रहिवासी अमोल संभाजी राणे (वय ४४) यांचे अल्पशा आजाराने नागपूर येथे उपचारादरम्यान निधन झाले. स्थानिक वडगाव मोक्षधाम येथे त्यांच्या पार्थिवावर आज शुक्रवारी दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, आई, वडील, एक भाऊ, एक बहीण असा परिवार आहे. यवतमाळ जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त उप मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी राणे यांचे ते पुत्र होते.

### मनोज तिवारी यांचे निधन

**यवतमाळ :** स्थानिक तिवारी



चौकातील रहिवासी व गिट्टी क्रेशरचे व्यावसायिक मनोज लक्ष्मणप्रसाद तिवारी (वय ५२) यांचे दीर्घ आजाराने शुक्रवार, दि. २७ जून रोजी नागपुरात निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन भगिनी व बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांचा निधनाने परिसरांत हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

### बाळासाहेब चौधरी यांचे निधन

**उमरखेड :** शहरातील हनुमान



वॉर्डातील बाळासाहेब चौधरी (४५) यांचे नागपूर येथील एम्स रुग्णालयात २७ जूनच्या रात्री उपचारादरम्यान निधन झाले. ते उमरखेड शिवसेना शहरप्रमुख सपना चौधरी यांचे पती होते. त्यांचे पश्चात आई, पत्नी, भाऊ, बहीण, एक मुलगी, एक मुलगा असा आप्त परिवार आहे. येथील हिंदू स्मशान भूमीत त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# जिल्ह्यात पावसाची जोरदार हजेरी

## मृग नक्षत्रानंतर आर्द्राचा शेतकऱ्यांना खरा दिलासा, पावसाने पिकांना जीवदान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.२७: गेल्या काही दिवसांपासून यवतमाळ जिल्ह्यात सुरू असलेल्या दमदार पावसाने चिंताग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या पावसामुळे अंकुरलेल्या पाकळ्यांना जीवदान मिळाले आहे. दुसरीकडे प्रशासनाच्या मान्सूनपूर्व तयारीच्या अभावामुळे अनेक शहरी आणि भागात पाणी तुंबले असून नागरिकांचे मोठे होत आहेत.**



सुरुवातीला दडी मारलेल्या पावसाने आता जोरदार पुनरागमन केल्याने, शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. पेरणी झालेल्या पिकांना या पाण्याची नितांत गरज होती. या पावसामुळेशेतीच्या कामांना वेग आला आहे. जिल्ह्यातील धरणे आणि जलाशयांच्या पाणी पातळीतही वाढ होण्यास मदत झाली आहे. त्यामुळे, पिण्याच्या पाण्याचा आणि सिंचनाचा प्रश्न काही अंशी सुटण्यास मदत होणार आहे. मात्र, या दिलासादायक चित्राची एक दुसरी बाजूही आहे. यवतमाळ शहरात, जोरदार पावसामुळे भूमिगत गटार व्यवस्था कोलमडली असून, अनेक ठिकाणी गटारांचे घाण पाणी रस्त्यावर आले आहे. काही भागांतील दुकाने आणि घरांमध्येही पाणी शिरल्याची माहिती आहे. ग्रामीण भागात परिस्थिती आणखी बिकट आहे. अनेक ग्रामपंचायतींनी मान्सूनपूर्व नालेसफाई आणि रस्त्यांची डागडुजी न केल्याने, गावातील रस्ते उखडून गेले आहेत. रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यात पाणी साचल्याने वाहतुकीसाठी धोका निर्माण झाला आहे. घाटंजी-पारवा-आदिलाबाद मार्गावरील एका नाल्याला पूर आल्याने, हा मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

### पावसाच्या पाण्याने मार्ग झाला बंद

**जोरदार पावसामुळे जिल्ह्यातील अनेक लहान-मोठ्या नद्या आणि नाल्यांना पूर आला आहे. घाटंजी-पारवा मार्गावरून आदिलाबादकडे जाणारा रस्ता, नाल्याला आलेल्या पुरामुळे पूर्णपणे बंद झाला आहे. यामुळे वाहतुकीची मोठी कोंडी झाली आहे. अनेक गावांचा संपर्क तुटण्याची भीती निर्माण झाली आहे. प्रशासनाने तातडीने पर्यायी मार्गाची सोय करावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.**

# वणीतील महिला डॉक्टरचे आकस्मिक निधन

## झोपेतच काळाने घातला घाला

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**वणी, दि. २७ :** शहरातील प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. संतोष भोयर यांच्या पत्नी डॉ. प्रियंका भोयर (खुटेमाटे) यांचे वयाच्या ३१ व्या वर्षी आज, शुक्रवारी, दि.२७ जूनच्या सकाळी आकस्मिक निधन झाले. झोपेतच त्यांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना उघडकीस आल्याने शहरात हळहळ व्यक्त होत आहे.



डॉ. प्रियंका भोयर या गांधी चौकातील 'वात्सल्य बाल रुग्णालय' असलेल्या इमारतीत आपल्या कुटुंबासह वास्तव्यास होत्या. गुरुवारी रात्री त्या झोपी गेल्या, मात्र शुक्रवारी सकाळी उठल्याच नाहीत. त्यांचे पती डॉ. संतोष भोयर यांनी त्यांना उठविण्याचा प्रयत्न केला असता, त्यांचा मृत्यू झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. तरुण वयात अचानक मृत्यू झाल्याने, मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट करण्यासाठी मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. त्यानंतर दुपारी मोक्षधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती आणि सहा-सात वर्षांची मुलगी असा परिवार आहे. या घटनेने वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे. या घटनेमुळे सहा वर्षाची मुलगी आईच्या प्रेमाला मुकली, शहरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे,

# बाभूळगावच्या संतप्त महिलांनी घातला मुख्याधिकाऱ्यांच्या नामफलकाला हार

## गरजेचे रस्ते चिखलमय, अर्धवट कामांमुळे नागरिक त्रस्त

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**बाभूळगाव, दि. २७:** बाभूळगाव येथील प्रभाग १२ आणि ८ मधील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे संतप्त झालेल्या महिलांनी, आज नगरपंचायत कार्यालयात धडक दिली. मात्र, मुख्याधिकारी गैरहजर असल्याने, त्यांच्या दालनाच्या दारावरील पाटीला पुष्पहार घालून अनोखा निषेध नोंदवण्यात आला. प्रभाग १२ आणि ८ मध्ये पाणीपुरवठा योजनेसाठी पाइपलाइन टाकल्यानंतर, कंत्राटदाराने खोदलेले रस्ते केवळ मातीने बुजवले. आता पावसामुळे या रस्त्यांवर चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. प्रभाग १३ मध्ये नदीकिनारी



अनावश्यक ठिकाणी सौरदिव्यांसह रस्ता बांधून पैशांची उधळपट्टी केली जात आहे. मात्र, गरजेच्या कामांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या मनमानी कारभाराचा जाब विचारण्यासाठी, संतप्त महिलांनी मुख्याधिकारी डॉ. सोटे यांचे कार्यालय गाठले. मात्र, त्या गैरहजर असल्याने, महिलांनी त्यांच्या नावाच्या पाटीला हार घालून रोष व्यक्त केला. अखेरीस, नगर अभियंता प्रज्ञा नरवाडे यांनी निवेदन स्वीकारले. या निवेदनावर नगरसेवक अभय तातेड, सुदर्शन वैद्य, तसेच अनिता बद्दर शर्मा, रिजवाना कादर घाची, शारदा माहुरे, सतीश माहुरे, आरती दुर्गे, लता रणधीर रुमाले, सपना बद्दर, मनीषा दुर्गे, किरण खोब्रागडे, वर्षा रोडगे, मंगला चन्ने, ललिता वर्मा आणि शिवसेना महिला शहरप्रमुख हेमलता काळे यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मुसळधार पावसाने शेतातील तीन विहिरी खचल्या

## तातडीने पंचनामे करून मदतीची मागणी, नदी-नाल्यांचे पाणी शिरले शेतात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**राळेगाव, दि.२७:** तालुक्यात गुरुवारी मध्यरात्री झालेल्या मुसळधार पावसाने मोठे नुकसान झाले आहे. अनेक गावांमध्ये शेतात पाणी शिरल्याने पिके पाण्याखाली गेली असून, निधा येथे तीन शेतकऱ्यांच्या सिमेंट काँक्रिटने बांधलेल्या विहिरी खचल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.





गुरुवारी (दि. २६) मध्यरात्री झालेल्या पावसाने तालुक्यातील निधा आणि धानोरा परिसराला जोरदार तडाखा दिला. निधा शिवारातील गट क्रमांक ५०/१ आणि ६६/२ मध्ये, शेतकरी गणेश पुरुषोत्तम गवारकर, विक्रम नरेश पत्रकार आणि माणिक मानबा ठाकरे यांच्या रोजगार हमी योजनेअंतर्गत बांधलेल्या विहिरी, मुसळधार पावसामुळे पूर्णपणे खचल्या. मातीचा ढिगारा आणि मलबा आत गेल्याने, विहिरी जमीनदोस्त झाल्या असून, यामध्ये शेतकऱ्यांचे सुमारे तीन ते चार लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. याव्यतिरिक्त, परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचल्याने पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे, मात्र प्रशासनाने अद्याप त्याची पाहणी केलेली नाही. धानोरा परिसरातही परिस्थिती गंभीर आहे. नदी-नाल्यांजवळील शेतांमध्ये पाणी शिरल्याने, नुकतीच पेरलेली बियाणी वाहून गेली आहेत. हंगामाच्या पहिल्याच मोठ्या पावसाने शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी आणले. त्यांच्यावर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. प्रशासनाने या सर्व नुकसानीचे, म्हणजेच खचलेल्या विहिरी आणि पाण्याखाली गेलेल्या पिकांचे, तत्काळ पंचनामे करून, नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे.

# रस्त्यावरील खड्ड्यांमुळे विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात

## सुंदरनगरमधील रस्त्याची दुरवस्था

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ सागर मुने

**वणी, दि. २७:** येथील सुंदरनगर परिसरातील रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाल्याने विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात आला आहे. प्रशासनाने या रस्त्याची तातडीने दुरुस्ती न केल्यास, उद्यापासून स्कूल बस सेवा बंद करण्याचा इशारा बसचालक व मालकांनी दिला आहे. सुंदरनगर कॉलनीतून शाळेकडे जाणाऱ्या या मार्गावर मोठे खड्डे पडले आहेत. अनेक ठिकाणी सिमेंट रस्ता उखडलेला आहे. या अरुंद रस्त्यावरून जाताना स्कूल बस धोकादायकरीत्या एका बाजूला झुकत आहे. त्यामुळे मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त होत आहे. 'विद्यार्थ्यांची सुरक्षा हे आमचे ध्येय आहे, आम्ही



जीव धोक्यात घालून बस चालवू शकत नाही,' असे बसचालकांनी म्हटले आहे. या समस्येबाबत अनेकदा तक्रार करूनही प्रशासनाने कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे अखेर बससेवा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भविष्यात कोणतीही दुर्घटना घडल्यास, त्याला सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील, असा संतप्त इशारा चालक, मालक आणि पालकांनी दिला आहे.

# गोडवे ले-आउटमधील अतिक्रमण हटवा

## अन्यथा उपोषणाचा इशारा, रस्ता अडविल्याने नागरिकांचे हाल

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि. २७:** येथील गोडवे ले-आउटमधील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण तातडीने हटवावे, अन्यथा रस्त्यावरच मंडप टाकून साखळी उपोषण करण्याचा निर्वाणीचा इशारा संतप्त नागरिकांनी नगर परिषद प्रशासनाला दिला आहे. या अतिक्रमणामुळे वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला आहे.

यापूर्वी, दि. १३ जून रोजी तक्रार करूनही कारवाई न झाल्याने, नागरिकांनी आज पुन्हा एकदा निवेदन दिले. या अतिक्रमणामुळे परिसरातील सिसोदिया नगर, माहुरे, चिंतावार ले-आउट, समर्थ नगर, ग्रीन पार्क, या सर्व ले-आउटमधील नागरिकांना ये-जा करणे कठीण झाले आहे. या ले-



आउट्सना जोडणारा एकमेव मुख्य रस्ता अरुंद झाला आहे. यामुळे छोटे-मोठे अपघात होत असून, रुग्णवाहिका किंवा अग्निशमन दलाचे वाहनही आत येऊ शकत नाही. त्यामुळेनागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. प्रशासकीय अधिकारी भाग्यश्री कदम, अर्शद शेख व गणेश आडे यांना निवेदन देताना, अनंत गावंडे, राजू राऊत, विष्णू शिंदे यांच्यासह संतप्त नागरिकांनी आठ दिवसांत कारवाई न झाल्यास उपोषणावर बसणार असल्याचे सांगितले. या निवेदनावर १०० नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# संस्थेच्या कार्यालयातून महत्त्वाची कागदपत्रे चोरीला

## सातेफळ येथील घटना, पालिसात तक्रार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नेर (परसोपंत), दि.२७:** तालुक्यातील सातेफळ येथील एका संस्थेच्या कार्यालयातील कपाटातून महत्त्वाची कागदपत्रे चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी संस्थेच्या अध्यक्षांनी नेर पोलिसांत तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी अनोळखी चोरट्याविरोधात पोलिस तपास सुरू केला आहे. संत गाडगेबाबा ग्रामीण विकास संस्था, सातेफळता. नेर, (नोंदणी क्रमांक : एफ/३९५६) द्वारा संचालित दादा साहेब गवई माध्यमिक विद्यालय सातेफळ या कार्यालयातून चोरीला गेले. या संस्थेचे अध्यक्ष प्रदीप काशिनाथ झाडे (वय ५४) यांनी याबाबत नेर पोलिसांत तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार, संस्थेचे ठराव रजिस्टर, पावती बुक, बँक पासबुक, चेकबुक आणि सभासदांचे अर्ज यांसारखी सर्व महत्त्वाची कागदपत्रे सातेफळ येथील कार्यालयातील कपाटात ठेवली होती. गुरुवारी, (दि. २६) सकाळी संस्थाध्यक्ष श्री झाडे संस्थेच्या कामानिमित्त अमरावतीला जाण्यापूर्वी ते कार्यालयात गेले असता, त्यांना कपाटातील कागदपत्रे गायब असल्याचे आढळले. त्यांनी चौकशी केली असता काहीही माहिती मिळाली नाही. कोणीतरी अनोळखी व्यक्तीने ही कागदपत्रे चोरून नेल्याची खात्री झाल्याने त्यांनी पोलिसांत धाव घेतली. त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून नेर पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला आहे.

# बियाणे कंपनीच्या प्रतिनिधींचे वरुणराजाला साकडे

## शेतकऱ्यांच्या भरघोस उत्पन्नासाठी आर्णीत सिद्धेश्वर मंदिरात अभिषेक; वृद्धांना भोजनदान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ मनोज माघाडे

**आर्णी, दि.२७: यंदा शेतकऱ्यांना चांगले पीकू दे अशी प्रार्थना करीत आर्णी येथील विविध बियाणे कंपन्यांच्या प्रतिनिधींनी एकत्र येत वरुणराजाला साकडे घातले. त्यांनी गुरुवारी (दि. २६) येथील सिद्धेश्वर मंदिरात विधिवत पूजा आणि अभिषेक करून, 'यावर्षी चांगला पाऊस पडू दे आणि बळीराजाला भरघोस उत्पन्न होऊ दे,' अशी प्रार्थना केली.**



जून महिना अध्याहून अधिक संपला तरी, तालुक्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. याच पार्श्वभूमीवर, तालुक्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्रेते आणि बियाणे कंपनी प्रतिनिधींनी हा सामाजिक आणि धार्मिक उपक्रम आयोजित केला. 'आम्ही दरवर्षी खरीप हंगामाच्या सुरुवातीला हा उपक्रम राबवतो. अन्नदात्या बळीराजाचे ऋण फेडण्याचा हा आमचा एक छोटासा प्रयत्न आहे,' अशी भावना आयोजकांनी व्यक्त केली. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी अध्यक्ष रवी राठोड यांच्यासह अभिजित अडोणे, संदेश तोव्हर, मनोज सोनोने, दीपक कऱ्हाडे, दिनेश राठोड, पृथ्वीराज पन्नेरू, अरविंद चव्हाण, संदीप जाधव, अश्विन चव्हाण, किशोर चव्हाण, हर्षल राजपलु, अक्षय नागोसे, प्रतीक अघम, प्रीतम जाधव, पवन चव्हाण, आकाश तुनगर, दुर्गेश इंगोले, प्रवीण कोपरकर, शिवम चौधरी, दिलीप चव्हाण, कार्तुस पवार, निश्वर चव्हाण, अनंता सारसे, तारासिंग राठोड, गोविंद सहदेव, प्रतीक प्रघाणे, कार्तिक मामीडवार, उमेश जुनेवाल, गेडाम, तोसिफ कडूकर, राजू कोरटकर, संतोष पवार, राजू राठोड, शैलेश भोकरे आणि प्रतीक जाधव यांनी परिश्रम घेतले.

### वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना स्नेहभोजन

**या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे, दरवर्षी होणारा महाप्रसाद टाळून, आयोजकांनी यावर्षी शहरातील 'स्वर्गीय मातोश्री सुशीलाबाई नागपुरे वृद्धाश्रमा'तील १२० ज्येष्ठ नागरिकांसाठी मिष्टान्न भोजनाची व्यवस्था केली. या कार्यक्रमात तालुक्यातील अनेक शेतकरीही सहभागी झाले होते. योगायोगाने, या कार्यक्रमानंतर आर्द्रा नक्षत्रात दमदार पावसाने हजेरी लावल्याने, शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला.**

# व्यावसायिकाची आत्महत्या

**यवतमाळ, दि.२७:** केळापूर तालुक्यातील सायखेडा येथील एका कृषी केंद्र व्यावसायिकाने विषारी द्रव्य प्राशन करून आत्महत्या केली. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी, दि.२६ जून रोजी घडली. पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. गौरव ज्ञानेश्वर विरुळकर (वय ३६, रा. सायखेडा) असे मृत व्यावसायिकाचे नाव आहे. गुरुवारी सायंकाळी राळेगाव तालुक्यातील इचोडा-बोरी रस्त्यावर ते गंभीर अवस्थेत आढळले. त्यांना तातडीने उमरी येथील ख्रिश्चन रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. पांढरकवडा पोलिस ठाण्यात याप्रकरणी नोंद करण्यात आली असून, पोलिस पुढील तपास करत आहेत.